मंडळाचे सचिव यांनी असे सादर केले की, इमारत व इतर बांधकाम व्यवसायामधील कामगारांच्या हिताचे रक्षण करण्याच्या दृष्टीने, केंद्र शासनाने इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियम (रोजगार नियमन सेवाशर्थी), १९९६ लागू केला आहे. सदर अधिनियमामधील कलम (१८) नुसार प्रत्येक राज्याने इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ गठीत करावयाचे आहे. त्याअनुषंगाने, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्थी) नियम, २००७ अस्तित्वात आले असून, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची स्थापना करण्यात आलेली आहे.

२. शासन निर्णय उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग दि. ०३/१०/२०१२ अन्वये, मंडळाच्या मुंबई मुख्यालयाकरीता १८ पदे आणि जिल्हास्तरावर ३८ पदे अशा एकूण ५६ पदांची निर्मिती मंडळस्तरावर करण्यास शासनाची मान्यता देण्यात आली आहे.शासन अधिसुचना उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग दि. ०१/०६/२०१९ नुसार लिपिक-टंकलेखक, अधीक्षक, लघुटंकलेखक (इंग्रजी / मराठी) यांचे सेवाप्रवेश नियम करण्यात आले आहेत. तसेच, दि. ०७/०६/२०१९ रोजीच्या शासन अधिसूचनेनुसार चाहनचालक, दफ्तरी व शिपाई यांचे सेवाप्रवेश नियम करण्यात आले. दि. २०/०८/ २०२० रोजीच्या शासन अधिसूचनेनुसार जिल्हा कार्यकारी अधिकारी व उप जिल्हा कार्यकारी अधिकारी यांचे सेवाप्रवेश नियम करण्यात आले.

३. मंडळाने दिनांक ०५ जुलै, २०१९ रोजीच्या पत्रान्वये १८३ पदे भरतीचा प्रस्ताव शासनास सादर केला होता. तद्नंतर दिनांक २५ नोव्हेंबर, २०१९ अन्वये ४२२ पद भरतीचा प्रस्ताव शासनास सादर केला होता. तथापि, सदर प्रस्तावास अद्याप मान्यता मिळालेली नाही. सद्यस्थितीत ६०२ पदांचा सुधारीत आकृतीबंध प्रस्तावित करण्यात येत आहे.सदर आकृतीबंधास मा.मंत्री महोदय (कामगार) यांनी कामगार आयुक्तांच्या शिफारशीनुसार प्रस्ताव सादर करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

अ. क्र.	पदनाम	संवर्ग	मुख्यालय	प्रादेशिक सुविधा केंद्र	जिल्हा सुविधा केंद्र	एकूण पदे	पदे भरण्याची कार्यवाही
१	सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी	गट- अ	१	०	०	१	महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्थी) नियम,२००७ मधील कलम (४०) नुसार
२	मुख्य लेखा व वित्त अधिकारी	गट- अ	१	०	०	१	वित्त व लेखा संवर्गामधून प्रतिनियुक्तीने

माहितीचा अधिकार अधिनियम २००५
अंतर्गत देण्यात आलेली प्रमाणीत प्रत

अ. क्र.	पदनाम	संवर्ग	मुख्यालय	प्रादेशिक सुविधा केंद्र	जिल्हा सुविधा केंद्र	एकूण पदे	पदे भरण्याची कार्यवाही
३	प्रादेशिक कार्यकारी अधिकारी	गट- अ	०	६	०	६	कामगार उप आयुक्त संवर्ग/समकक्ष राज्यसेवा संवर्गामधून प्रतिनियुक्तीने
४	विधी सल्लागार	गट- अ	१	०	०	१	विधी व न्याय सेवा संवर्गामधून प्रतिनियुक्तीने
५	जिल्हा कार्यकारी अधिकारी	गट- अ	५	६	३५	४६	दि.२०.०८.२०२० रोजीच्या मंजूर सेवाप्रवेश नियमानुसार
गट- अ एकूण पदे			८	१२	३५	५५	
६	लेखाधिकारी	गट-ब	५	६	०	११	वित्त व लेखा संवर्गामधून प्रतिनियुक्तीने
७	सहाय्यक लेखाधिकारी	गट-ब	०	०	३५	३५	
८	उप जिल्हा कार्यकारी अधिकारी	गट-ब	१०	६	०	१६	दि.२०.०८.२०२० रोजीच्या मंजूर सेवाप्रवेश नियमानुसार
गट- ब एकूण पदे			१५	१२	३५	६२	
९	लघु टंकलेखक उच्चश्रेणी	गट-क	२	६	०	८	दि.०१.०६.२०१९ रोजीच्या मंजूर सेवाप्रवेश नियमानुसार
१०	लघु टंकलेखक निम्नश्रेणी	गट-क	२	०	०	२	दि.०१.०६.२०१९ रोजीच्या मंजूर सेवाप्रवेश नियमानुसार
११	अधीक्षक	गट-क	१०	६	३५	५१	दि.०१.०६.२०१९ रोजीच्या मंजूर सेवाप्रवेश नियमानुसार

माहितीचा अधिकार अधिनियम २००५
अंतर्गत देण्यात आलेली प्रमाणीत प्रत

अ. क्र.	पदनाम	संवर्ग	मुख्यालय	प्रादेशिक सुविधा केंद्र	जिल्हा सुविधा केंद्र	एकूण पदे	पदे भरण्याची कार्यवाही
१२	वरिष्ठ लिपिक	गट-क	१३	१२	७०	९५	५०% सरळसेवा व ५०% लिपिक टंकलेखकामधून पदोन्नतीने
१३	लिपिक टंकलेखक	गट-क	३०	२४	१४०	१९४	दि.०१.०६.२०१९ रोजीच्या मंजूर सेवाप्रवेश नियमानुसार
१४	वाहनचालक	गट-क	४	६	३५	४५	दि.०७.०६.२०१९ रोजीच्या मंजूर सेवाप्रवेश नियमानुसार
गट- क एकूण पदे			६१	५४	२८०	३९५	
१५	दफ्तरी	गट-ड	१	६	३५	४२	दि.०७.०६.२०१९ रोजीच्या मंजूर सेवाप्रवेश नियमानुसार
१६	शिपाई	गट-ड	७	६	३५	४८	दि.०७.०६.२०१९ रोजीच्या मंजूर सेवाप्रवेश नियमानुसार
गट- ड एकूण पदे			८	१२	७०	९०	
एकूण पदे			९२	९०	४२०	६०२	

५. उपरोक्त प्रस्तावित पदांकरिता येणाऱ्या खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे आहे-

अ. क्र.	पदनाम	संवर्ग	एकूण पदे	सातव्या वेतन आयोगानुसार वेतन श्रेणी	प्रति पद मासिक वेतन रक्कम (रु.)	एकूण वार्षिक खर्च रक्कम (रु.)
१	सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी	गट-अ	१	एस-२५ (रु.७८,८००/- ते रु.२,०९,२००/-)	१,४८,३५१	१७,८०,२१२

माहितीचा अधिकार अधिनियम २००५
अंतर्गत देण्यात आलेली प्रमाणीत प्रत

अ. क्र.	पदनाम	संवर्ग	एकूण पदे	सातव्या वेतन आयोगानुसार वेतन श्रेणी	प्रति पद मासिक वेतन रक्कम (रु.)	एकूण वार्षिक खर्च रक्कम (रु.)
२	मुख्य लेखा व वित्त अधिकारी	गट-अ	१	एस-२३ (रु.६७,७००/- ते रु.२,०८,७००/-)	१,२८,३९८	१५,४०,७७६
३	प्रादेशिक कार्यकारी अधिकारी	गट-अ	६	एस-२३ (रु.६७,७००/- ते रु.२,०८,७००/-)	१,२८,३९८	९२,४४,६५६
४	विधी सल्लागार	गट-अ	१	एस-२० (रु.५६,१००/- ते रु.१,७७,५००/-)	१,०७,५४५	१२,९०,५४०
५	जिल्हा कार्यकारी अधिकारी	गट-अ	४६	एस-१८ (रु.४९,१००/- ते रु.१,५५,८००/-)	१,०२,४५०	५,६५,५२,४००
गट- अ एकूण पदे			५५		६,१५,१४२	७,०४,०८,५८४
६	लेखाधिकारी	गट-ब	११	एस-१६ (रु.४४,९००/- ते रु.१,४२,४००/-)	८४,७१२	१,११,८१,९८४
७	सहाय्यक लेखाधिकारी	गट-ब	३५	एस-१६ (रु.४४,९००/- ते रु.१,४२,४००/-)	८४,७१२	३,५५,७९,०४०
८	उप जिल्हा कार्यकारी अधिकारी	गट-ब	१६	एस-१५ (रु.४१,८००/- ते रु.१,३२,३००/-)	७९,१४०	१,५१,९४,८८०
गट- ब एकूण पदे			६२		२,४८,५६४	६,१९,५५,९०४
९	लघु टंकलेखक उच्चश्रेणी	गट-क	८	एस-१५ (रु.४१,८००/- ते रु.१,३२,३००/-)	७९,१४०	७५,९७,४४०
१०	लघु टंकलेखक निम्नश्रेणी	गट-क	२	एस-१४ (रु.३८,६००/- ते रु.१,२२,८००/-)	७३,३८७	१७,६१,२८८

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत देण्यात आलेली प्रमाणीत प्रत

अ. क्र.	पदनाम	संवर्ग	एकूण पदे	सातव्या वेतन आयोगानुसार वेतन श्रेणी	प्रति पद मासिक वेतन रक्कम (रु.)	एकूण वार्षिक खर्च रक्कम (रु.)
११	अधीक्षक	गट-क	५१	एस-१४ (रु.३८,६००/- ते रु.१,२२,८००/-)	७३,३८७	४,४९,१२,८४४
१२	वरिष्ठ लिपिक	गट-क	९५	एस-८ (रु.२५,५००/- ते रु.८१,१००/-)	४९,८३९	५,६८,१६,४६०
१३	लिपिक टंकलेखक	गट-क	१९४	एस-६ (रु.१९,९००/- ते रु.६३,२००/-)	३८,०७२	८,८६,३१,६१६
१४	वाहनचालक	गट-क	४५	एस-६ (रु.१९,९००/- ते रु.६३,२००/-)	३८,०७२	२,०५,५८,८८०
गट- क एकूण पदे			**३९५**		**३,५१,८९७**	**२२,०२,७८,५२८**
१५	दफ्तरी	गट-ड	४२	एस-३ (रु.१६,६००/- ते रु.५२,४००/-)	३२,१४०	१,६१,९८,५६०
१६	शिपाई	गट-ड	४८	एस-१ (रु.१५,५००/- ते रु.४७,६००/-)	२९,२६४	१,६८,५६,०६४
गट- ड एकूण पदे			**९०**		**६१,४०४**	**३,३०,५४,६२४**
एकूण पदे			**६०२**		**१२,७७,००७**	**३८,५६,९७,६४०**

६. इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियम (रोजगार नियमन व सेवाशर्थी), १९९६ च्या कलम (२४) (३) मध्ये पुढीलप्रमाणे नमूद करण्यात आले आहे - "No Board shall, in any financial year, incur expenses towards salaries, allowances and other remuneration to its members, officers and other employees and for meeting the other administrative expenses exceeding five per cent of its total expenses during that financial year".

माहितीचा अधिकार अधिनियम २००५
अंतर्गत देण्यात आलेली प्रमाणीत प्रत

त्यानुसार उपरोक्त पदांकरिता होणारा खर्च वार्षिक खर्चाच्या ५% च्या मर्यादेत असणे आवश्यक आहे.

७. सध्या मंडळाच्या आस्थापनेवर मंडळ मुख्यालयात, सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी -०१ पद व मुख्य लेखा व वित्त अधिकारी -०१ पद आणि लेखा अधिकारी -०१ पद असे केवळ ०३ शासकीय अधिकारी पुर्णवेळ कार्यरत आहेत व जिल्हा कार्यकारी अधिकारी हे पद अतिरीक्त कार्यभाराने कार्यरत आहे. याशिवाय ०१ उपलेखापाल प्रतिनियुक्तीने, ०१ वरिष्ठ लिपिक (अतिरिक्त कार्यभाराने) व ०२ लिपिक-टंकलेखक (उसनवारीने) कार्यरत आहेत.

८. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ यांचे व्याप्ती संपुर्ण महाराष्ट्रभर असून मंडळाकडे जास्तीत जास्त नोंदणी,नुतनीकरण व योजनांची प्रभावी अंमलबजावणी आणि पुढील महत्त्वाचे कामे पार पाडणेसाठी मुख्यालय,प्रादेशिक कार्यालय,जिल्हा कार्यालय येथे मनुष्यबळ असणे आवश्यक आहे.

(अ) मंडळाकडे सध्या विविध बँकामध्ये गुंतवणुकीच्या स्वरूपात शिल्लक असलेले रक्कम रू.१०,७२० कोटी, दरवर्षी उप कराच्या माध्यमामधून जमा होणारे सर्वसाधारण रक्कम रु. २,३०० कोटी व विविध योजनांवर दरवर्षी खर्च होणारे रू. ३,५०० कोटी या आर्थिक बाबींचे सुयोग्य लेखांकन,लेखापरिक्षण व नियोजन करणे.

(ब) उपकर संकलनाकरीता प्रभावी यंत्रणा तयार करणे.

(क) बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व लाभ वाटप करणे.

(ड) मंडळाकडील अस्तित्वातील योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे.

(इ) अधिनियमातील तरतूदीनुसार बांधकाम कामगारांच्या हिताचे संरक्षणार्थ अन्य उपाययोजना करणे. याकरीता, मंडळाची प्रशासकीय यंत्रणा सक्षम करणे अत्यावश्यक बाब आहे.

याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव क्र. ५९(२१)/२०२२ :- मंडळाचा सुधारित आकृतीबंध मा. कामगार आयुक्त यांच्या शिफारशीसह शासन मान्यतेस सादर करण्यात यावा, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला आहे.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याण मंडळ, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम २००५
अंतर्गत देण्यात आलेली प्रमाणीत प्रत

विषय क्र. २२ :- मंडळाकडे जमा होणाऱ्या उपकराची अचूक पडताळणी होण्यासाठी व उपकर संकलनात वाढ होण्याच्या उपाययोजनेकरिता सनदी लेखापाल (CA)/ तांत्रिक सल्लागार संस्थेची (एजन्सी) नियुक्ती करण्यास मंजूरी देणे.

याबाबत मंडळ सचिवांनी सादर केले की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई मंडळाकडे जमा होणारा निधीचे लेखापरीक्षणासाठी सनदी लेखापाल (CA)/ संस्था नेमणूक करण्याची कार्यपध्दती ठरविण्यासाठी मा. मंत्री महोदय, कामगार तथा मा. अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली, मंगळवार दि. ०६.१२.२०२२ रोजी पार पडलेल्या बैठकीमध्ये मंडळाच्या प्रचलित पध्दतीने नियुक्त सनदी लेखापालांकडून सदयस्थितीत बांधकाम उपकराची अचूक पडताळणी, ताळमेळ व लेखापरीक्षण होत नसलेली तसेच बांधकामांचे उपकर दायीत्व तपासण्यासाठी मंडळाकडे तांत्रिक सल्लागार उपलब्ध नसल्याने उपकर संकलनात वाढ होण्याच्या उपाययोजनेकरिता तांत्रिक सल्लागार एजन्सी व सनदी लेखापाल (CA) एजन्सी यांची उपलब्धतेनुसार स्वतंत्रपणे अथवा एकत्रितपणे नियुक्ती बाहयस्त्रोत यंत्रणेकडून करणेसाठी ई- निविदा आवश्यक आहे. ई- निविदेमध्ये संबंधित एनन्सीना मंडळाचे वरील नमुद कामकाजासाठी त्यांचे कामकाज क्षेत्र/ व्याप्ती (Scope Of Work) आखुन दयावे व आवश्यक अटी शर्ती अंतर्भुत कराव्यात.

याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव क्र. ५९(२२)/२०२२:-

मंडळाकडे जमा होणाऱ्या उपकराची अचूक पडताळणी होण्यासाठी व उपकर संकलनात वाढ होण्याच्या उपाययोजनेकरिता सनदी लेखापाल (CA)/ तांत्रिक सल्लागार संस्थेची (एजन्सी) नियुक्ती करण्यासाठी ई- निविदा करणेस मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला आहे.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याण मंडळ, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम २००५
अंतर्गत देण्यात आलेली प्रमाणीत प्रत

विषय क्र. २३:- मंडळाचे सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाच्या "वार्षिक जमा खर्चाच्या लेख्यास" (Annual Account) मंडळाची मान्यता घेणे व तदनंतर सदर लेखे राज्य शासन व महालेखापाल कार्यालयास सादर करणेस मंजूरी देणे.

याबाबत मंडळ सचिवांनी सादर केले की, मंडळाचे सन २०२०-२१ या वर्षाचे वार्षिक लेखे मंडळाने नियुक्त केलेल्या सनदी लेखापाल (CA) मे. टी. व्ही. एच. शाह आणि कंपनी, मुंबई यांनी तयार व प्रमाणित केले आहेत. सदर लेखे मंडळाच्या मान्यतेस सादर करण्यात येत आहेत. मंडळाच्या मान्यतेनंतर सदर लेख्यांचे संव्यवहार लेखापरिक्षण (Transaction Audit) करण्यासाठी मा. भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांना विनंती करण्यात येईल.

सन २०२०-२१ मधील जमा व खर्चाचा गोषवारा

(रू.कोटीत)

अ.क्र.	जमेची बाब	जमा रक्कम	खर्चाची बाब	खर्च रक्कम
१.	उपकर	१४०४.२३	विविध कल्याणाकारी योजनांवरील खर्च	१०३२.७५
२.	नोंदणी शुल्क	१.५६	प्रशासकीय खर्च	३२.९४
३.	बँकेतील मुदत ठेवीवरील व्याज	५६४.९२	उपकर जमा करण्याचा खर्च १% च्या मर्यादेत	१४.०५
४.	इतर जमा	०.८२	घसारा	०.१५
	एकूण जमा	१९७१.५३	**एकूण खर्च**	१०७९.८९
५.			शिल्लक	८९१.६४
	एकूण	**१९७१.५३**	**एकूण**	**१९७१.५३**

याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव क्र. ५९(२३)/२०२२:-

मंडळाचे सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाच्या "वार्षिक जमा-खर्चाच्या लेख्यास" (Annual Account) मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येवून तद्नंतर सदर लेखे राज्य शासन व महालेखापाल कार्यालयास सादर करणेस मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला आहे.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याण मंडळ, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम २००५
अंतर्गत देण्यात आलेली प्रमाणीत प्रत

विषय क्र.२४ :- मंडळाकडील बांधकाम कामगारांना सुरक्षा संच व अत्यावश्यक संच पुरविणाऱ्या योजनेचा आढावा घेणे व दि.०१.०४.२०२२ रोजी नंतर नोंदीत बांधकाम कामगारांना सुरक्षा संच व अत्यावश्यक संचाचे वाटप करणे तसेच, निर्धारित लक्षांकानुसार शिल्लक संच वाटपाचे मागणीनुसार जिल्हयांना लक्षांक निर्धारण करणे व योजनेस मुदतवाढ देण्याच्या धोरणात्मक निर्णयास मंजूरी देणे.

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, शासन आदेशानुसार २,२५,००० सुरक्षा संच व अत्यावश्यक संच वितरणाकरीता ई- निविदा प्रकिया राबवून संस्था व दर निश्चितीची कार्यवाही करण्यात आली होती.

२. सुरक्षा संच व अत्यावश्यक संच वाटपाचे खालीलप्रमाणे पुरवठा आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.

अ.क्र.	शासन मान्यता/निर्देश पत्र	मंडळाचे पुरवठा आदेश दिनांक	सुरक्षा संच	अत्यावश्यक संच
१	निविदा स्विकृती दिनांक ०९.०४.२०१८	१४.०६.२०१८	२,२५,०००	२,२५,०००
२	दिनांक १५.०६.२०१९	१४.०६.२०१९	१,८५,०००	१,८५,०००
३	दिनांक १५.०६.२०१९	०५.०८.२०१९	२,६८,१४०	२,६८,१४०
४	दिनांक १५.०६.२०१९	१६.०८.२०१९	२,४९,५९०	२,४९,५९०
५	दिनांक २१.१२.२०१९	०४.०१.२०२०	४,५३,०००	४,५३,०००
६	दिनांक ०२.०६.२०१९	११.०६.२०२१	३,५०,०००	३,५०,०००
७	दिनांक १५.१२.२०२१	२३.१२.२०२१	४,००,०००	४,००,०००
एकूण			**२१,३०,७३०**	**२१,३०,७३०**
दिनांक ०९.०६.२०२२ अखेर वाटप करण्यात आलेल्या संचाची संख्या			**१९,४१,५५५**	**१९,४१,५५५**
शिल्लक संचाची संख्या			**१,८९,१७५**	**१,८९,१७५**

३. मंडळाच्या दिनांक २४.०६.२०२२ अन्वये ज्या बांधकाम कामगारांना सुरक्षा संच व अत्यावश्यक संच प्राप्त झालेले नाही याबाबतचा प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात आला होता.

४. मा. महालेखापाल कार्यालयाच्या दिनांक ०१.११.२०२० ते दिनांक ३१.०३.२०२२ या कालावधीत मंडळाच्या मुख्यालयाचे लेखा परीक्षण करताना मा. महालेखापाल कार्यालयाने दिनांक २२.०३.२०२१ रोजीच्या केंद्र शासनाच्या पत्राद्वारे दिलेल्या निर्देशाचे पालन केले नसून मंडळामार्फत देण्यात येणाऱ्या योजनांचे लाभ वस्तू स्वरूपात वितरीत न करण्याबाबत

माहितीचा अधिकार अधिनियम २००५
अंतर्गत देण्यात आलेली प्रमाणीत प्रत

आक्षेप नोंदविला आहे. तसेच, संच वितरण करणाऱ्या संस्थांना वेळोवेळी मुदतवाढ देण्यावरही आक्षेप नोंदविला आहे.

५. वरीलप्रमाणे शासनास सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने दिनांक २१.०६.२०२२ रोजीच्या पत्रान्वये खालीलप्रमाणे मान्यता प्रदान केली आहे.

दि.**३१.०३.२०२२** पर्यंत नोंदणी तथा नुतनीकरण झालेल्या परंतु संच वाटप न झालेल्या शिल्लक वाटप करावयाचे **१,८९,१७५** इतके संच वगळता अधिकचे **३,९४,४९३** इतक्या नोंदीत सक्रिय बांधकाम कामगारांना संच वाटप करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली.

६. वरील शासन मान्यतेस अनुसरून दि.**३१.०३.२०२२** पर्यंत व त्यानंतर नोंदीत होणाऱ्या बांधकाम कामगारांना सुरक्षा संच व अत्यावश्यक संच वाटप करण्यामध्ये भेदभाव केल्यास योग्य ठरणार नाही त्यामुळे **१,८९,१७५** संच व अधिकचे **३,९४,४९३** संच असे एकूण **५,८३,६६८** संच वाटपाच्या मर्यादेपर्यंत दि.**३१.०३.२०२२** च्या आधी व वाटप करेपर्यंत नोंदीत झालेल्या सर्व बांधकाम कामगारांना सुरक्षा संच व अत्यावश्यक संच वाटप करण्यास मान्यता प्रदान करणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावास शासनाने दिनांक **२३.०६.२०२२** अन्वये मान्यता प्रदान करण्यात आली होती.

७. वरीलप्रमाणे शासन मान्यतेस अनुसरून **३,९४,४९३** सुरक्षा संच व अत्यावश्यक संच वाटपाचे पुरवठा आदेश दि.**२४.०६.२०२२** रोजी निर्गमित करण्यात आलेले आहेत. त्यानुसार संच वाटपाची कार्यवाही करण्यात येत आहे.

८. सद्यस्थितीत जिल्हा कार्यालयामार्फत वाटप करण्यात आलेल्या संचापैकी शिल्लक संचाची संख्या विचारात घेऊन दि.**३१.०३.२०२३** अखेर अतिरिक्त सुरक्षा संच व अत्यावश्यक संच पुरवठा करण्याकरीता मागणी करण्यात येत आहे.

अ.क्र.	जिल्हा	सुरक्षा संचाची संख्या	अत्यावश्यक संचाची संख्या
१.	मुंबई शहर	१०,०००	१०,०००
२.	मुंबई उपनगर पूर्व	३०००	४०००
३.	मुंबई उपनगर पश्चिम	४०००	३०००
४.	ठाणे	८०००	८०००
५.	कल्याण	८०००	८०००
६.	रायगड	८०००	८०००
७.	पालघर	२२०००	२२०००
८.	रत्नागिरी	९०००	९०००
९.	सिंधुदूर्ग	७०००	७०००
	एकूण	**७९०००**	**७९०००**
१०.	नागपूर	३७२२४	३७२२४

माहितीचा अधिकार अधिनियम २००५
अंतर्गत देण्यात आलेली प्रमाणीत प्रत

अ.क्र.	जिल्हा	सुरक्षा संचाची संख्या	अत्यावश्यक संचाची संख्या
११.	भंडारा	२११८०	२११८०
१२.	गोंदीया	११,००३	११,००३
१३.	चंद्रपूर	३७८५१	३७८५१
१४.	वर्धा	५६२५४	५६२५४
१५.	गडचिरोली	३४७००	३४७००
	एकूण	**१९८२१२**	**१९८२१२**
१६.	अमरावती	२००००	२००००
१७.	अकोला	३५०००	३५०००
१८.	वाशिम	५०००	५०००
१९.	बुलडाणा	२००००	२००००
२०.	यवतमाळ	२००००	२००००
	एकूण	**१००००० **	**१००००० **
२१.	पुणे	५००००	५००००
२२.	सांगली	४००००	४००००
२३.	इचलकरंजी	१५०००	१५०००
२४.	सातारा	१५०००	१५०००
२५.	सोलापूर	३३०००	३३०००
२६.	कोल्हापूर	४३०००	४३०००
२७.	बार्शी	००	००
	एकूण	**१९६००० **	**१९६००० **
२८.	नाशिक	३००००	३००००
२९.	जळगांव	२००००	२००००
३०.	अहमदनगर	३००००	३००००
३१.	धुळे	१००००	१००००
३२.	नंदुरबार	१००००	१००००
	एकूण	**१००००० **	**१००००० **
३३.	औरंगाबाद	५१४७०	५१४७०
३४	नांदेड	५१३०६	५१३०६
३५	लातूर	१७०६१	१७०६१
३६	जालना	४१६४९	४१६४९
३७	परभणी	२००००	२००००
३८	हिंगोली	१४७८७	१४७८७
३९	बीड	३२२९२	३२२९२

माहितीचा अधिकार अधिनियम २००५
अंतर्गत देण्यात आलेली प्रमाणीत प्रत

अ.क्र.	जिल्हा	सुरक्षा संचाची संख्या	अत्यावश्यक संचाची संख्या
४०	उस्मानाबाद	१२८००	१२८००
	एकूण	२४१३६५	२४१३६५
	एकूणांत	९१४५७७	९१४५७७

९. सद्यस्थितीत जिल्हा कार्यालयाकडे उपलब्ध असलेल्या सुरक्षा संच व अत्यावश्यक संच संख्या वगळून जिल्हानिहाय **९,१४,५७७** सुरक्षा संच व अत्यावश्यक संचाची मागणी करण्यात आली आहे. तरी, अतिरिक्त संच पुरवठाबाबतचा प्रस्ताव मंडळाच्या विचार-विनिमयाकरीता सादर करण्यात आला होता.

१०. त्याबाबत मा. अध्यक्ष तथा मंत्री महोदय,कामगार विभाग यांनी मंडळामार्फत दिनांक **२३.०६.२०२२** रोजी देण्यात आलेल्या पुरवठा आदेशातील नमूद संचापैकी किती संच वितरीत करणे बाकी आहे याचे अवलोकन करून जिल्हा कार्यालयांना आवश्यक असलेल्या सुधारित संचाचे प्रस्ताव मान्यतेस सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या

सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव क्र.५९(२४)/२०२२:-

मंडळाकडील बांधकाम कामगारांना सुरक्षा संच व अत्यावश्यक संच पुरविणाऱ्या योजनेचा आढावा घेऊन दि.२३.०६.२०२२ रोजी देण्यात आलेल्या पुरवठा आदेशातील नमूद संचापैकी किती संच वितरीत करणे शिल्लक आहे याचा ताळमेळ घेऊन जिल्हा निहाय सुधारित पुरवठा लक्ष्यांक निश्चित करण्यास व जिल्हा कार्यालयाची अतिरिक्त मागणी असल्यास संच वाटपाचा लक्ष्यांक निर्धारित करून प्रस्ताव शासन मान्यतेस्तव सादर करावा व शासन मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करावी, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याण मंडळ, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम २००५
अंतर्गत देण्यात आलेली प्रमाणीत प्रत



महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ,मुंबई.
एम.एम.टी.सी. हाऊस, पाचवा मजला, प्लॉट नं. सी २२,
ब्लॉक - ई , वांद्रे- कुर्ला संकुल,
वांद्रे (पूर्व),मुंबई ४०० ०५१ .

मा. अध्यक्ष तथा मा. मंत्री, (कामगार) यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या ६० व्या बैठकीचे इतिवृत्तांत

****

बैठक स्थळ :- मा. मंत्री, (कामगार) तथा मा.अध्यक्ष महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ यांचे दालन क्र.८४, जॉली मेकर ०१ प्रिमायसेस को. ऑप. सोसायटी लि., आठवा मजला, नरीमन भवन प्लॉट क्र.९५,९६ व ९७, कफ परेड, कुलाबा, मुंबई- ४०० ००२.
दिनांक. :- ०२.०७.२०२४ (मंगळवार)
वेळ :- सकाळी ११.००

माहितीचा अधिकार अधिनियम २००५
अंतर्गत देण्यात आलेली प्रमाणीत प्रत

प्रस्तावना :-

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची ५९ वी बैठक दिनांक १२.१२.२०२२ रोजी आयोजित करण्यात आली होती. मा. महालेखापाल कार्यालयाकडून करण्यात आलेल्या लेखापरिक्षणामध्ये, दिनांक ३०.०६.२०२१ रोजी मंडळाचा कार्यकाल संपला असून, मंडळ अस्तित्वात नसताना सदर बैठकीच्या आयोजनाबाबत आक्षेप नोंदविण्यात आला होता.

२. याबाबत विधी व न्याय विभागाचे अभिप्राय घेण्याबाबत मा. महालेखापाल कार्यालयाने निर्देशित केले होते. मंडळामध्ये कामगार प्रतिनिधी व मालक प्रतिनिधी नसले तरी शासकीय प्रतिनिधी असून,मंडळ कायदेशीररित्या अस्तित्वात असल्याने, कामगार विभागामार्फत विधी व न्याय विभागाचे अभिप्राय मिळणेकामी मंडळाने विनंती केली होती.

३. सदर विनंतीस अनुसरून, विधी व न्याय विभागामार्फत दिनांक २६.०२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये अभिप्राय प्राप्त झालेले असून, मंडळ कायदेशीररित्या अस्तित्वात असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

४. दरम्यानच्या कालावधीत विधी व न्याय विभागाचे अभिप्राय अपेक्षीत असल्याने बैठक आयोजित करण्यात आली नव्हती. तसेच त्यानंतरच्या कालावधीत मा.लोकसभेची व मा.विधानपरिषदेची आदर्श आचारसंहिता असल्याने बैठकीचे आयोजन करता आलेले नव्हते.

५. सद्यस्थितीत विधी व न्याय विभागाचे अभिप्राय व आचारसंहिता कालावधी संपूष्टात आल्याने बैठकीचे आयोजन करण्यात येत आहे त्याबाबतची विषयसूची खालीलप्रमाणे आहे:-

माहितीचा अधिकार अधिनियम २००५
अंतर्गत देण्यात आलेली प्रमाणीत प्रत

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

बैठकीची विषयसूची

अ.क्र.	बैठकीचा विषय	पृष्ठ क्रमांक
१	महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांकरीता गृहपयोगी वस्तु संचाचा पुरवठा करणेबाबत.	९ ते १०
२	महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत कडील दिनांक १९.०५.२०२३ नंतर नव्याने नोंदणी/नुतणीकरण झालेल्या तथापि अद्याप संच वाटप न झालेल्या ३,९१,८५३ नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांना अत्यावश्यक संच व सुरक्षा संच वितरीत करणेबाबत.	११
३	महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतणीकरण व लाभ वाटपाच्या मदतीसाठी तालुका स्तरावर कामगार सुविधा केंद्र स्थापन करणेबाबत.	१२ ते १३
४	महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांकरीता आरोग्य तपासणी चाचण्या सुधारीत करणे तसेच, "तपासणी ते उपचार आरोग्य योजना" राबविणेबाबत.	१४ ते १६
५	महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगाराचे व सेवाशर्तीचे विनियमन) (सुधारणा) नियम २०१३ अधिक्रमित करून, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगाराचे व सेवाशर्तीचे विनियमन) (सुधारणा) नियम २०२३ करणेबाबत.	१७
६.	महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत मुख्यालय व अधिनस्त जिल्हा कार्यालयाच्या अभिलेख कक्षाचे स्कॅनिंग ॲन्ड डिजिटायझेशन करून घेणे व कॉम्पेक्टर स्टोरेज उपलब्ध करून देणेबाबत.	१८ ते २०
७	महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत नोंदीत बांधकाम कामगारांसाठी नाक्याच्या ठिकाणी शेड उभारणेबाबत.	२१ ते २२
८	महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ मुख्यालयाची सद्यस्थितीतील भाडे तत्वावरील जागेची मुदत माहे जुन २०२४ अखेर संपुष्टात येणार असल्याने मंडळासाठी एम. एम. टी. सी. हाऊस येथील तळमजला, पाचवा मजला येथील जागेस मुदतवाढ देण्यास व चौथा मजला नव्याने भाडयाने घेणेबाबत.	२३ ते २५

पान क्र. ३ पैकी १०१

माहितीचा अधिकार अधिनियम २००५
अंतर्गत देण्यात आलेली प्रमाणीत प्रत

अ.क्र.	बैठकीचा विषय	पृष्ठ क्रमांक
९	महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत जिल्हा कामगार सुविधा केंद्र स्थापन करणेकरीता मंडळामार्फत नियुक्त मे.टेक्नोक्राफ्ट असोसिएटस यांना मुदतवाढ देणेबाबत.	२६ ते २८
१०	महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांना देण्यात येणाऱ्या विविध सुविधांचे सनियंत्रण करण्यासाठी संगणक प्रणाली (Dashboard) विकसीत करणेबाबत.	२९ ते ३०
११	महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गतच्या पूर्व शिक्षण प्रशिक्षण (RPL) या प्रशिक्षण कार्यक्रमाकरीता माहिती व तंत्रज्ञान आधारीत विविध कामकाजाकरीता माहिती तंत्रज्ञान संचालनालयाच्या सूचीबद्ध संस्थामधून एका संस्थेची निवड करणेबाबत.	३१ ते ३२
१२	महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांची प्रचार-प्रसिध्द करणेबाबत २०२२-२०२३ व २०२३-२०२४ चा आराखडा राबविणेबाबत व २०२४-२०२५ चा आराखडा निश्चित करणेबाबत.	३३ ते ३९
१३	महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या विविध योजनांच्या प्रचार -प्रसिध्दीसाठी सर्वसमावेशक माहिती पुस्तिका तयार करण्याबाबत.	४० ते ४१
१४	महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्यणकारी मंडळाकडे जमा होणाऱ्या उपकरासंबंधी संगणक प्रणाली विकसीत करणेबाबत.	४२ ते ४३
१५	महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे सन २०२१-२२ चे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास व सन २०२२-२३ च्या मूळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत.	४४ ते ४६
१६	महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे सन २०२२-२३ चे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास व सन २०२३-२४ च्या मूळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत.	४७ ते ४९
१७	महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाच्या वार्षिक जमा खर्चाच्या लेख्यास (Annual Account) मंडळाची मान्यता देणेबाबत.	५० ते ५१
१८	महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाच्या लेखाविषयक कामकाजासाठी	५२ ते ५३

पान क्र. ४ पैकी १०१

माहितीचा अधिकार अधिनियम २००५
अंतर्गत देण्यात आलेली प्रमाणीत प्रत

अ.क्र.	बैठकीचा विषय	पृष्ठ क्रमांक
	आणि सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाच्या वस्तू व सेवाकर व आयकर विषयक कामकाजासाठी सनदी लेखापाल यांची नियुक्ती करणेबाबत.	
१९	महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे सन २०२३-२४ चे सुधारित अर्थसंकल्पास व सन २०२४-२५ च्या अर्थसंकल्पास मान्यता देणेबाबत.	५४ ते ५७
२०	स्थानिक स्वराज्य संस्थांनी मंडळाचा बांधकाम उपकर वसूल करुन मंडळाकडे भरणा केल्यापोटी मागील ३ वर्षात विनामागणी (Unclaimed) उपकर वसूली शुल्क मंडळाचे जमेस घेणे आणि चालू दायित्वातून कमी करणेस मान्यता देणेबाबत.	५८ ते ५९
२१	महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांच्या अंमलबजावणीबाबत. अ. नोंदित जिवीत (सक्रिय) बांधकाम कामगाराच्या पहिल्या दोन पाल्याकरीता स्पर्धा परिक्षांच्या अभ्यासाकरीता अर्थसहाय्य निश्चित करणेबाबत विचार विनिमय करणे. ब. नोंदणी / नुतनीकरणासाठी बांधकाम कामगारांना अर्ज केल्यावर नोंदणी / नुतनीकरण अर्ज मंजूर होण्यापूर्वीच्या किंवा अर्जातील त्रुटीची पुर्तता करण्यापूर्वीच्या कालावधीत संबंधित कामगाराचा मृत्यु झाल्यास मंडळामार्फत करावयाच्या कार्यवाहीबाबत विचार विनिमय करणे. क. क्षेत्रीय कार्यालयाकडे ऑफलाईन पध्दतीने प्राप्त मृत्यु लाभाच्या प्रलंबित अर्जावर करावयाच्या कार्यवाहीबाबत विचार विनिमय करणे.	६० ते ६३
२२	महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे प्राप्त उपकर परतावा प्रकरणांना मान्यता देणेबाबत.	६४ ते ६५
२३	महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ मुख्यालय व क्षेत्रिय कार्यालयांना मंडळ कामकाजाकरीता वाहन एक वर्षाच्या कालावधीसाठी भाडे तत्वावर घेण्यास मान्यता देणेबाबत.	६६ ते ६७
२४	महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांना मध्यान्ह भोजन योजनेअंतर्गत विविध निर्णय घेणेबाबत.	६८ ते ६९
२५	महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे मा.	७०

पान क्र. ५ पैकी १०१

माहितीचा अधिकार अधिनियम २००५
अंतर्गत देण्यात आलेली प्रमाणीत प्रत

अ.क्र.	बैठकीचा विषय	पृष्ठ क्रमांक
	अध्यक्ष, मा. सदस्य व मा.सदस्य सचिव यांना विमान प्रवास अनुज्ञेय करणेबाबत.	
२६	महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ मुख्यालय व क्षेत्रिय स्तरावर मंडळ कामकाजासाठी सुधारीत आकृतीबंधास मान्यता देणेबाबत.	७१ ते ७४
२७	महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ मुख्यालयातील कामकाजाकरीता नियुक्त करण्यात आलेल्या सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या मुदतवाढीस मान्यता देणेबाबत.	७५ ते ७६
२८	दिनांक ३१.१०.२०२३ रोजीच्या शासन निर्णयाव्दारे दिनांक ०६.०९.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये नियुक्त सूचीबद्ध संस्थांकडून मनुष्यबळ नियुक्ती करणेबाबतचा शासन निर्णय रद्द करण्यात आल्याने मंडळ व क्षेत्रिय कार्यालयातील कामकाजासाठी मनुष्यबळ नियुक्तीकरीता संस्था निश्चीत करणेबाबत.	७७ ते ७८
२९	महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांना लाभाचे अर्ज (DBT) सादर करण्यासाठी प्रत्यक्ष जिल्हा सुविधा केंद्रावर उपस्थित राहून अर्ज सादर करण्याबाबत नवीन कार्यपध्दतीचा निश्चित करणेबाबत.	७९ ते ८०
३०	महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गतच्या बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतणीकरण व लाभ वाटपाबाबतची माहिती मंडळाच्या पटलावर ठेवणेबाबत.	८१ ते ८२
३१	दिनांक ०१.११.२०२० ते दिनांक ३१.०१.२०२२ या कालावधीत मा. महालेखापाल कार्यालयाकडून झालेल्या निरीक्षण लेखापरिक्षणात (Inspection Audit) उपस्थित परिच्छेदांना दिलेल्या अनुपालनास मान्यता देणेबाबत तसेच, सन २०१७-१८ ते सन २०२१-२२ या कालावधीतील कार्यक्षमता लेखापरिक्षण (Performance Audit) मध्ये उपस्थित परिच्छेदांना दिलेल्या अनुपालनास मान्यता देणेबाबत.	८३ ते ८६
३२	महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील अतिरीक्त निधी राष्ट्रीयकृत बँकेत गुंतवणुक करण्यात आलेल्या कार्यवाहीस मंजुरी देणेबाबत.	८७ ते ८९
३३	महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील उपकर जमा व योजनानिहाय खर्चास मंजुरी देणेबाबत.	९० ते ९१
३४	महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ	९२ ते ९४

माहितीचा अधिकार अधिनियम २००५
अंतर्गत देण्यात आलेली प्रमाणीत प्रत

अ.क्र.	बैठकीचा विषय	पृष्ठ क्रमांक
	यांचेकडून आर्थिक वर्ष २०२१-२२, २०२२-२३ व २०२३-२४ करीता कामगार कल्याण मंडळ, प्रभादेवी यांनी निधी व सभासद वर्गणी मिळणेबाबत विचारविनिमय करणे.	
३५	महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांसाठी BOMT (Build Operate Manage Transfer) या तत्वावर आरोग्य तपासणी केंद्र व हॉस्पीटल उभारणी करणेबाबत.	९५ ते ९९
३६	मा. अध्यक्ष यांच्या मान्यतेने आयत्या वेळेचे विषय	१०० ते १०१

माहितीचा अधिकार अधिनियम २००५
अंतर्गत देण्यात आलेली प्रमाणीत प्रत

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दिनांक ०२.०७.२०२४ रोजी संपन्न झालेल्या ६० व्या बैठकीचे इतिवृत्त.

मा. ना. श्री. सुरेश (भाऊ) दगडू खाडे, मंत्री (कामगार) तथा मा.अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची ६० वी बैठक मंगळवार दिनांक ०२.०७.२०२४ रोजी सकाळी ११.०० वा. यांचे मा. मंत्री (कामगार) तथा अध्यक्ष यांचे दालन नरीमन भवन, कफ परेड, कुलाबा, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य बैठकीस उपस्थित होते.

अ.क्र.	सदस्याचे नाव	पद
१.	मा. ना. श्री. सुरेश (भाऊ) खाडे	मा. मंत्री (कामगार) तथा मा.अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई
२.	मा. श्रीम. विनिता वेद सिंगल, प्रधान सचिव, कामगार	शासकीय प्रतिनिधी
३.	मा. डॉ. एच. पी. तुम्मोड, कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य	शासकीय प्रतिनिधी
४.	मा. श्री. दिपक पोकळे, उप सचिव काम-७	शासकीय प्रतिनिधी
५.	मा. श्री. विवेक शंकर कुंभार	सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

बैठकीच्या सुरुवातीस मंडळ सचिव यांनी मा. मंत्री (कामगार) तथा मा. अध्यक्ष, मा. प्रधान सचिव, कामगार विभाग मा. कामगार आयुक्त, मंडळ सदस्य या उपस्थितांचे स्वागत केले व बैठकीत करावयाच्या विषयांशी संबंधित कागदपत्रांचा संचाच्या प्रती सर्व उपस्थित सदस्यांना वाटप करण्यात आली.

तद्नंतर विषयसुचीनुसार चर्चेस सुरुवात करण्यात आली.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५
अंतर्गत देण्यात आलेली प्रमाणीत प्रत

विषय क्र.०१ :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांकरीता गृहपयोगी वस्तु संचाचा पुरवठा करणेबाबत.

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, मंडळाच्या दिनांक ०३.०६.२०१९ रोजीच्या बैठकीत नोंदीत बांधकाम कामगारांना गृहपयोगी भाडयांचा संच व कपडयाचा संच वितरीत करणेबाबतचा प्रस्ताव मंडळाच्या बैठकीत पारित करण्यात आला होता.तथापि, खादी ग्रामोद्योग विभागाच्या दिनांक १७.१०.२०१९ रोजीच्या पत्रानुसार कपडयांचा संच वगळून केवळ गृहपयोगी वस्तू संच वितरीत करणेबाबत निर्णय मंडळाच्या दिनांक १३.०७.२०२० रोजीच्या ५५ व्या बैठकीत घेण्यात आला होता व त्यानुषंगाने निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती.

०२. केंद्र शासनामार्फत अधिनियमाच्या कलम ६० अंतर्गत वस्तु स्वरूपात सहाय्य वितरीत न करणेबाबत आदेश पारीत करण्यात आला होता त्यामुळे निविदा प्रक्रिया स्थगित करण्यात आली होती. दरम्यानच्या कालावधीत मा. मंत्री (कामगार) तथा मा.अध्यक्ष यांना नोंदीत बांधकाम कामगारांना वितरीत करावयाच्या गृहोपयोगी वस्तू संचाबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यास मा मा. मंत्री (कामगार) तथा मा.अध्यक्ष यांनी मान्यता प्रदान केली होती. सदर मान्यतेच्या अनुषंगाने प्रस्ताव शासनास निर्णयार्थ दिनांक २४.११.२०२३ अन्वये सादर करण्यात आला होता. तसेच उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाच्या दिनांक ३०.११.२०२३ रोजीच्या अधिसूचने अन्वये महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगाराचे व सेवाशर्तीचे विनियमन) (सुधारणा) नियम २०२३ अधिसूचित करण्यात आले असून, त्यामध्ये गृहपयोगी वस्तू संच पुरवठा करणेबाबतचे कार्य नमूद असल्याने सदर प्रस्तावास शासनाने खालीलप्रमाणे दिनांक ०१.१२.२०२३ अन्वये मान्यता प्रदान केली आहे."मंडळाने नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांकरीता गृहपयोगी वस्तू संचाचा पुरवठा करण्याबाबत राबविलेल्या निविदा प्रक्रियेत गट क्र. ०१ (नागपूर व औरंगाबाद) व गट क्र.०२ (मुंबई, नाशिक, पुणे व अमरावती) करीता मे. मफतलाल इंडस्ट्रीज लिमिटेड, मुंबई यांनी सादर केलेले दर रू.८८२०/- (वस्तू व सेवा कर वगळून) हे सर्वात न्यूनत्तम (L१) दर असल्याने खरेदी समितीने मान्यता दिल्याप्रमाणे मे. मफतलाल इंडस्ट्रीज लिमिटेड, मुंबई यांना सदर कामाकरीता सादर केलेल्या दरास शासन मान्यता प्रदान करण्यात आली आहे. तसेच मंडळामार्फत राबविलेली निविदा प्रक्रिया आणि संबंधित निविदा (Bid) यांची वैधता कालावधीत तपासण्याच्या आणि निविदेतील दरात कोणत्याही प्रकारची वाढ होणार नाही या बाबींची खातरजमा करून पुढील योग्य ती कार्यवाही मंडळ स्तरावरून करण्यात यावी." अशी शासन मान्यता प्रदान करण्यात आली आहे. उपरोक्त मान्यतेनुसार संबंधित संस्थेसोबत करारनामा करून त्यांना विहित कार्यपध्दतीचा अवलंब करून दिनांक २९.०१.२०२४रोजी पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे.

पान क्र. ९ पैकी १०१

माहितीचा अधिकार अधिनियम २००५
अंतर्गत देण्यात आलेली प्रमाणीत प्रत

ठराव क्र.६०(१)/२०२४ :-

१. सुधारित नियम अधिसूचित झाल्याने, खरेदी समितीच्या बैठकीतील निर्णयानुसार गट क्र.०१ व गट क्र.०२ करीता मे. मफतलाल इंडस्ट्रीज लिमिटेड, मुंबई यांनी सादर केलेल्या न्यूनत्तम दर स्विकृतीस शासन मान्यतेने केलेल्या कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२. मे. मफतलाल इंडस्ट्रीज लिमिटेड, मुंबई यांच्यासोबत करारनामा करणे व नियुक्त संस्थेस पुरवठा आदेश देण्याबाबत करण्यात आलेल्या कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम २००५
अंतर्गत देण्यात आलेली प्रमाणीत प्रत

विषय क्र.०२ :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत कडील दिनांक १९.०५.२०२३ नंतर नव्याने नोंदणी/नुतणीकरण झालेल्या तथापि अद्याप संच वाटप न झालेल्या ३,९१,८५३ नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांना अत्यावश्यक संच व सुरक्षा संच वितरीत करणेबाबत.

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, मंडळामार्फत नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांना अत्यावश्यक संच व सुरक्षा संचाचे वाटप करण्यात येत होते. लगतच्या मुदतवाढ व लक्ष्यांकवाढ निर्णयाबाबतच्या दिनांक १९.०५.२०२३ रोजीच्या कार्यारंभ आदेशाच्या अनुषंगाने, ९,१४,५७७ लक्ष संच वाटप दिनांक ३१.०३.२०२४ पर्यंत पुर्ण करण्याचे लक्ष्यांक देण्यात आले होते.तथापि, सदरचे लक्ष्यांक जवळपास पुर्ण झाले असून, ३,९१,८५३ लक्ष संचाची नवीन मागणी निर्माण झाली होती. तसेच दिनांक ३०.११.२०२३ रोजी नव्याने अधिसूचित झालेल्या नियमामध्ये सुरक्षा संच व अत्यावश्यक संचाचा अंतर्भाव आहे. तथापि, मा.लोकसभेच्या आचारसंहिता कालावधीत नवीन निविदा प्रक्रिया करून संच वाटप करणे शक्य नसल्याने व पुरवठादार कार्यरत दरामध्ये पुरवठा करण्यास पुरवठा करण्यास तयार असल्याने एकूण ३,९१,८५३ लक्ष सुरक्षा व अत्यावश्यक संच वाटपाकरीता लक्ष्यांकवाढ व मुदतवाढ देण्याबाबतचा प्रस्ताव मा.मंत्री (कामगार) तथा मा.अध्यक्ष यांना सादर करण्यात आला होता.

२. मा.मंत्री (कामगार) तथा मा.अध्यक्ष यांच्या मान्यतेअंती प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला होता. त्यास शासनाने दिनांक ०१.०३.२०२४ रोजीच्या पत्रान्वये नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांना ३,९१,८५३ संच (अत्यावश्यक संच व सुरक्षा संच प्रत्येकी) वाटपाचे अंतिम नवीन लक्ष्यांक पुर्ण करण्यास दिनांक ३१.०८.२०२४ अखेर अंतिम मुदतवाढ देण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात आली आहे. तसेच दरम्यानच्या कालावधीत सुरक्षा संच व अत्यावश्यक संच वाटपाच्या कामाकरीता नवीन ई-निविदा प्रक्रिया राबविण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात आली आहे. त्यास अनुसरून संबंधित संस्थासोबत करारनामा करून त्यांना विहित कार्यपध्दतीचा अवलंब करून दिनांक १५.०३.२०२४ रोजी पुरवठा आदेश देण्यात आलेले आहे.

ठराव क्र. ६० (२)/२०२४ :-

दिनांक १९.०५.२०२३ नंतर नव्याने नोंदणी/नुतणीकरण झालेल्या तथापि, अद्याप संच वाटप न झालेल्या ३,९१,८५३ बांधकाम कामगारांना सुरक्षा व अत्यावश्यक संच वाटपाबाबत शासन मान्यतेने केलेल्या कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम २००५
अंतर्गत देण्यात आलेली प्रमाणीत प्रत

विषय क्र.०३ :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतणीकरण व लाभ वाटपाच्या मदतीसाठी तालुका स्तरावर कामगार सुविधा केंद्र स्थापन करणेबाबत.

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, मंडळामार्फत बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व लाभ वाटप सद्यस्थितीत ऑनलाईन पध्दतीने केले जात आहे. सदर कार्यवाहीकरीता मंडळ स्तरावर एकात्मिक संगणकीय प्रणाली विकसित करण्यात आली आहे त्याकरीता www.mahabocw.in हे संकेतस्थळ विकसित करण्यात आले आहे. बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व लाभ वाटप सुलभरित्या होण्याकरीता जिल्हा स्तरावर जिल्हा सुविधा केंद्राची स्थापन करण्यात आली आहे. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) नियम, २०२३ अंतर्गत नियमांमध्ये सुधारणा करण्यात आली असून बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व लाभ वाटपाकरीता तालुका सुविधा केंद्र स्थापन करणे ही बाब नमूद आहे.

२. दैनंदिन बांधकाम कामगारांची संख्या वाढत असल्यामुळे तालुकास्तरावरील बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व लाभ वाटपास गती देण्याकरीता तालुकास्तरावर सुविधा केंद्र स्थापन करणे प्रस्तावित आहे. तरी प्रस्तावितप्रमाणे बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व लाभ सुलभरित्या होणेकरीता तालुका स्तरावर कामगार सुविधा केंद्र स्थापनेची (सेतू) कार्यवाही ई- निविदा पध्दतीने करणे व ई- निविदा पध्दतीने नियुक्त संस्थेमार्फत पुढील कार्यवाही करणेबाबतचा प्रस्ताव मा. अध्यक्ष तथा मंत्री (कामगार) यांना सादर करण्यात आला होता. त्यास मा. अध्यक्ष तथा मंत्री (कामगार) यांनी मान्यता प्रदान केली आहे. वरीलप्रमाणे मान्यतेनुसार दिनांक ०१.१२.२०२३ अन्वये शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावास उद्योग,उर्जा, कामगार व खनिकर्म विभाग यांच्या दिनांक १४.१२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये मंडळातील बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व लाभ वाटपाच्या मदतीसाठी तालुका स्तरावर कामगार सुविधा केंद्र स्थापन करणेच्या कामासाठी ई- निविदा पध्दतीने कार्यवाही करण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. तद्नंतर खरेदी समितीमार्फत ई-निविदा प्रारूप अंतिम करून प्रसिध्द करण्यात आले.महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व लाभ वाटपाच्या मदतीसाठी तालुका स्तरावर कामगार सुविधा केंद्र स्थापन करणे या कामाच्या ई-निविदेअंतर्गत मे. आरसीएस इन्फोटेक प्रा.लि. या न्यूनत्तम निविदाकारांनी सादर केलेले दर रू. ३२१,६२,१५,७३४/- (कर वगळून) या अंतिम दरास मा. मंत्री (कामगार) मा. अध्यक्ष महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ मुंबई यांनी मान्यता प्रदान केली असून, शासन मान्यतेस्तव प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. सदर प्रस्तावास

पान क्र. १२ पैकी १०१

माहितीचा अधिकार अधिनियम २००५
अंतर्गत देण्यात आलेली प्रमाणीत प्रत

शासनाने दिनांक १४.०३.२०२४रोजीच्या पत्रान्वये मान्यता प्रदान केली आहे. सदर मान्यतेच्या अनुषंगाने मे. आरसीएस इन्फोटेक प्रा.लि. या संस्थेसोबत करारनामा करून दिनांक १५.०३.२०२४ रोजी पुरवठा आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

ठराव क्र. ६० (३)/२०२४ :-

बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतणीकरण व लाभ वाटप सुलभरीत्या होण्याकरीता तालुकास्तरावर कामगार सुविधा केंद्र स्थापनेबाबत शासन मान्यतेने केलेल्या कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम २००५
अंतर्गत देण्यात आलेली प्रमाणीत प्रत

विषय क्र.०४:- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांकरीता आरोग्य तपासणी चाचण्या सुधारीत करणे तसेच, "तपासणी ते उपचार आरोग्य योजना" राबविणेबाबत.

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, मंडळाकडील आरोग्य तपासणी योजनेअंतर्गत मंडळातील नोंदीत (सक्रिय) जिवीत बांधकाम कामगारांची व त्यांच्या अवलंबित कुटुंबामधील यथास्थिती पती /पत्नी आणि त्यांची १० वर्षावरील दोन अविवाहित अपत्ये यांची मे. एच. एच. एल. लाईफकेअर लिमिटेड या सेवापुरवठादार संस्थेमार्फत २३ आरोग्य तपासणी चाचण्या प्रतिव्यक्ती रू.३९०० दराने करण्याबाबत शासन मान्यता प्राप्त झालेली आहे. शासन मान्यतेनुसार मंडळ आणि मे. एच. एच. एल. लाईफकेअर लिमिटेड यांच्यामध्ये दिनांक २९.०६.२०२२ ते दिनांक २७.०६.२०२७ या पाच वर्षाच्या कालावधीकरीता करारनामा करण्यात आला आहे. त्यानुसार मंडळाच्या दिनांक ०१.०३.२०२३ व दिनांक ०२.०५.२०२३ अन्वये सेवा पुरवठादार संस्थेस कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

२. मंडळाकडील नोंदीत (सक्रिय) जीवित बांधकाम कामगार व त्यांचेवर अवलंबित कुटुंबामधील यथास्थिती पती/पत्नी आणि त्यांची १० वर्षावरील २ अविवाहीत अपत्ये यांचेकरीता "तपासणी ते उपचार" (Test to Treat) आरोग्य योजना राबविणेबाबतचा प्रस्ताव मा.मंत्री (कामगार) तथा मा.अध्यक्ष यांना सादर करण्यात आला होता मा.मंत्री (कामगार) तथा मा.अध्यक्ष यांच्या मान्यतेअंती दिनांक १८.०५.२०२३ रोजीच्या पत्रान्वये शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला होता.शासनाच्या दिनांक ३१.०५.२०२३ रोजीच्या पत्रान्वये मंडळाकडील नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांकरीता तपासणी ते उपचार (Test to Treat) योजना राबविण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात आली होती तसेच सदर योजना राबविण्याकरीता मे. एच. एच. एल. लाईफकेअर लिमिटेड (भारत सरकार उद्योग) यांच्या नियुक्तीस मान्यता प्रदान करण्यात आली होती.सदर शासन मान्यतेस अनुसरून सदर योजनेसंबंधित खालील बाबीच्या अनुषंगाने मंडळाने शासनास मान्यता घेण्यात यावी असे कळविण्यात आले होते.

अ) तपासणी ते उपचार (Test to Treat) या योजनेची एकंदरीत रूपरेषा

ब) सदर योजनेचे सविस्तर निकष (अटी व शर्ती)

क) सदर योजना राबविण्याकरीता मे. एच. एच. एल. लाईफकेअर लिमिटेड (भारत सरकार उद्योग) यांच्यासोबत करावयाचे कराराचे प्रारूप

३. उपरोक्त मुद्याबाबतची माहिती मंडळाच्या दिनांक ११.०७.२०२३ रोजीच्या पत्रान्वये शासनास सादर करण्यात आली होती.मंडळाकडील नोंदीत (सक्रिय) जिवीत बांधकाम कामगारांची व त्यांच्या अवलंबित कुटुंबियासाठी "तपासणी ते उपचार" आरोग्य योजना मे.

पान क्र. १४ पैकी १०१

माहितीचा अधिकार अधिनियम २००५
अंतर्गत देण्यात आलेली प्रमाणीत प्रत

एच. एच. एल. लाईफकेअर लिमिटेड या सेवापुरवठादार संस्थेमार्फत राबविण्यास शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दिनांक ०७.०८.२०२३ अन्वये मान्यता प्रदान करण्यात आली आहे.दरम्यान मंडळाच्या दिनांक ०८.०१.२०२४ रोजीच्या पत्रान्वये "नोंदीत, सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारास सार्वजनिक आरोग्य विभागाची "महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना" अथवा कामगार विभागाची "तपासणी ते उपचार" आरोग्य योजना यापैकी एक योजना निवडण्याच्या पर्यायाबाबतचा सुधारीत प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला होता. प्रस्तावित केल्याप्रमाणे उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन शुध्दीपत्रक दिनांक ०९.०१.२०२४ अन्वये शासन मान्यता प्राप्त झाली आहे.मंडळाच्या दिनांक १२.०१.२०२४ रोजीच्या पत्रान्वये तपासणी ते उपचार आरोग्य योजनेचा कालावधी दिनांक ०९.०१.२०२४ रोजीचा शासन निर्णय निर्गमित झाल्यापासून पाच वर्ष करणे, नोंदीत बांधकाम कामगाराच्या १० वर्षाखालील अपत्यास अपघात व आजारावरील खर्चाची प्रतिपुर्ती करण्यास विशेष बाब म्हणून मान्यता, सदर योजनेची कमाल मर्यादा नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगार तसेच त्याच्या कुटुंबामधील पती अथवा पत्नी व प्रथम दोन अपत्ये यापैकी प्रत्येक घटकास प्रति वर्षात रू.७.०० लक्ष इतकी निश्चीत करणेबाबत मार्गदर्शनार्थ प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला होता त्यास उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या दिनांक ०७.०२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये मान्यता प्रदान केली आहे.मंडळाच्या दिनांक ०१.०२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये सदर योजतनेअंतर्गत करावयाच्या चाचण्या, रूग्णालय भरतीबाबतच्या बाबी, औषोधोपचाराच्या बाबी, निश्चीत करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला होता. त्यास उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या दिनांक २१.०२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये मान्यता प्रदान करण्यात करण्यात आलेली आहे."तपासणी ते उपचार" आरोग्य योजना अंमलबजावणीस वेळोवेळी प्राप्त शासन मान्यते अन्वये मंडळ व मे. एच. एच. एल. लाईफकेअर लिमिटेड (भारत सरकार उद्योग) यांच्यामध्ये सदर प्रकरणी दिनांक २१.०२.२०२४ रोजी करारनामा करण्यात आला असून मे. एच. एच. एल. लाईफकेअर लिमिटेड (भारत सरकार उद्योग) यांना दिनांक दिनांक २१.०२.२०२४ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले आहे.

ठराव क्र.६० (४)/२०२४ :-

१. **नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगार व त्यांच्या कुटुंबियांकरीता आरोग्य तपासणीच्या चाचण्या सुधारीत करून रू.३९००/- मध्ये एकूण २३ चाचण्या करण्याबाबत शासन मान्येतेने केलेल्या कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**
२. **नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगार व त्यांच्या कुटुंबियांकरीता " तपासणी ते उपचार (Test to Treat) योजना" सुरू करण्याबाबत शासन मान्येतेने केलेल्या कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

पान क्र. १५ पैकी १०१

माहितीचा अधिकार अधिनियम २००५
अंतर्गत देण्यात आलेली प्रमाणीत प्रत

३. नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारास सार्वजनिक आरोग्य विभागाची महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य योजना अथवा कामगार विभागाची तपासणी ते उपचार आरोग्य योजना या दोन योजनापैकी एक योजना निवडण्याचा विकल्प घेण्याबाबतची सुविधा देण्याबाबत शासन मान्येतेने केलेल्या कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

४. "तपासणी ते उपचार" आरोग्य योजनेचा कालावधी दिनांक ०९.०१.२०२४ रोजीचा शासन निर्णय निर्गमित झाल्यापासून पाच वर्ष करणे, नोंदीत बांधकाम कामगाराच्या १० वर्षाखालील अपत्यास अपघात व आजारावील खर्चाची प्रतिपुर्ती करण्यास विशेष बाब म्हणून मान्यता, सदर योजनेची कमाल मर्यादा नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगार तसेच त्याच्या कुटुंबामधील पती अथवा पत्नी व प्रथम दोन अपत्ये यापैकी प्रत्येक घटकास प्रति वर्षात रू.७.०० लक्ष इतकी निश्चीत करणेबाबत शासन मान्येतेने केलेल्या कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

५. तपासणी ते उपचार" आरोग्य योजनेअंतर्गत करावयाच्या चाचण्या, रूग्णालय भरतीबाबतच्या बाबी, औषोधोपचाराच्या बाबी, निश्चीत करण्याबाबत प्रस्ताव शासनास सादर केलेल्या कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम २००५
अंतर्गत देण्यात आलेली प्रमाणीत प्रत

विषय क्र.०५:- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगाराचे व सेवाशर्तीचे विनियमन) (सुधारणा) नियम २०१३ अधिक्रमित करून, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगाराचे व सेवाशर्तीचे विनियमन) (सुधारणा) नियम २०२३ करणेबाबत

मंडळ सचिव यांनी सादर केले की, इमारत व इतर बांधकाम व्यवसायामध्ये हिताचे रक्षण करण्याच्या दृष्टीने केंद्र शासनाने इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियम (रोजगार नियमन व सेवाशर्ती) लागू केला असून त्याअंतर्गत महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) नियम, २००७ अस्तीत्वात आले आहे दिनांक ११.१०.२०१३ रोजीच्या अधिसुचनेव्दारे महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) (सुधारणा) नियम २०१३ प्रकाशीत करण्यात आले असून त्याव्दारे सद्यस्थितीत बांधकाम कामगारांकरीता राबविण्यात येणाऱ्या लाभाबाबतच्या योजना तयार करण्यात आल्या आहेत. त्यामुळे सदरची अधिसुचना अधिक्रमित करून नविन सुधारणा प्रकाशित करणे प्रस्तावित आहे.

२. केंद्र शासनाच्या इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियम (रोजगार नियमन व सेवाशर्ती), १९९६ मधील कलम (६२) व (४०) नुसार नियम करण्याचे अधिकार राज्य शासनास आहे तज्ञ समितीच्या शिफारशीनुसार महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) (सुधारणा) नियम २०१३ अधिक्रमित करून महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) (सुधारणा) नियम २०२३ अधिसूचित करणेबाबतचा प्रस्ताव दिनांक २२.०६.२०२३ रोजी शासनास सादर करण्यात आला होता. त्यानुषंगाने दिनांक ३०.११.२०२३ रोजीच्या अधिसुचनेअन्वये महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) (सुधारणा) नियम २०२३ प्रकाशीत करण्यात आले आहे.

ठराव क्र. ६० (५)/२०२४ :-

तज्ञ समितीच्या महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगाराचे व सेवाशर्तीचे विनियमन) (सुधारणा) नियम २०१३ अधिक्रमित करून, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगाराचे व सेवाशर्तीचे विनियमन) (सुधारणा) नियम २०२३ करणेबाबत शासन मान्येतेने केलेल्या कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम २००५
अंतर्गत देण्यात आलेली प्रमाणीत प्रत

विषय क्र.०६ :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत मुख्यालय व अधिनस्त जिल्हा कार्यालयाच्या अभिलेख कक्षाचे स्कॅनिंग ॲन्ड डिजिटायझेशन करून घेणे व कॉम्पेक्टर स्टोरेज उपलब्ध करून देणेबाबत.

मंडळ सचिव यांनी सादर केले की, राज्यातील कामगार विभागाच्या कार्यालयातील अभिलेख सुस्थितीत स्कॅनिंग करून डिजिटल कॉपेक्टरमध्ये जतन करून ठेवण्याबाबतच्या प्रस्तावास मा.मंत्री (कामगार) तथा मा.अध्यक्ष यांनी प्रदान केलेल्या मान्यतेस अनुसरून उद्योग, उर्जा व कामगार विभाग यांच्या दिनांक २८.१२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये मंडळ मुख्यालय व अधिनस्त जिल्हा कार्यालयाच्या अभिलेख कक्षाचे कॉम्पॅक्टर स्टोरेज व स्कॅनिंग ॲण्ड डिजिटायझेशन याकरीता ई- निविदा प्रसिध्द करणे या विषयी इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या बैठकीत पारित झालेल्या ठरावानुसार व विहीत कार्यपध्दती/ नियमानुसार कार्यवाही करणेबाबत शासन मान्यता प्रदान केली आहे.

२. सदर मान्यतेच्या अनुषंगाने स्थानापन्न संचालक शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय पुणे यांना तांत्रिक मान्यता व माहिती मिळणेबाबत मंडळाच्या दिनांक १८.११.२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. त्याअनुषंगाने स्थानापन्न संचालक शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय पुणे यांनी त्यांच्या दिनांक १९.११.२०२२ रोजीच्या पत्रान्वये तांत्रिक मान्यता देण्यात आली आहे.स्थानापन्न संचालक शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय पुणे यांच्या दिनांक १९.११.२०२२ रोजीच्या पत्रात कळविलेल्या निकषाच्या अनुषंगाने जिल्हा सुविधा केंद्रात अभिलेख कक्ष अद्यावतीकरणास जिल्हा सुविधा केंद्राच्या उपलब्ध जागेत कॉपेक्टर स्टोरेज व स्कॅनिंग ॲण्ड डिजिटायझेशन करण्याबाबत कार्यालय निहाय उपलब्ध अभिलेख कक्षाची जागा व अभिलेख व्याप्ती लक्षात घेऊन कॉम्पेक्टरची संख्या निश्चित करून मंडळ कार्यालयामार्फत पत्रव्यवहार करण्यात आला आहे.शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग दिनांक २४.०८.२०१७ मधील सूचना क्र.०१ नुसार केंद्र शासनाने विकसित केलेल्या गव्हर्मेंट ई- मार्केटप्लेस (GeM) पोर्टलची कार्यपध्दती राज्य शासनास वस्तू व सेवा खरेदी करण्यासाठी स्विकृत करण्यास मान्यता देण्यात आली आहे आणि शासन निर्णय दिनांक ०१.१२.२०१६ मधील परिच्छेद क्र.३.२.२ व ३.२.३ मध्ये सुधारणा करून GeM पोर्टलवर खरेदीसाठी उपलब्ध असलेल्या वस्तू व सेवांचे दोन किंवा त्यापेक्षा जास्त पुरवठादार असतील तर सदर वस्तू व सेवांची GeM पोर्टलवर खरेदी करण्यास राज्य शासन, राज्य शासनाचे सार्वजनिक उपक्रम, स्थानिक स्वराज्य संस्था, विधानसभेच्या कायदयाखाली स्थापित कोणतीही संस्था किंवा मंडळ किंवा महामंडळ इत्यादी कार्यालयांना बंधनकारक करण्यात आले आहे. त्यानुसार प्रस्तावित Mobile Compactor Storage Syestem and Document Management System (मोबाईल कॉपेक्टर स्टोरेज व अभिलेख स्कॅनिंग ॲण्ड डिजिटायझेशन करून घेणे) या कामाचे GeM पोर्टलवरील पुरवठादाराकडून वस्तू व

पान क्र. १८ पैकी १०१

माहितीचा अधिकार अधिनियम २००५
अंतर्गत देण्यात आलेली प्रमाणीत प्रत

१९	F०५	अटल बांधकाम कामगार आवास योजनेत (ग्रामीण) आवास योजनेत पात्र नोंदीत बांधकाम कामगारांना मंडळामार्फत रु.२ लक्ष अनुदान देणे प्रस्तावित आहे.	०.००	०.००	१०.००

माहितीचा अधिकार अधिनियम २००५
अंतर्गत देण्यात आलेली प्रमाणीत प्रत

		वस्तू संच (Essential Kit) पुरविणेबाबत			
३१	S१०	नोंदणी अभियान, लाभवाटप कार्यक्रम व योजनेची प्रसार व प्रसिध्दी	१६४.१९	११२४९.१९	१२०००.००
		मंडळाकडील विविध कल्याणकारी योजनांची सर्वसमावेशक माहिती पुस्तिका छपाई	०.००	१०००.००	५९००.००
		एकुण	१६४.१९	१२२४९.१९	१७९००.००
३२	S११	बांधकाम ठिकाणी नोंदित बांधकाम कामगारांची आरोग्य तपासणी ते उपचार योजना	९३२६.४७	५१८७७.३१	१००००.००
३३	S१२	कामगार कल्याण मंडळाचे उपक्रम व कार्यक्रमाचा लाभ बांधकाम कामगारांना देणे.	०.००	०.००	१.००
३४	S१३	नोंदित बांधकाम कामगारांच्या एका मुलीच्या विवाहाकरिता रू. ५१०००/- एवढे अर्थसहाय्य देणे.	७४६.६४	३७५२.३३	४५९०.००
३५	S१४	गृहपयोगी वस्तु संच वाटप	०.००	५०००.००	१००००.००
३६	S१५	इमारत बांधकाम कामगारांसाठी शेड (कामगार नाका) बांधणे	०.००	१.००	१०००.००
३७	S१६	जिल्हा कामगार सुविधा केंद्र स्थापन करणे (DBWFC)	१६४.३९	१५४.१८	३५०.००
३८	S१७	तालुका इमारत कामगार सुविधा केंद्र (TBWFC) स्थापन करणे	०.००	१.००	१२५००.००
३९	S१८	मंडळाकडील बांधकाम कामगारांच्या तक्रारीचे निवारण करण्याकरीता हेल्पलाईन सेवा कार्यान्वित करणे.	०.००	०.००	१००.००
अ.	**विविध कल्याणकारी योजनांवरील अपेक्षित खर्च**		**३९२२५८.२२**	**४१४९१३.९६**	**४३१५५६.०५**

७. मंडळाचा प्रशासकीय बाबींवरील खर्च

अ. **प्रशासकीय बाबीवरील खर्च :** मंडळामार्फत करण्यात येत असलेल्या प्रशासकीय खर्चामध्ये एकात्मिक कल्याणकारी मंडळ व्यवस्थापन प्रणाली (IWBMS), जिल्हा कामगार सुविधा केंद्र स्थापनेवरील खर्च (WFC), बाहय यंत्रणेद्वारे नियुक्त कर्मचाऱ्यांचे वेतन भत्ते, प्रतिनियुक्तीवरील अधिकाऱ्यांचे वेतन, भत्ते प्रवास खर्च, मंडळाच्या बैठकांचा खर्च, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक (CAG) यांचे लेखापरीक्षण फी, कार्यालयीन भाडे, मंडळावर

माहितीचा अधिकार अधिनियम २००५
अंतर्गत देण्यात आलेली प्रमाणित प्रत

इतर खर्च (ब)				
A२६	मंडळाच्या निविदा सुचनांच्या जाहिरातीवरील खर्च	१.१९	०.६२	०.५०
A३०	मा. महालेखापाल व सनदी लेखापरिक्षण शुल्क	६.२९	४.५४	५.००
	विधी सल्लागार फी	६.७०	४.३०	५.००
A५०	इतर खर्च	६.७३	५.५१	६.००
	बँक शुल्क व लॉकर खर्च	२.६२	१.६०	२.००
	कॉम्पक्टर खरेदी	०	२३१२५.२०	७५००.००
	डॅश बोर्ड विकसित करणे	०	१५४०.२७	१८.९६
	सेस कलेक्टिंग एजन्सी	०	०.००	१२००.००
	एकूण इतर खर्च (ब)	२३.५३	२४६८२.०४	८७३७.४६
	प्रशासकीय खर्च एकूण (अ+ब)	६३२६.६८	२१९४८.३१	१४९१७.९६

क) अधिनियमातील तरतूदीनुसार उपकर परतावा

(रूपये लाखात)

अ. क्र.	खर्चाची बाब	सन २०२२-२३ मधील प्रत्यक्ष खर्च	सन २०२३-२४ खर्चाचे सुधारित अंदाज खर्च	सन २०२४-२५ मुळ अंदाज
C०१	उपकर जमा रक्कमेपोटी देय प्रशासकीय खर्चाची (१%) तरतूद .	१.५८	२४.०५	३०.००
C०२.	चुकीने/अनावधानाने मंडळाच्या खाती जमा, उपकराच्या सुधारित परिगणनेनुसार करावयाचा परतावा.	३९.७१	१०८०.५७	५००.००
	एकूण उपकर परतावा (क)	४१.२९	११०४.६२	५३०.००

माहिती अधिकार अधिनियम २००५
अंतर्गत पुरवण्यात आलेली प्रमाणित प्रत

माहितीचा अधिकार अधिनियम २००५
अंतर्गत देण्यात आलेली प्रमाणित प्रत

RNI No. MAHBIL /2009/37831
Reg. No. MH/MR/South-339/2011-13

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार–ब

वर्ष ५, अंक ८६(२)] सोमवार, ऑक्टोबर २१, २०१३/आश्विन २९, शके १९३५ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक १४३

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

INDUSTRIES, ENERGY AND LABOUR DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated 11th October 2013

NOTIFICATION

BUILDING AND OTHER CONSTRUCTION WORKERS (REGULATION OF EMPLOYMENT AND CONDITIONS OF SERVICE) ACT, 1996.

No. Emarat 2013/CR 104/Lab-7(A).—In exercise of the powers conferred by section 62 read with sub-section (*1*) of section 22 of the Building and Other Construction Workers (Regulation of Employment and Conditions of Service) Act, 1996 (27 of 1996), the Government of Maharashtra, after consultation with the Expert Committee constituted under section 5 of the said Act, hereby makes the following rules to amend the Maharashtra Building and Other Construction Workers (Regulation of Employment and Conditions of Service) Rules, 2007, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Building and Other Construction Workers (Regulation of Employment and Conditions of Service) (Amendment) Rules, 2013.

2. For rule 45 of the Maharashtra Building and Other Construction Workers (Regulation of Employment and Conditions of Service) Rules, 2007, the following rule shall be substituted, namely:—

"45. *Functions of the Board.*—(*1*) The Board may, by resolution, subject to the availability of Funds, provide the financial assistance to the beneficiary for the following purposes to such extent, as it deems fit, namely :—

(*i*) The following financial assistance for the education of children of the beneficiaries, namely :-

(*a*) for education of two female children studying in I to X Std. in the Government recognized schools, for every educational year;

(*b*) for two children securing minimum 50 % or more marks in X and XII standard examination;

(*c*) for two children studying in I, II and III year of graduation, towards admission fees, purchase of books and educational material, for every educational year;

(*d*) for two children studying for medical and engineering courses in the Government recognized Medical and Engineering Colleges and Institutes respectively, for every educational year;

(*e*) for two children studying from XII standard upto graduation as an encouragement, for every educational year.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५
अंतर्गत देण्यात आलेली प्रमाणीत प्रत

(*ii*) Subject to the terms and conditions as may be determined by the State Government, the medical expenses such as expenses for medical treatment, medication, hospitalization, surgery charges, doctor's fees, follow-up treatment, etc., incurred by the beneficiary, his spouse, his children below the age of 18 years and dependent parents, for the treatment of major ailments like heart disease, paralysis, tuberculosis, cancer, etc. and for such other ailments declared as major ailments by the State Government, from time to time.

(*2*) The Board may, by resolution, subject to the availability of Funds, also make the provisions for the following other welfare measures and facilities under clause (*h*) of sub-section (*1*) of section 22 of the said Act, to such extent, as it may deem fit, namely :—

(*a*) premium under JanashreeBimaYojana of LIC of India payable for every beneficiary;

(*b*) a financial assistance for natural delivery and delivery by caesarean operation to the wife of the beneficiary;

(*c*) a Family Welfare financial assistance to the only female child, where the beneficiary's husband or wife has undergone family planning operation after giving birth to only female child;

(*d*) a financial assistance to the beneficiary who has suffered 75% or more permanent disability due to accident while in service;

(*e*) an immediate funeral financial assistance to the nominee of the deceased beneficiary;

(*f*) per month financial assistance for a period of five years to the widow or widower of the beneficiary who died during the course of employment;

(*g*) one time financial assistance to the legal heir of the deceased beneficiary who died during the course of employment;

(*h*) supply of articles of daily needs, to the beneficiary;

(*i*) travel allowance to the beneficiary and his family members, *viz.* spouse and two children below the age of eighteen years, to the extent of 1,000 kilometers by the Maharashtra State Road Transport Corporation (M.S.R.T.C.) bus, once in a year;

(*j*) grant for meeting expenses of the first registered marriage of beneficiary;

(*k*) skill up-gradation training for beneficiary with stipend;

(*l*) establishment of training academy in the State, for the beneficiaries as per the directions of the State Government issued in this behalf, from time to time; and

(*m*) per year contribution of Rs.1,000/- to New Pension Scheme (NPS) account opened by the beneficiary under the Swavlamban Pension Scheme of the Government of India. ".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

ARVIND KUMAR,
Principal Secretary (Labour) to Government

माहितीचा अधिकार अधिनियम २००५
अंतर्गत देण्यात आलेली प्रमाणीत प्रत

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI

नमुना 'अ' जन माहिती महिमर

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

पाचवा मजला, एमएमटीसी हाऊस ई ब्लॉक , सी २२,वांद्रे कुर्ला संकुल, वांद्रे (पुर्व),मुंबई ४०० ०५१

संकेतस्थळ– www.mahabocw.in
दुरध्वनी व फॅक्सक्र. ०२२-२६५७२६३१
ई-मेल- bocwwboardmaha@gmail.com

जा.क्र. १६८ /२०२४
माआधि-२०२४/प्र.क्र.४३३/समन्वय -०१

दिनांक : 28 AUG 2024

कार्यालयीन आदेश

विषय :- माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत राज्य जन माहिती अधिकारी पदनिर्देशित बाबत..

उपरोक्त संदर्भिय कार्यालयीन आदेश क्र.१८२० दि.११.१०.२०२३ नुसार जन माहिती अधिकारी म्हणून एक पदनिर्देशित करण्यात आलेले आहे. त्याअनुषंगाने दिनांक ०७.११.२०२३ मधील विवरणपत्र "अ" अन्वये कामकाजाची कार्यासन निहाय विभागणी करण्यात आलेली आहे. मंडळाकडील माहिती अधिकार प्रकरणाचा वाढता व्याप लक्षात घेता माहिती अधिकार अधिनियम २००५ ची काटेकोर अंमलबजावणी होण्यासाठी मा.अ.अधि. २००५ मधील कलम ५ (१) नुसार कार्यालयीन आदेश दिनांक ०७/११/२०२३ केलेल्या कामाच्या विभागणी केलेल्या स्वतंत्र विषयानुसार ०२ जन माहिती अधिकारी नेमणे आवश्यक आहे. त्यानुसार खालील मंडळाकडील अधिकारी / कर्मचारी यांना जन माहिती अधिकारी तसेच समन्वयक व कार्यासन प्रमुख हे पदनिर्देशित करण्यास येत आहे. सदर कार्यालयात आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून अमंलात येईल.

कार्यासन प्रमुख	समन्वयकाचे नाव	जन माहिती अधिकारी यांची नाव व बाब/विषय
कार्या आदेश दि. ०७/११/२०२३ मधील विवरणपत्र ब नुसार नियुक्त सर्व कार्यासन प्रमुख	श्री. राजेंद्र कौरते, सेवानिवृत्त अधिकारी	१.देवीलाल मा. राजपूत, जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक लेखा अधिकारी (कार्याआदेश दि.०७.११.२०२३ मधील विवरणपत्र 'अ' नुसार कार्यासननिहाय कामकाजाची विषयसुची)
		२. रविंद्र गायकवाड, जन माहिती अधिकारी तथा

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत देण्यात आलेली प्रमाणीत प्रत

माहितीचा अधिकार अधिनियम २००५
अंतर्गत देण्यात आलेली प्रमाणीत प्रत

		उपलेखापाल (कार्याआदेश दि.०७.११.२०२३ मधील विवरणपत्र 'अ' नुसार कार्यासननिहाय कामकाजाची विषयसुची)

(विवेक कुंभार)
सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई.

प्रति :-

१. श्री. देविलाल मा.राजपूत, जन माहिती अधिकारी तथा सहायक लेखाअधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई.
२. श्री. रविंद्रनाथ गायकवाड, जन माहिती अधिकारी तथा उपलेखापाल, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई
३. श्री. राजेंद्र कौरते,समन्वयक तथा सेवानिवृत्त अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई
४. कार्यालयीन आदेश दि.०७.११.२०२३ मधील सर्व कार्यासन प्रमुख
५. [illegible]

माहितीचा अधिकार अधिनियम [illegible]
अंतर्गत देण्यात आलेली प्रमाणि[illegible]

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या विभागीय/जिल्हा कामगार सुविधा केंद्राची सध्यस्थिती

अनु क्र	मुख्यालय/विभागीय/ जिल्हास्तरीय	जागेचा पत्ता	चौरस फुट	जागेची मालकी	बांधकामाची सद्यस्थिती
१	मुंबई मुख्यालय	एमएमटीसी हाऊस, पाचवा मजला, ई ब्लॉक सी -२२, वांद्रे कुर्ला संकुल, वांद्रे (पुर्व) मुंबई – ४०००५१.	@४४४८ चौ.फुट	केंद्रशासन	कार्यरत आहे.
२	विक्रोळी	कामगार कल्याण भवन, कन्नमवार नगर नंबर-२, कोर्टाच्या बाजूला, विक्रोळी पूर्व.	@८९० चौ.फुट	महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ	कार्यरत आहे.
३	पनवेल – खांदेश्वर	श्री गणेश प्लाझा फेज-१, पहिला माळा, प्लॉट नं ०१, सेक्टर १,खांदा कॉलनी, न्यु पनवेल, जि.रायगड ४१०२०६	@१२०० चौ.फुट	खाजगी	कार्यरत आहे.
४	कोकण विभागीय	महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, ४ मजला, सेनापती बापट मार्ग, प्रभादेवी मुंबई-१३	@२४२६ चौ.फुट	महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ	कार्यरत आहे.
५	सिंधुदुर्ग	बिल्डिंग नं-१२१२/३२१ क, खडपकर कॉम्पेलॅक्स, ओरोस फाटा, ता. कुडाळ, जि सिंधुदूर्ग	@१४९८ चौ.फुट	खाजगी	कार्यरत आहे.
६	वरळी	महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, जांभोरी मैदान, वरळी.	@ ९२० चौ.फुट	महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ	कार्यरत आहे.
७	सोलापूर	महाराष्ट्र कामगार कल्याण भवन दमाणी नगर सोलापूर.	@१३१४ चौ.फुट	महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ	कार्यरत आहे.
८	अहमदनगर	बंगाल चौकी जवळ,बुरुडगल्ली,अहमदनगर	@९७२ चौ.फुट	रेव्हेन्यू अॅन्ड रजिस्ट्रेशन डिपा.गर्व्ह.सर्व्हटस् सोसायटी (महाराष्ट्र शासन अंगीकृत)	कार्यरत आहे.
९	नंदूरबार	अंबिका कॉलनी प्लॉट नं-६८, जाणता राजा चौका जवळ, (धुळे चौफूली) नंदूरबार.	@१०५२ चौ.फुट	खाजगी	कार्यरत आहे.
१०	नांदेड	महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, ललित कला भवन, लेबर कॉलनी, नांदेड-४३१६०२	@१५०० चौ.फुट	महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ	कार्यरत आहे.

अनु क्र	मुख्यालय/विभागीय/ जिल्हास्तरीय	जागेचा पत्ता	चौरस फुट	जागेची मालकी	बांधकामाची सद्यस्थिती
११	औरंगाबाद विभागीय	कामगार कल्याण भवन, पहिला मजला, कोटवालपुरा सिध्दार्थ उद्यान प्राणीसंग्रहालयाच्या समोर सेंन्रटर बस स्टॅनड, औरंगाबाद.	@२७६५ चौ.फुट	महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ	कार्यरत आहे.
१२	जालना	कामगार भवन, दुसरा मजला, फुलंब्रीकर नाटयगृहाच्या बाजुला, बसस्टँड रोड, जालना	@१४४३ चौ.फुट	महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ	कार्यरत आहे.
१३	बीड	आर ओ तेली गल्ली पेठ, बीड	@१४४६ चौ.फुट	खाजगी	कार्यरत आहे.
१४	लातूर	पसायदन कॉम्पेलेक्स नवीन रेणापूर नाका, धायगुडे नगर, लातूर	@१०९४ चौ.फुट	खाजगी	कार्यरत आहे.
१५	परभणी	अजाम चौक,दर्गाह रोड,तळणीकर कॉम्पलेक्स, परभणी	@ १३८८ चौ.फुट	खाजगी	कार्यरत आहे.
१६	भंडारा	विदर्भ हाऊसिंग कॉलनी प्लॉट-७, तकीया वॉर्ड, भंडारा.	@ १००० चौ.फुट	खाजगी	कार्यरत आहे.
१७	अमरावती विभागीय	प्लॉट नं-२१/एबीसी नझाम प्लॉट नं ११/४ शिट नं २६, घर क्र.०१०६०००- १५५/१४२ वार्ड नं -४ कलेक्टर ऑफिस जवळ, अमरावती	@ २२७१ चौ.फुट	खाजगी	कार्यरत आहे.
१८	हिंगोली	मातोश्री निवास, तळमजला प्लॉट नं ५२२१/११, तापडीया इस्टेट हिंगोली,	@१०२६ चौ. फुट	खाजगी	कार्यरत आहे.
१९	नागपूर विभागीय	प्लॉट नं- ४२९, चंदनबाई टेम्पल, वार्ड नं- १२, चंदननगर, नागपूर -२४	@१८२४ चौ.फुट	खाजगी	कार्यरत आहे.
२०	कोल्हापूर	प्लॉट नं- ४८१/ए, श्री शाहू मार्केट यार्ड, कोल्हापूर	@१६५० चौ.फुट	खाजगी	कार्यरत आहे.
२१	पिंपरी -चिंचवड	कामगार कल्याण भवन, संभाजी नगर , चिंचवड पुणे	@११७५ चौ.फुट	महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ	कार्यरत आहे.

अनु क्र	मुख्यालय/विभागीय/ जिल्हास्तरीय	जागेचा पत्ता	चौरस फुट	जागेची मालकी	बांधकामाची सद्यस्थिती
२२	सांगली	बालाजीपद्मा सी एस नं – ९१४३/८ वालचंद महाविद्यालयाजवळ, गेट नं-२, विश्रामबाग सांगली- ४१६४१६	@१६५८ चौ.फुट	खाजगी	कार्यरत आहे.
२३	गडचिरोली	चामोंशी रोड, पेपर मिल कार्यालयाजवळ, कन्नमवार वार्ड.	@१४५६ चौ.फुट	खाजगी	कार्यरत आहे.
२४	वर्धा	प्लॉट क्र.४१, वॉर्ड क्र.१०, घर क्र.२९३, तळमजला, प्रताप नगर वर्धा	@११४९ चौ.फुट	खाजगी	कार्यरत आहे.
२५	यवतमाळ	प्लॉट नं. २३ व २४, वॉर्ड क्र.१३, रेनूका नगर, वाघनपूर रोड, आयडीबीआय बॅक जवळ, यवतमाळ.	@१७८९ चौ.फुट	खाजगी	कार्यरत आहे.
२६	धुळे	प्लॉट नं – १७/२, एस्किना आप्ट, झेडबी पाटील कॉलेज समोर, वाडी भोकर रोड, देपूर धुळे -४२४००२	@१३७५ चौ.फुट	खाजगी	कार्यरत आहे.
२७	रत्नागिरी	शिवरुद्र प्राईड,गाळा नं-१०२, पहिला मजला,शिवाजी नगर,ता.जि. रत्नागिरी	@१४१४ चौ.फुट	खाजगी	कार्यरत आहे.
२८	बुलडाणा	यशोतेज,चिचौले चौक, राम नगर,बुलढाणा- ४४३ ००१	@११८० चौ.फुट	खाजगी	कार्यरत आहे.
२९	गोंदिया	इमारत क्र. ४५, पहिला मजला, बोपचे कॉम्पलेक्स, बालाघाट रोड, आझाद वार्ड, ता. जि. गोंदिया (म.रा.)	@१४८५ चौ फूट	खाजगी	कार्यरत आहे.
३०	बारामती	क्रेडाई बारामती, मुक्ती टाउनशीप, कारभारी नगर, कसबा, बारामती - ४१३ १०२.	@७५० चौ फूट	खाजगी	कार्यरत आहे.
३१	उस्मानाबाद	शेंडगे कॉम्पलेक्स, बॅक ऑफ महाराष्ट्र जवळ भानुनगर, सोलापूर औरंगाबाद रोड, उस्मानाबाद – ४१३ ५०१.	@१२०६ चौ.फुट	खाजगी	कार्यरत आहे.
३२	पालघर	सिध्दी विनायक रेसीडन्सी, बिल्डिंग नं ५, २ रा मजला, प्लॅट नं.२०३ व २०४, पालघर पूर्व	@१३०० चौ फूट	खाजगी	कार्यरत आहे.

अनु क्र	मुख्यालय/विभागीय/ जिल्हास्तरीय	जागेचा पत्ता	चौरस फुट	जागेची मालकी	बांधकामाची सद्यस्थिती
३३	वाशिम	सिव्हील लाईन, वाशिम	@१४०० चौ.फुट	खाजगी	कार्यरत आहे.
३४	अकोला	तळमजला, जिजाऊ सांस्कृतिक भवन, मराठा सेवा संघ, अकोला	@१६०० चौ.फुट	खाजगी	कार्यरत आहे.
३५	सातारा	श्री. सतीश केशव जाधव,१५-१ A-१, केशवसोन कॉम्प्लेकस, दुसरा मजला, रविवार पेठ, पोवई नाका, सातारा	@१६६१ चौ.फुट	खाजगी	कार्यरत आहे.
३६	नाशिक विभागीय	प्लॉट नं ०५, सी एफ सी बिल्डिंग, एम आय डी सी गेस्ट हाऊस, नाशिक	@१८०० चौ.फुट	औद्योगिक विकास महामंडळ नाशिक (MIDC)	लेआऊट मंजूरी व जागेचा करारनामा करणे बाकी आहे.
३७	जळगांव				नवीन जागेचा प्रस्ताव प्रतिक्षाधीन.
३८	पुणे विभागीय				नवीन जागेचा प्रस्ताव प्रतिक्षाधीन.
३९	इचलकरंजी				नवीन जागेचा प्रस्ताव प्रतिक्षाधीन.
४०	मुंबई पश्चिम				नवीन जागेचा प्रस्ताव प्रतिक्षाधीन.
४१	चंद्रपूर				नवीन जागेचा प्रस्ताव प्रतिक्षाधीन.
४२	ठाणे/कल्याण				नवीन जागेचा प्रस्ताव प्रतिक्षाधीन.

बैठक दि. १८/१/२०१६ कलम ५(१)(ख) तीन मंडळ ठराव

पाठविण्याची आवश्यकता नाही, अशी धारणा व्यक्त करून ती धारणा पक्की करण्यासाठी मी पत्राद्वारे विनंती केली आहे, असे ते म्हणाले.

मा. अध्यक्ष यांनी असे सांगितले की, मॉनिटरिंग कमिटीच्या सूचना लक्षात घेता हे तातडीने करणे आवश्यक आहे. मंडळ संविधानिक असल्यामुळे मंडळास RFP डॉक्युमेंटनुसार ई-निविदा काढता येईल. तथापि, या RFP डॉक्युमेंटवर आय.टी विभागाचे अभिप्राय घेऊन त्यांचे परिक्षणानंतर ई-निविदा प्रसिध्द करणे योग्य राहील, असे ते म्हणाले.

RFP डॉक्युमेंटबाबत सविस्तर चर्चा होऊन या RFP डॉक्युमेंटवर आय.टी विभागाचे अभिप्राय घेऊन माहिती व तंत्रज्ञान विभागाने सूचविलेल्या बदलासह ई-निविदा प्रसिध्द करण्यात यावी, असे सर्वानुमते ठरले. तसेच RFP डॉक्युमेंटवर माहिती व तंत्रज्ञान विभागाचे अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर RFP च्या अटी व शर्तीमध्ये आवश्यक बदल करण्याचे संपूर्ण अधिकार मा. अध्यक्ष व मा. कामगार आयुक्त यांना आहेत, असे सर्वानुमते ठरले.

विषय क्र. ४): इतर राज्यांच्या कल्याणकारी योजनांचा आढावा घेऊन महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या योजनांच्या लाभाच्या रक्कमेबाबत निर्णय घेणे.

सचिव यांनी याबाबत मागील बैठकीत सुचित केल्यानुसार इतर राज्यांच्या कल्याणकारी योजनांच्या लाभाच्या रकमेबाबत तुलनात्मक तक्ता मंडळासमोर सादर केला. सदर तक्त्याचे अवलोकन करुन आपल्या मंडळाच्या कल्याणकारी योजनांच्या लाभाच्या रकमेत वाढ करण्यात यावी असे मा.अध्याक्षांनी सर्व उपस्थितांना सांगीतले. याबाबत सविस्तर चर्चा होउन महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या कल्याणकारी योजनांच्या लाभाच्या रकमेत खालीलप्रमाणे वाढ करण्याबाबतचा ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.

अ.क्र.	प्रचलित योजना	सुधारित योजना
१.	नोंदित लाभार्थी स्त्री बांधकाम कामगारास तसेच नोंदित पुरुष लाभार्थी बांधकाम कामगारांच्या पत्नीस नैसर्गिक प्रसुतीसाठी रु.१०,०००/ (रु. दहा हजार फक्त) व शस्त्रक्रियेद्वारे प्रसुतीसाठी रु. १५,०००/- (रु. पंधरा हजार फक्त) एवढे आर्थिक सहाय्य.	नोंदित लाभार्थी स्त्री बांधकाम कामगारास तसेच नोंदित पुरुष लाभार्थी बांधकाम कामगारांच्या पत्नीस नैसर्गिक प्रसुतीसाठी रु. १५,०००/- (रु. पंधरा **हजार फक्त)** व शस्त्रक्रियेद्वारे प्रसुतीसाठी **रु. २०,०००/- (रु. वीस हजार फक्त)** एवढे आर्थिक सहाय्य.
२.	नोंदित लाभार्थी बांधकाम कामगारांच्या प्रति शैक्षणिक	नोंदित लाभार्थी बांधकाम कामगारांच्या प्रति

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत देण्यात आलेली प्रमाणीत प्रत

	वर्षी शाळेतील किमान ७५% किंवा अधिक उपस्थिती असणा-या दोन पाल्यांस इयत्ता १ ली ते ७ वी साठी प्रतिवर्षी रु. १२००/- (रु. एक हजार दोनशे फक्त) किंवा इयत्ता ८ वी ते १० वी साठी प्रतिवर्षी रु. २४००/- (दोन हजार चारशे फक्त) एवढे शैक्षणिक आर्थिक सहाय्य.	शैक्षणिक वर्षी शाळेतील किमान ७५% किंवा अधिक उपस्थिती असणा-या दोन पाल्यांस इयत्ता १ ली ते ७ वी साठी प्रतिवर्षी **रु. २४००/- (रु. दोन हजार चारशे फक्त)** किंवा इयत्ता ८ वी ते १० वी साठी प्रतिवर्षी **रु. ४८००/- (चार हजार आठशे फक्त)** एवढे शैक्षणिक आर्थिक सहाय्य.
३.	नोंदित लाभार्थी कामगारांच्या दोन पाल्यांना इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी मध्ये किमान ५० किंवा अधिक गुण प्राप्त झाल्यास रु. ५०००/- (रु. पाच हजार फक्त) एवढे प्रोत्साहानात्मक शैक्षणिक सहाय्य.	नोंदित लाभार्थी कामगारांच्या दोन पाल्यांना इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी मध्ये किमान ५० किंवा अधिक गुण प्राप्त झाल्यास **रु. १०,०००/- (रु. दहा हजार फक्त)** एवढे प्रोत्साहानात्मक शैक्षणिक सहाय्य.
४.	नोंदित लाभार्थी कामगारांच्या दोन पाल्यांना इयत्ता ११ वी व इयत्ता १२ वी च्या शिक्षणासाठी प्रती शैक्षणिक वर्षी रु. ५०००/- (रु. पाच हजार फक्त) एवढे शैक्षणिक सहाय्य.	नोंदित लाभार्थी कामगारांच्या दोन पाल्यांना इयत्ता ११ वी व इयत्ता १२ वी च्या शिक्षणासाठी प्रती शैक्षणिक वर्षी **रु. १०,०००/- (रु. दहा हजार फक्त)** एवढे शैक्षणिक सहाय्य.
५.	नोंदित लाभार्थी कामगारांच्या दोन पाल्यांना अथवा पुरुष कामगाराच्या पत्नीस पदवीच्या प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या प्रवेश, पुस्तके व शैक्षणिक सामुग्रीसाठी प्रतिवर्षी रु. १५,०००/- एवढे शैक्षणिक सहाय्य.	नोंदित लाभार्थी कामगारांच्या दोन पाल्यांना अथवा पुरुष कामगाराच्या पत्नीस पदवीच्या प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या प्रवेश, पुस्तके व शैक्षणिक सामुग्रीसाठी प्रतिवर्षी **रु. २५,०००/- (रु. पंचवीस हजार फक्त)** एवढे शैक्षणिक सहाय्य.
६.	नोंदित लाभार्थी कामगारांच्या दोन पाल्यांना अथवा पुरुष कामगाराच्या पत्नीस शासनमान्य वैद्यकीय व अभियांत्रिकी महाविद्यालयात किंवा संस्थेत प्रवेशासाठी, पुस्तके व शैक्षणिक साहित्य खरेदी इत्यादीसाठी प्रती शैक्षणिक वर्षी रु. ३५०००/- (रु. पस्तीस हजार फक्त) एवढे शैक्षणिक अर्थसहाय्य.	नोंदित लाभार्थी कामगारांच्या दोन पाल्यांना अथवा पुरुष कामगाराच्या पत्नीस शासनमान्य वैद्यकीय व अभियांत्रिकी महाविद्यालयात किंवा संस्थेत प्रवेशासाठी, पुस्तके व शैक्षणिक साहित्य खरेदी इत्यादीसाठी प्रती शैक्षणिक वर्षी **रु. ५०,०००/- (रु. पन्नास हजार फक्त)** एवढे शैक्षणिक अर्थसहाय्य.
७.	नोंदित लाभार्थी कामगारांच्या दोन पाल्यांना, शासनास पदविकेमध्ये आणि पदव्युत्तर पदवीका मध्ये शिक्षण घेत असलेल्या पाल्यास प्रतिवर्षी रु. १०,०००/- (रु. दहा हजार फक्त) एवढे आर्थिक सहाय्य.	नोंदित लाभार्थी कामगारांच्या दोन पाल्यांना, शासनास पदविकेमध्ये आणि पदव्युत्तर पदवीका मध्ये शिक्षण घेत असलेल्या पाल्यास प्रतिवर्षी **रु. २५,०००/- (रु. पंचवीस हजार फक्त)** एवढे आर्थिक सहाय्य.
८.	एका मुलीच्या जन्मानंतर नोंदित लाभार्थी बांधकाम कामगार अथवा नोंदित लाभार्थी बांधकाम कामगारच्या त्याच्या पती/पत्नीने कुटुंब नियोजनाची शस्त्रक्रिया केल्यास एका मुलीच्या नावे १८ वर्षापर्यंत रु. २५,०००/- (रु. पंचवीस हजार फक्त) मुदत बंद ठेव.	एका मुलीच्या जन्मानंतर नोंदित लाभार्थी बांधकाम कामगार अथवा नोंदित लाभार्थी बांधकाम कामगारच्या त्याच्या पती/पत्नीने कुटुंब नियोजनाची शस्त्रक्रिया केल्यास एका मुलीच्या नावे १८ वर्षापर्यंत **रु. १,००,०००/- (रु. एक लाख फक्त)** मुदत बंद ठेव.
९.	नोंदित लाभार्थी कामगारास ७५ किंवा कायमचे अपंगत्व आल्यास त्यास रु. १,००,०००/- (रु. एक लाख रुपये) एवढे आर्थिक सहाय्य.	नोंदित लाभार्थी कामगारास ७५ किंवा कायमचे अपंगत्व आल्यास त्यास **रु. २,००,०००/-(रु. दोन लाख रूपये)** एवढे आर्थिक सहाय्य.
१०.	नोंदित लाभार्थी कामगाराचा मृत्यू झाल्यास त्याच्या	नोंदित लाभार्थी कामगाराचा मृत्यू झाल्यास त्याच्या

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत देण्यात आलेली प्रमाणीत प्रत

	नामनिर्देशित केलेल्या वारसास रु. ५,०००/- (रु. पाच हजार फक्त) एवढी रक्कम अत्यंविधीसाठी मदत.	नामनिर्देशित केलेल्या वारसास **रु. १०,०००/- (रू. दहा हजार फक्त)** एवढी रक्कम अत्यंविधीसाठी मदत.
११.	नोंदित लाभार्थी कामगाराचा मृत्यू झाल्यास त्याच्या विधवा पत्नी अथवा स्त्रीकामगाराचे विधुर पतीस प्रतिवर्षी रु. १२,०००/- (रु. बारा हजार फक्त) एवढे आर्थिक सहाय्य.	नोंदित लाभार्थी कामगाराचा मृत्यू झाल्यास त्याच्या विधवा पत्नी अथवा स्त्रीकामगाराचे विधुर पतीस प्रतिवर्षी **रु. २४,०००/- (रू. चौवीस हजार फक्त)** एवढे आर्थिक सहाय्य. (पाच वर्षापर्यंत)
१२.	नोंदित लाभार्थी बांधकाम कामगाराचा कामावर असताना मृत्यू झाल्यास त्याच्या कायदेशीर वारसास रु. २,००,०००/- (रु. दोन लाख) एवढे आर्थिक सहाय्य.	नोंदित लाभार्थी बांधकाम कामगाराचा कामावर असताना मृत्यू झाल्यास त्याच्या कायदेशीर वारसास **रु. ५,००,०००/- (रू. पाच लाख फक्त)** एवढे आर्थिक सहाय्य.
१३.	नोंदित लाभार्थी स्त्री बांधकाम कामगारास व नोंदित पुरुष लाभार्थी बांधकाम कामगारास तसेच कुटुंबातील सदस्यांस गंभीर रोग व गंभीर आजाराच्या उपचारार्थ रुपये २५,०००/- (रु. पंचवीस हजार फक्त) एवढे आर्थिक सहाय्य.	नोंदित लाभार्थी स्त्री बांधकाम कामगारास व नोंदित पुरुष लाभार्थी बांधकाम कामगारास तसेच कुटुंबातील सदस्यांस गंभीर रोग व गंभीर आजाराच्या उपचारार्थ **रु. १,००,०००/- (रु. एक लाख फक्त)** एवढे आर्थिक सहाय्य. (फक्त एकदा)
१४.	संगणकाचे शिक्षण (MS-CIT) घेत असलेल्या नोंदित लाभार्थी कामगारांच्या दोन पाल्यांना शुल्काची परीपुर्ती.	संगणकाचे शिक्षण (MS-CIT) घेत असलेल्या नोंदित लाभार्थी कामगारांच्या दोन पाल्यांना शुल्काची परीपुर्ती.
१५.	नोंदित लाभार्थी बांधकाम कामगाराच्या स्वत:च्या पहिल्या विवाहाच्या खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी रु. १०,०००/- (रु. दहा हजार फक्त) अनुदान.	नोंदित लाभार्थी बांधकाम कामगाराच्या स्वत:च्या पहिल्या विवाहाच्या खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी **रु. ५०,०००/- (रू. पन्नास हजार फक्त)** अनुदान.

विषय क्र. ५) : आयत्यावेळचे विषय.

१)मंडळाच्या उपकराच्या गुंतवणुकीबाबत –

याबाबत बोलताना मंडळाच्या सचिव यांनी मंडळांतर्गत जमा उपकराच्या रक्कमेच्या गुंतवणूकीचा तपशील मंडळासमोर सादर केला. गुंतवणूकीची मागील बैठक मा. अध्यक्षांनी सूचित केल्यानुसार दि. २२.१२.२०१५ रोजी पार पडल्याचे त्यांनी उपस्थितांच्या निदर्शनास आणून दिले. त्यामध्ये मंडळाकडे असलेल्या एकूण रू. ८०० रकमेपैकी रुपये ३०० कोटी इतकी रक्कम देना बँकेच्या माटुंगा शाखेत ७.५१% प्रतिवर्ष या दराने गुंतवण्यात आली असून रू. ५०० कोटी इतकी रक्कम सिंडीकेट बँकेच्या कुलाबा शाखेत ७.३१% प्रतिवर्ष या व्याजदराने एका वर्षासाठी गुंतवण्यात आला असल्याचे त्यांनी उपस्थितांच्या निदर्शनास आणून दिले. या गुंतवणूकीची नोंद मंडळाने घेतली

माहितीचा अधिकार अधिनियम २००५
अंतर्गत देण्यात आलेली प्रमाणीत प्रत

माहितीचा अधिकार अधिनियम २००५
अंतर्गत देण्यात आलेली प्रमाणित प्रत

RNI No. MAHBIL /2009/31747

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग एक-ल

वर्ष ९, अंक ४२(२)] गुरुवार, नोव्हेंबर ३०, २०२३/अग्रहायण ९, शके १९४५ [पृष्ठे ११, किंमत : रुपये १६.००

असाधारण क्रमांक ५९

प्राधिकृत प्रकाशन

(केंद्रीय) औद्योगिक विवाद अधिनियम व मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम यांखालील (भाग एक, चार-अ, चार-ब आणि चार-क यांमध्ये प्रसिद्ध केलेल्या अधिसूचना, आदेश व निवाडे यांव्यतिरिक्त) अधिसूचना, आदेश व निवाडे.

उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ३० नोव्हेंबर, २०२३.

अधिसूचना

इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगाराचे व सेवा शर्तींचे विनियमन) अधिनियम, १९९६.

क्रमांक इबांका ०५२३/प्र.क्र. ७६/कामगार-७.—इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगाराचे व सेवा शर्तींचे विनियमन) अधिनियम,१९९६ (१९९६ चा २७) याची कलमे ६२ व ४० तसेच कलम २२ चे पोट-कलम (१) याद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, उक्त अधिनियमाच्या कलम ५ अन्वये घटित केलेल्या तज्ञ समितीशी विचारविनिमय केल्यानंतर, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगाराचे व सेवा शर्तींचे विनियमन) नियम, २००७ यात सुधारणा करण्यासाठी, याद्वारे, पुढील नियम करीत आहेः—

१. या नियमांस, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगाराचे व सेवा शर्तींचे विनियमन) (सुधारणा) नियम, २०२३ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगाराचे व सेवा शर्तींचे विनियमन) नियम, २००७ याच्या ४५ ऐवजी, पुढील नियम दाखल करण्यात येईलः—

"**४५. मंडळाची कार्ये.**—(१) मंडळास, निधीच्या उपलब्धतेस अधीन राहून, ठरावाद्वारे, लाभार्थ्यांना, पुढील प्रयोजनांसाठी वित्तीय सहाय्य पुरविता येईलः—

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत देण्यात आलेली प्रमाणीत प्रत

(अ) घराचे बांधकाम करण्यासाठी लाभार्थ्यास वित्तीय सहाय्यः—मंडळ, घराचे बांधकाम करण्यासाठी किंवा घर खरेदी करण्यासाठी लाभार्थ्यास, पुढील अटी व शर्तींस अधीन राहून, रुपये २,००,००० (दोन लाख रुपये फक्त) पेक्षा अधिक नसेल इतके कर्ज व अग्रिम किंवा वित्तीय सहाय्य मंजूर करू शकेलः—

(क) लाभार्थी, तीन वर्षांपेक्षा कमी नसेल इतक्या कालावधीसाठी राज्यामधील कोणत्याही इमारतीमध्ये किंवा अन्य बांधकाम कामामध्ये काम करीत असावा.

(ख) लाभार्थी, राज्यामध्ये घराचे बांधकाम करण्याकरिता किंवा घर खरेदी करण्यासाठी या योजनेखालील लाभ मिळण्यासाठी हक्कदार असेल.

(ग) घराचे बांधकाम करण्याकरिता या योजनेखालील लाभ मिळण्यासाठी लाभार्थी किंवा लाभार्थी, जमिनीच्या मालकीचा पुरावा आणि संबंधित स्थानिक प्राधिकरणाने दिलेले ना-हरकत प्रमाणपत्र सादर करतील.

(घ) घर खरेदी करण्यासाठी या योजनेखालील लाभ मिळण्याकरिता, लाभार्थी किंवा लाभार्थी, विक्रीचा करारनामा सादर करतील.

(ङ) लाभार्थी, आयुष्यात केवळ एकदाच या योजनेखालील लाभ मिळण्यास हक्कदार असेल.

(च) असा लाभ, लाभार्थीचा पती, लाभार्थ्याची पत्नी व अठरा वर्षांखालील मुलांचा समावेश असलेल्या लाभार्थ्याच्या कुटुंबासाठी एकदाच देण्यात येईल.

(ब) लाभार्थ्यांच्या मुलांच्या शिक्षणाकरिता वित्तीय सहाय्यः—

(क) लाभार्थ्यांच्या मुलांच्या शिक्षणाकरिता वित्तीय सहाय्य योजना पुढीलप्रमाणे आहेतः—

(एक) लाभार्थ्याच्या विद्यार्थी मुलांना वित्तीय सहाय्य (इयत्ता १ ली ते ७ वी).—मंडळ, इयत्ता १ ली ते ७ वी वर्गाकरिता प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी लाभार्थ्याच्या प्रत्येक विद्यार्थी मुलास रुपये २,५०० (रुपये दोन हजार पाचशे फक्त) इतके वित्तीय सहाय्य देऊ शकेल.

(दोन) माध्यमिक शिक्षणासाठी लाभार्थ्याच्या विद्यार्थी मुलांना वित्तीय सहाय्य (इयत्ता ८ वी ते १० वी).—मंडळ, इयत्ता ८ वी ते १० वी वर्गाकरिता प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी लाभार्थ्याच्या प्रत्येक विद्यार्थी मुलास रुपये ५,००० (रुपये पाच हजार फक्त) इतके वित्तीय सहाय्य देऊ शकेल.

(तीन) उच्च माध्यमिक शिक्षणासाठी लाभार्थ्याच्या विद्यार्थी मुलांना वित्तीय सहाय्य (इयत्ता ११ वी ते १२ वी).—मंडळ, इयत्ता ११ ते १२ वर्गाकरिता प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी लाभार्थ्याच्या प्रत्येक विद्यार्थी मुलास रुपये १०,००० (रुपये दहा हजार फक्त) इतके वित्तीय सहाय्य देऊ शकेल.

(चार) इयत्ता १० वी व १२ वी उत्तीर्ण झाल्यावर लाभार्थ्याच्या विद्यार्थी मुलास प्रोत्साहनपर रक्कम.—मंडळ, प्रत्येक इयत्तेमध्ये किमान पन्नास टक्के गुणांसह इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी (दोन्ही इयत्तांमध्ये) उत्तीर्ण झाल्यावर प्रोत्साहनपर रक्कम म्हणून लाभार्थ्याच्या विद्यार्थी मुलास रुपये १०,००० (रुपये दहा हजार फक्त) इतके अर्थसहाय देऊ शकेल.

(पाच) लाभार्थ्याच्या विद्यार्थी मुलास पदवीसाठी वित्तीय सहाय्य.—मंडळ, कोणत्याही पदवी पाठ्यक्रमासाठी प्रत्येक शैक्षणिक वर्षाकरिता लाभार्थ्याच्या प्रत्येक विद्यार्थी मुलास, रुपये २०,००० (रुपये वीस हजार फक्त) इतके वित्तीय सहाय्य देऊ शकेल. ज्या पदवी पाठ्यक्रमांना संबंधित नियामक प्राधिकरणांनी मान्यता दिलेली आहे आणि केंद्र सरकारने किंवा राज्य शासनाने मान्यता दिलेली आहे अशा पदवी पाठ्यक्रमांनाच केवळ वित्तीय सहाय्य देण्यात येईल.

(सहा) लाभार्थ्याच्या विद्यार्थी मुलास पदव्युतर पदवीसाठी वित्तीय सहाय्य.—मंडळ, कोणत्याही पदव्युतर पदवी अभ्यास पाठ्यक्रमासाठी प्रत्येक शैक्षणिक वर्षाकरिता लाभार्थ्याच्या प्रत्येक विद्यार्थी मुलास, रुपये २५,००० (रुपये पंचवीस हजार फक्त) इतके वित्तीय सहाय्य देऊ शकेल. ज्या पदव्युतर पदवी पाठ्यक्रमांना संबंधित नियामक प्राधिकरणांनी मान्यता दिलेली आहे आणि केंद्र सरकारने किंवा राज्य शासनाने मान्यता दिलेली आहे अशा पदव्युतर पदवी पाठ्यक्रमांनाच केवळ वित्तीय सहाय्य देण्यात येईल.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५
अंतर्गत देण्यात आलेले अनधिकृत प्रत

(सात) लाभार्थ्याच्या विद्यार्थी मुलास पदविकेसाठी वित्तीय सहाय्य.—मंडळ, कोणत्याही पदविका पाठ्यक्रमांसाठी प्रत्येक शैक्षणिक वर्षाकरिता लाभार्थ्याच्या प्रत्येक विद्यार्थी मुलास, रुपये २०,००० (रुपये वीस हजार फक्त) इतके वित्तीय सहाय्य देऊ शकेल. ज्या पदविका पाठ्यक्रमांना संबंधित मंडळाने किंवा नियामक प्राधिकरणांनी मान्यता दिलेली आहे आणि केंद्र सरकारने किंवा राज्य शासनाने मान्यता दिलेली आहे अशा पदविका पाठ्यक्रमांनाच केवळ वित्तीय सहाय्य देण्यात येईल.

(आठ) लाभार्थ्याच्या विद्यार्थी मुलास वैद्यकीय पदवी पाठ्यक्रमांसाठी वित्तीय सहाय्य.—मंडळ, वैद्यकीय पदवी पाठ्यक्रमांसाठी प्रत्येक शैक्षणिक वर्षाकरिता लाभार्थ्याच्या प्रत्येक विद्यार्थी मुलास, रुपये १,००,००० (रुपये एक लाख फक्त) इतके वित्तीय सहाय्य देऊ शकेल. ज्या वैद्यकीय पदवी पाठ्यक्रमांना संबंधित नियामक प्राधिकरणांनी मान्यता दिलेली आहे आणि केंद्र सरकारने किंवा राज्य शासनाने मान्यता दिलेली आहे अशा वैद्यकीय पदवी पाठ्यक्रमांनाच केवळ वित्तीय सहाय्य देण्यात येईलः

परंतु, लाभार्थ्याच्या ज्या मुलास, "लाभार्थ्याच्या विद्यार्थी मुलास पदवीकरिता अर्थसहाय्य" या योजनेखाली लाभ मिळालेला आहे असे मूल, वैद्यकीय पदवी पाठ्यक्रमासाठी वित्तीय सहाय्याचा लाभ मिळण्यासाठी पात्र असणार नाही.

(नऊ) लाभार्थ्याच्या विद्यार्थी मुलास अभियांत्रिकी पदवी पाठ्यक्रमांसाठी वित्तीय सहाय्य.—मंडळ, अभियांत्रिकी पदवी पाठ्यक्रमांसाठी प्रत्येक शैक्षणिक वर्षाकरिता लाभार्थ्याच्या प्रत्येक विद्यार्थी मुलास, रुपये ६०,००० (रुपये साठ हजार फक्त) इतके वित्तीय सहाय्य देऊ शकेल. ज्या अभियांत्रिकी पदवी पाठ्यक्रमांना संबंधित नियामक प्राधिकरणांनी मान्यता दिलेली आहे आणि केंद्र सरकारने किंवा राज्य शासनाने मान्यता दिलेली आहे अशा अभियांत्रिकी पदवी पाठ्यक्रमांनाच केवळ वित्तीय सहाय्य देण्यात येईलः

परंतु, लाभार्थ्याच्या ज्या मुलास, "लाभार्थ्याच्या विद्यार्थी मुलास पदवीकरिता अर्थसहाय्य" या योजनेखाली लाभ मिळालेला आहे असे मूल, अभियांत्रिकी पदवी पाठ्यक्रमासाठी वित्तीय सहाय्याचा लाभ मिळण्यासाठी पात्र असणार नाही.

(दहा) लाभार्थ्याचा विद्यार्थी मुलास संगणक शिक्षणाकरिता (एमएस- सीआयटी) वित्तीय सहाय्य.—मंडळ, लाभार्थ्याचे जे मूल, एमएस-सीआयटी पाठ्यक्रम उत्तीर्ण झालेले आहे अशा प्रत्येक मुलास, एमएस-सीआयटी पाठ्यक्रम शुल्काची प्रतिपूर्ती म्हणून, रुपये ५,००० (रुपये पाच हजार फक्त) इतके वित्तीय सहाय्य देऊ शकेल. लाभार्थ्याचे मूल, त्याने ज्या संस्थेमधून असा पाठ्यक्रम पूर्ण केला आहे त्या संबंधित संस्थेचे एमएस-सीआयटी प्रमाणपत्र सादर करील.

(ख) या पोट-नियमांमध्ये नमूद केलेल्या वर निर्दिष्ट केलेल्या वित्तीय सहाय्याच्या योजना, पुढील सर्वसाधारण अटी व शर्तींना अधीन राहून, लाभार्थ्याच्या मुलास लागू करण्यात येतीलः—

(एक) लाभार्थीची पहिली दोन मुलेच केवळ वित्तीय सहाय्य योजनांचा लाभ मिळण्यास पात्र आहेत.

(दोन) जर वडील व आई दोघेही लाभार्थी असतील तर, त्यांची मुले, एकतर वडिलांच्या किंवा आईच्या वतीने या योजनांखालील लाभ मिळण्यास पात्र असतील.

(तीन) पुढील इयत्तेसाठी किंवा संबंधित शैक्षणिक पाठ्यक्रमांसाठी वित्तीय सहाय्य मिळविण्याकरिता लाभार्थीच्या मुलाने मागील इयत्ता उत्तीर्ण केलेली असावी.

(चार) लाभार्थी, त्याचे मूल ज्या शाळेमधून किंवा संस्थेमधून मागील इयत्ता किंवा संबंधित शैक्षणिक पाठ्यक्रम उत्तीर्ण झाले आहे त्या संबंधित शाळेची किंवा संस्थेची गुणपत्रिका सादर करील.

(पाच) लाभार्थी, त्याचे मूल ज्या शाळेमधून किंवा संस्थेमधून मागील इयत्ता किंवा संबंधित शैक्षणिक पाठ्यक्रम उत्तीर्ण झाले आहे त्या संबंधित शाळेचे किंवा संस्थेचे बोनाफाईड प्रमाणपत्र सादर करील.

(सहा) लाभार्थी, त्याच्या मुलाने ज्या शाळेमधून किंवा संस्थेमधून मागील इयत्ता किंवा संबंधित शैक्षणिक पाठ्यक्रम पूर्ण केलेला आहे त्या संबंधित शाळेचा किंवा संस्थेचा उपस्थितीचा पुरावा (किमान पंचाहत्तर टक्के उपस्थिती) सादर करील.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५
अंतर्गत देण्यात आलेली प्रमाणित प्रत

(सात) लाभार्थी, फक्त निकट मागील शैक्षणिक वर्षासाठी अर्ज करू शकतो आणि निकाल जाहीर झाल्यानंतर एक वर्षाच्या आत अर्ज सादर करावा लागेल.

(क) लाभार्थ्याच्या विवाहासाठी वित्तीय सहाय्यः— मंडळ, लाभार्थ्याच्या विवाहासाठी, पुढील अटी व शर्तींस अधीन राहून, रुपये ३०,००० (रुपये तीस हजार फक्त) इतके वित्तीय सहाय्य देऊ शकेलः—

(एक) हे वित्तीय सहाय्य, केवळ लाभार्थ्याच्या पहिल्या विवाहासाठीच असेल.

(दोन) जर पती व पत्नी दोघेही लाभार्थी असतील तर, ते केवळ एकाच लाभासाठी पात्र आहेत.

(तीन) लाभार्थी, सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले विवाह प्रमाणपत्र सादर करील.

(चार) लाभार्थी, पती व पत्नी या दोघांच्या जन्माचा पुरावा सादर करील. पतीचे वय एकवीस वर्षे किंवा त्याहून अधिक असावे आणि पत्नीचे वय अठरा वर्षे किंवा त्याहून अधिक असावे.

(ड) लाभार्थ्याच्या मुलीच्या विवाहासाठी वित्तीय सहाय्यः— मंडळ, लाभार्थ्याच्या मुलीच्या विवाहासाठी, पुढील अटी व शर्तींस अधीन राहून, रुपये ५१,००० (रुपये एकावन्न हजार फक्त) इतके वित्तीय सहाय्य देऊ शकेलः—

(एक) हे वित्तीय सहाय्य, केवळ लाभार्थ्याच्या एका मुलीच्या विवाहासाठीच असेल.

(दोन) जर पती व पत्नी दोघेही लाभार्थी असतील तर, ते केवळ एकाच लाभासाठी पात्र आहेत.

(तीन) लाभार्थी, सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले विवाह प्रमाणपत्र सादर करील.

(चार) लाभार्थी, पती व पत्नी या दोघांच्या जन्माचा पुरावा सादर करील. पतीचे वय एकवीस वर्षे किंवा त्याहून अधिक असावे आणि पत्नीचे वय अठरा वर्षे किंवा त्याहून अधिक असावे.

(इ) एका मुलीच्या जन्मानंतर कुटुंब नियोजनासाठी लाभार्थ्यास वित्तीय सहाय्यः— मंडळ, जी लाभार्थ्याची एकुलती एक मुलगी आहे अशा मुलीच्या नावे, ती अठरा वर्षांची होईपर्यंत, कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेमधील लाभार्थ्याच्या खात्यामध्ये, पुढील अटी व शर्तींस अधीन राहून, रुपये १,००,००० (रुपये एक लाख फक्त) इतकी नियत ठेव जमा करू शकेलः—

(एक) जर पती व पत्नी दोघेही लाभार्थी असतील तर, ते केवळ एकाच लाभासाठी पात्र आहेत.

(दोन) लाभार्थी, केंद्र सरकारने किंवा राज्य शासनाने प्राधिकृत केलेल्या संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्याने दिलेले कुटुंब नियोजन प्रमाणपत्र सादर करील.

(तीन) लाभार्थी, त्याला एकुलती एक मुलगी असल्याचा पुरावा सादर करील.

(फ) लाभार्थ्यास भांड्यांचा पुरवठा करणेः— मंडळ, राज्य शासनाकडून मान्य करण्यात येतील अशा प्रकारच्या भांड्यांचा, पुढील अटी व शर्तींस अधीन राहून, लाभार्थ्यांना पुरवठा करू शकेलः—

(एक) लाभार्थ्यांना, आयुष्यात केवळ एकदाच भांडी पुरवण्यात येतील.

(दोन) पती, पत्नी व अठरा वर्षांखालील मुलांचा समावेश असलेल्या कुटुंबाला केवळ एकदाच हा लाभ देण्यात येईल.

(ग) लाभार्थ्यास सुरक्षा संचाचा (किटचा) पुरवठा करणेः— मंडळ,राज्य शासनाकडून मान्य करण्यात येईल अशा प्रकारच्या सुरक्षा संचाचा (किटचा) लाभार्थ्यांना,आयुष्यात एकदाच पुरवठा करू शकेल.

(ह) लाभार्थ्यास अत्यावश्यक संचाचा (किटचा) पुरवठा करणेः—मंडळ,राज्य शासनाकडून मान्य करण्यात येईल अशा प्रकारच्या अत्यावश्यक संचाचा (किटचा) लाभार्थ्यांना,आयुष्यात एकदाच पुरवठा करू शकेल.

(आय) लाभार्थ्यास आरोग्य संचाचा (किटचा) पुरवठा करणेः—मंडळ,राज्य शासनाकडून मान्य करण्यात येईल अशा घटकांचा अंतर्भाव असणाऱ्या आरोग्य संचाचा (किटचा) लाभार्थ्यांना पुरवठा करू शकेल.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५
अंतर्गत... दाखल...

(जे) मृत्यू झाल्यास, लाभार्थ्यास वित्तीय सहाय्य करणे:—

(एक) मंडळ, ५१ ते ६० वर्षांच्या दरम्यान लाभार्थ्याचा नैसर्गिक मृत्यू झाल्यास, लाभार्थ्याच्या कायदेशीर वारसांना रुपये २,००,००० (रुपये दोन लाख फक्त) इतके वित्तीय सहाय्य देऊ शकेल.

(दोन) मंडळ, कोणत्याही वयातील लाभार्थ्याचा बांधकाम स्थळावर (साइटवर) अपघाती मृत्यू झाल्यास, लाभार्थ्याच्या कायदेशीर वारसांना रुपये ५,००,००० (रुपये पाच लाख फक्त) इतके वित्तीय सहाय्य देऊ शकेल.

(तीन) मंडळ, ५१ ते ६० वर्षांच्या दरम्यान लाभार्थ्याचा नैसर्गिक मृत्यू झाल्यास किंवा अपघाती मृत्यू झाल्यास, त्याच्या अंत्यसंस्कारासाठी तात्काळ मदत म्हणून लाभार्थ्याच्या कायदेशीर वारसांना, रुपये १०,००० (रुपये दहा हजार फक्त) इतके वित्तीय सहाय्य देऊ शकेल.

(चार) मंडळ, ५१ ते ६० वर्षांच्या दरम्यान लाभार्थ्याचा नैसर्गिक मृत्यू झाल्यास किंवा अपघाती मृत्यू झाल्यास, पाच वर्षांसाठी नुकसानभरपाई म्हणून लाभार्थ्याच्या कायदेशीर वारसांना, दरवर्षी रुपये २४,००० (रुपये चोवीस हजार फक्त) इतके वित्तीय सहाय्य देऊ शकेल.

(पाच) मंडळ, ५१ ते ६० वर्षांच्या दरम्यान लाभार्थ्याचा नैसर्गिक मृत्यू झाल्यास किंवा अपघाती मृत्यू झाल्यास, शववाहतूक खर्चासाठी लाभार्थ्याच्या कायदेशीर वारसांना, प्रति किलोमीटर रुपये २० (रुपये वीस फक्त) इतके वित्तीय सहाय्य देऊ शकेल.

(सहा) मंडळ, नैसर्गिक बाळंतपणासाठी लाभार्थीस, रुपये १५,००० (रुपये पंधरा हजार फक्त) इतके वित्तीय सहाय्य देऊ शकेल. लाभार्थीची पहिली दोन मुले या योजनेखालील लाभ मिळण्यास पात्र आहेत.

(सात) मंडळ, सिझेरियन प्रसूतीसाठी लाभार्थीस, रुपये २०,००० (रुपये वीस हजार फक्त) इतके वित्तीय सहाय्य देऊ शकेल. लाभार्थीची पहिली दोन मुले या योजनेखालील लाभ घेण्यास पात्र आहेत.

(आठ) जर पती-पत्नी दोघेही लाभार्थी असतील तर, ते उपखंड (सहा) व (सात) मध्ये नमूद केलेल्या योजनांसाठी केवळ एकाच लाभाकरिता पात्र आहेत.

(नऊ) मंडळ, पंचाहत्तर टक्के किंवा त्यापेक्षा अधिक अपंगत्व असल्यास, लाभार्थ्यास रुपये २,००,००० (रुपये दोन लाख फक्त) इतके वित्तीय सहाय्य देऊ शकेल.

(दहा) मंडळ, राज्य शासनाने, सरकारी कर्मचाऱ्यांसाठी सार्वजनिक आरोग्य विभागामध्ये, जे गंभीर असल्याचे विनिर्दिष्ट केलेले आहेत अशा आजारांच्या उपचारांसाठी लाभार्थ्यास रुपये १,००,००० (रुपये एक लाख फक्त) इतके वित्तीय सहाय्य देऊ शकेल.

(अकरा) मंडळ, लाभार्थ्यास कृत्रिम अवयव बसवण्याच्या खर्चाची, भारतीय कृत्रिम अवयव निर्मिती महामंडळास संपूर्ण प्रतिपूर्ती करू शकेल.

(बारा) मंडळ, केंद्र सरकारच्या किंवा राज्य शासनाच्या योजनांनुसार आरोग्य तपासणी करू शकेल.

(तेरा) या खंडात नमूद केलेल्या योजनांचा लाभ मिळण्यासाठी, लाभार्थी, केंद्र सरकारने किंवा राज्य शासनाने प्राधिकृत केलेल्या संबंधित वैद्यकीय व्यवसायीने किंवा वैद्यकीय अधिकाऱ्याने दिलेले वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करील.

(चौदा) मंडळ, या खंडात नमूद केलेल्या एक किंवा अधिक योजनांसाठी राज्य शासनाच्या मान्यतेने, सर्वसमावेशक विमा योजना तयार करू शकेल.

(के) लाभार्थ्यांना जेवण किंवा पोषक आहार यांचा पुरवठा करणे:- मंडळ, राज्य शासनाच्या मान्यतेने, लाभार्थ्यांना जेवण किंवा पोषक आहार पुरविण्याचा निर्णय घेऊ शकेल. अशा जेवणाचा किंवा पोषक आहाराचा मेनू, प्रमाण व वेळ राज्य शासनाच्या मान्यतेने, मंडळाकडून ठरवण्यात येईल.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५
अंतर्गत देण्यात आलेली प्रमाणीत प्रत

(२) जर लाभार्थ्यास, केंद्र सरकारकडून किंवा राज्य शासनाकडून राबविण्यात येत असलेल्या योजनेचा लाभ मिळत असेल तर, लाभाची द्विरुक्ती टाळण्यासाठी, मंडळाकडून राबविण्यात येत असलेल्या योजनेचा लाभ मिळण्यासाठी उक्त लाभार्थी पात्र असणार नाही.

(३) मंडळ, निधीच्या उपलब्धतेच्या अधीन राहून, अधिनियमाच्या कलम २२ च्या पोट-कलम (१) च्या खंड (ह) खालील इतर उपाययोजनांसाठी व सुविधांसाठी देखील तरतूद करू शकेल, जसे की:-

(अ) जिल्हा इमारत कामगार सुविधा केंद्र (DBWFC) स्थापन करणे:—

(एक) मंडळ, लाभार्थ्यांना सहाय्य करण्यासाठी राज्य शासनाच्या मान्यतेने, आवश्यकतेनुसार प्रत्येक जिल्ह्यामध्ये एक किंवा अधिक जिल्हा इमारत कामगार सुविधा केंद्रे स्थापन करू शकेल.

(दोन) अधिनियमाखालील नोंदणीकृत बांधकाम कामगारांना लाभ मिळण्यासाठी जिल्हा इमारत कामगार सुविधा केंद्र, प्रत्येक बांधकाम कामगारास, नोंदणी करण्याची व सर्व प्रकारच्या नमुन्यांची प्रक्रिया करण्याची सुविधा देऊ शकेल.

(तीन) राज्य शासनाद्वारे प्राधिकृत करण्यात येईल असा अधिकारी, जिल्हा इमारत कामगार सुविधा केंद्राच्या प्रमुख पदी असेल.

(चार) सुलभपणे काम करण्याकरिता प्रत्येक जिल्हा इमारत कामगार सुविधा केंद्राला, आवश्यक मनुष्यबळ व पायाभूत सुविधा पुरविता येतील.

(ब) तालुका इमारत कामगार सुविधा केंद्र (TBWFC) स्थापन करणे:—

(एक) मंडळ, राज्य शासनाच्या मान्यतेने,आवश्यकतेनुसार प्रत्येक तालुक्यामध्ये एक किंवा अधिक तालुका इमारत कामगार सुविधा केंद्रे अथवा एकापेक्षा अधिक तालुक्यांसाठी असे एक केंद्र स्थापन करू शकेल.

(दोन) अधिनियमाखालील नोंदणीकृत बांधकाम कामगारांना लाभ मिळण्यासाठी तालुका इमारत कामगार सुविधा केंद्र, बांधकाम कामगारास, नोंदणी करण्याची व सर्व प्रकारच्या नमुन्यांची प्रक्रिया करण्याची सुविधा देऊ शकेल.

(तीन) तालुका इमारत कामगार सुविधा केंद्र, जिल्हा इमारत कामगार सुविधा केंद्राच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली काम करू शकेल.

(चार) सुलभपणे काम करण्याकरिता प्रत्येक तालुका इमारत कामगार सुविधा केंद्राला, आवश्यक मनुष्यबळ व पायाभूत सुविधा पुरविता येतील.

(क) इमारत कामगारांसाठी शेड (कामगार नाका) बांधणे:—

(एक) मंडळ, बांधकाम कामगारांना काम मिळवण्यासाठी एकत्र जमण्याकरिता स्थानिक प्राधिकरणाच्या मान्यतेने, स्थानिक प्राधिकरणाच्या हद्दीतील अशा ठिकाणी छपऱ्या (शेड) (कामगार नाका) बांधू शकेल.

(दोन) राज्य शासनाच्या मान्यतेने, मंडळाने ठरवल्यानुसार या छपऱ्यांमध्ये (शेडमध्ये) पाणी व इतर कोणत्याही अत्यावश्यक सेवांची सोय केली जाऊ शकेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

विनीता वेद सिंगल,
शासनाचे प्रधान सचिव.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५
अंतर्गत देण्यात आलेली अनधिकृत प्रत

INDUSTRIES, ENERGY, LABOUR AND MINING DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, Dated 30th November, 2023.

NOTIFICATION

BUILDING AND OTHER CONSTRUCTION WORKERS (REGULATION OF EMPLOYMENT AND CONDITION OF SERVICE) ACT, 1996.

No.EBAKA0523/CR 76/Lab-7.—In exercise of the powers conferred by sections 62 and 40 read with sub-section (*1*) of section 22 of the Building and other Construction Workers (Regulation of Employment and Condition of Service) Act, 1996 (27 of 1996), the Government of Maharashtra, after consultation with the Expert Committee constituted under section 5 of the said Act, hereby makes the following rules to amend the Maharashtra Building and other Construction Workers (Regulation of Employment and Condition of Service) Rules, 2007, namely:—

1. These rules may be called the Maharashtra Building and Other Construction Workers (Regulation of Employment and Condition of Service) (Amendment) Rules, 2023.

2. For rule 45 of the Maharashtra Building and Other Construction Workers (Regulation of Employment and Condition of Service) Rules, 2007, the following rule shall be substituted, namely :—

"**45.** *Functions of the Board.—(1)* The Board may, by resolution, subject to the availability of funds, provide the financial assistance to the beneficiary for the following purposes, namely:—

(*A*) *Financial assistance for construction of house to beneficiary.*—The Board may sanction loans and advances or financial assistance to a beneficiary for construction or purchase of a house not exceeding Rs. 2,00,000 (rupees two lakhs only), subject to the following terms and conditions, namely:—

(*a*) The beneficiary has been engaged in any building or other construction work in the State for not less than three years.

(*b*) The beneficiary shall be entitled to avail benefit under this scheme for construction or purchase of house in the State.

(*c*) For availing benefit under this scheme for construction of house, the beneficiary or beneficiaries shall submit proof of ownership of land and No Objection Certificate from the concerned local authority.

(*d*) For availing benefit under this scheme for purchase of house the beneficiary or beneficiaries shall submit Agreement of Sale.

(*e*) The beneficiary shall be entitled to avail benefit under this scheme once in a lifetime.

(*f*) Such benefit shall be given once for a family of beneficiary which includes husband, wife and children below age of eighteen years.

(*B*) *Financial assistance for education of children of the beneficiaries.*—(*a*) The financial assistance schemes for education of children of the beneficiaries are as follows:-

(*i*) *Financial assistance to student children of beneficiary (1st to 7th Standard).*—The Board may give financial assistance of Rs. 2,500 (rupees two thousand five hundred only) per student child of a beneficiary per academic year for 1st to 7th standard.

(*ii*) *Financial assistance to student child of beneficiary for secondary education (8th to 10th Standard).*— The Board may give financial assistance of Rs. 5,000 (rupees five thousand only) per student child of beneficiary per academic year for 8th to 10th standard.

(*iii*) *Financial assistance to student child of beneficiary for higher secondary education (11th to 12th Standard).*—The Board may give financial assistance of Rs. 10,000 (rupees ten thousand only) per student child of beneficiary per academic year for 11th and 12th standard.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५
अंतर्गत देण्यात आलेली प्रमाणीत प्रत

(*iv*) *Incentive to student child of beneficiary on passing 10th and 12th Standard.*—The Board may give financial assistance of Rs. 10,000 (rupees ten thousand only) to a student child of beneficiary as an incentive on passing 10th standard and 12th standard (in both standards) with minimum fifty per cent. marks in each standard.

(*v*) *Financial assistance to student child of beneficiary for graduation.*—The Board may give financial assistance of Rs. 20,000 (rupees twenty thousand only) per student child of beneficiary per academic year for any graduate courses. The financial assistance shall be given only to such graduate courses which are recognized by concerned regulatory authorities and approved by the Central Government or the State Government.

(*vi*) *Financial assistance student child of beneficiary for post graduation.*—The Board may give financial assistance of Rs. 25,000 (rupees twenty five thousand only) per student child of beneficiary per academic year for any post graduate courses. The financial assistance shall be given only to such post graduate courses which are recognized by concerned regulatory authorities and approved by the Central Government or the State Government.

(*vii*) *Financial assistance student child of beneficiary for diploma.*—The Board may give financial assistance of Rs. 20,000 (rupees twenty thousand only) per student child of beneficiary per academic year for any diploma courses. The financial assistance shall be given only to such diploma courses which are recognized by concerned Board or regulatory authorities and approved by the Central Government or the State Government.

(*viii*) *Financial assistance to student child of beneficiary for graduate courses in medical.*— The Board may give financial assistance of Rs. 1,00,000 (rupees one lakhs only) per student per academic year for graduate courses in medical. The financial assistance shall be given only to such graduate courses in medical which are recognized by concerned regulatory authorities and approved by the Central Government or the State Government:

Provided that, child of a beneficiary who has availed benefit under "Financial assistance to student child of beneficiary for graduation" shall not be eligible to avail benefit of financial assistance for graduate courses in medical.

(*ix*) *Financial assistance to student child of beneficiary for graduate courses in engineering.*—The Board may give financial assistance of Rs. 60,000 (rupees sixty thousand only) per student child of beneficiary per academic year for graduate courses in engineering. The financial assistance shall be given only to such graduate courses in engineering which are recognized by concerned regulatory authorities and approved by the Central Government or the State Government:

Provided that, child of a beneficiary who has availed benefit under "Financial assistance to student child of beneficiary for graduation" shall not be eligible to avail benefit of financial assistance for graduate courses in engineering.

(*x*) *Financial assistance to child of beneficiary for Computer Education* (*MS-CIT*).—The Board may give financial assistance of Rs. 5,000 (rupees five thousand only) per child of a beneficiary who has passed the MS-CIT course as reimbursement of MS-CIT course fee. A child of a beneficiary shall submit MS-CIT certificate of concerned institute from where child has completed such course.

(*B*) The above referred Financial Assistance Schemes mentioned in this sub-rule shall be applicable to the child of a beneficiary subject to the following general terms and conditions, namely:—

(*i*) First two children of beneficiary are eligible to avail the benefit of the financial assistance schemes.

(*ii*) In case where father and mother both are beneficiaries, then their children shall be eligible to avail benefit under the schemes on behalf of either father or mother.

माहितीचा अधि— —नियम २००५
प्रमाणीत प्रत

(*iii*) The beneficiary's child should have passed the previous standard to avail the financial assistance for next standard or concerned educational courses.

(*iv*) The beneficiary shall submit mark sheet of concerned school or institute from where child has passed previous standard or concerned educational courses.

(*v*) The beneficiary shall submit bonafide certificate of concerned school or institute from where child has passed the previous standard or concerned educational courses.

(*vi*) The beneficiary shall submit attendance proof (at least seventy five per cent. attendance) of concerned school or institute from where child has completed previous standard or concerned educational courses.

(*vii*) The beneficiary can only apply for immediate previous academic year and have to submit application within one year after declaration of result.

(*C*) *Financial assistance for marriage of beneficiary.*—The Board may give financial assistance of Rs. 30,000 (rupees thirty thousand only) for marriage of beneficiary, subject to the following terms and conditions, namely:—

(*i*) This financial assistance shall be for first marriage of beneficiary only.

(*ii*) If husband and wife both are beneficiaries, then they are eligible for one benefit only.

(*iii*) The beneficiary shall submit marriage certificate of Competent Authority.

(*iv*) The beneficiary shall submit birth proof of both husband and wife. The husband should be twenty one years old or more and wife should be eighteen years old or more.

(*D*) *Financial assistance for marriage of daughter of beneficiary.*—The Board may give financial assistance of Rs. 51,000 (rupees fifty one thousand only) for marriage of daughter of beneficiary, subject to the following terms and conditions, namely:-

१७) याशिवाय ज्या एजन्सीने यापूर्वीच्या शासन निर्णयानुसार सर्व सूचनांचे पालन करुन उपभोक्ता विभागाशी करार केले आहेत, त्यांना नव्याने करार करण्याची आवश्यकता राहणार नाही. परंतू, यापूर्वीच्या करारानुसार नियुक्त करण्यात आलेल्या मनुष्यबळाच्या वेतनामध्ये या शासन निर्णयाप्रमाणे आवश्यक त्या सुधारणा/ बदल करणे बंधनकारक राहील.

१८) सेवा पुरवठादार एजन्सी व उपभोक्ता विभाग (User Department) यांच्यात करावयाच्या करारनामा मसुदा **"परिशिष्ट-ड (ड-१ व ड-२)"** प्रमाणे राहील.

१९) निविदेतील सर्व अटी व शर्तींचे पालन करणे निविदाधारकांवर बंधनकारक राहील.

२०) दिनांक १४.०३.२०२३ च्या शासन निर्णयाप्रमाणे सेवापुरवठादार व उपभोक्ता विभाग यांच्या सोयीसाठी कामगार आयुक्त कार्यालयात स्वतंत्र कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. तसेच, सदर कक्षावर संनियंत्रण ठेवणेसाठी प्रधान सचिव (कामगार) यांचे अध्यक्षतेखाली संनियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आले आहे. सदर कक्ष कायम ठेवण्यात येत आहे.

२१) यापूर्वी शासन निर्णयाप्रमाणे HRMS पोर्टल विकसित करण्यासाठी वेब पोर्टलला मान्यता देण्यात आली असून सदर मान्यता कायम ठेवण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२३०९०६१७१७१२३५१० असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SHRIRAM DHONDUJI GAWAI

Digitally signed by SHRIRAM DHONDUJI GAWAI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=INDUSTRIES ENERGY AND LABOUR DEPARTMENT, 2.5.4.20=d77e1f8ad251b836ba0755598f2479c4b525ec5e71fb1118a0ff819fb7bb5672, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=9574A78195A51E1038C53592DC192140AC2C4D4C6EEDCCC93200D9E7F24C2D73, cn=SHRIRAM DHONDUJI GAWAI
Date: 2023.09.06 18:50:08 +05'30'

(श्रीराम गवई)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१. मा. अध्यक्ष/ सभापती, विधानसभा/ विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत देण्यात आलेली प्रमाणीत प्रत

२. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा/ विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
३. सर्व मा. विधानसभा/ विधानपरिषद सदस्य.
४. मा. राज्यपाल यांचे सचिव.
५. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव.
६. मा. उप मुख्यमंत्री (गृह) यांचे सचिव.
७. मा. उप मुख्यमंत्री (वित्त) यांचे सचिव.
८. सर्व मा. मंत्री व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
९. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग.
१०. सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिनस्त असलेल्या सर्व विभाग/ कार्यालयांचे प्रमुख.
११. प्रबंधक, मूळ न्यायालय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई.
१२. प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१३. महालेखापाल (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
१४. प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई
१५. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
१६. सचिव, महाराष्ट्र विधीमंडळ सचिवालय, मुंबई.
१७. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१८. विकास आयुक्त (असंघटीत कामगार), मुंबई.
१९. संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, मुंबई.
२०. संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई.
२१. कल्याण आयुक्त, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, मुंबई.
२२. प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
२३. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई.
२४. मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२५. सर्व विभागीय आयुक्त.
२६. सर्व जिल्हाधिकारी.
२७. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
२८. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
२९. संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, कोकण भवन, नवी मुंबई.
३०. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
३१. सह संचालक, लेखा व कोषागारे, कोकण/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.
३२. सह संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, कोकण/ पुणे/ नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर.
३३. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
३४. उद्योग, ऊर्जा व कामगार विभागातील सर्व कार्यासने.
३५. पॅनलवरील सर्व सेवापुरवठादार एजन्सीज.
३६. निवडनस्ती / कामगार-८ संग्रहार्थ.

माहितीच्या अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत देण्यात आलेली प्रमाणीत प्रत

माहितीचा अधिकार अधिनियम २००५
अंतर्गत देण्यात आलेली प्रमाणीत प्रत

४(१)(ख)(चार) नमुना 'क'
०२ नोंदीत जिवीत.

अटल बांधकाम कामगार आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत नोंदीत बांधकाम कामगारांना घरबांधणीनंतर घरापोटी खरेदी केलेली जमीन व तदअनुषंगिक बाबींसाठी झालेल्या खर्चाची प्रतिपूर्ती करण्यासाठी अर्थसहाय्य देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग, उर्जा व कामगार विभाग
शासन निर्णय क्र. :- इबांक २०१८/प्र.क्र.२०८/काम ७
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ०७ फेब्रुवारी, २०१९

वाचा: शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र. इबांका २०१८/ प्र.क्र. २०८/ कामगार-७, दिनांक १४ जानेवारी, २०१९

प्रस्तावना :-

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या ग्रामीण भागातील नोंदीत (सक्रिय) बांधकाम कामगारांना ग्रामीण भागात स्वत:च्या जागेवर नवीन घर बांधण्यासाठी किंवा अस्तित्वात असलेल्या कच्च्या घराचे पक्क्या घरात रूपांतर करण्यासाठी अटल बांधकाम कामगार आवास योजना (ग्रामीण) मंडळामार्फत राबविण्यास आणि त्यासाठी रु. १,५०,०००/- इतके अर्थसहाय्य देण्याबाबत संदर्भाधीन दिनांक १४ जानेवारी,२०१९ च्या शासन निर्णयान्वये मंजुरी देण्यात आलेली आहे.

अटल बांधकाम कामगार आवास योजना (ग्रामीण) या योजनेत लाभार्थ्याकडे जमिन असणे आवश्यक आहे. सदर लाभार्थ्याने खरेदी केलेल्या जमीन व इतर तदनुषंगिक बाबींसाठी झालेल्या खर्चाची प्रतिपूर्ती करण्यासाठी अर्थसहाय्य देण्याची बाब शासनाची विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे नोंदीत (सक्रीय) बांधकाम कामगारांनी अटल बांधकाम कामगार आवास योजना (ग्रामीण) चा लाभ घेऊन घराचे बांधकाम पूर्ण करुन घरबांधणीच्या पूर्णत्वाचा दाखला सादर केला आहे, असे बांधकाम कामगार महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडून अर्थसहाय्य मिळण्यास पात्र राहतील.

अटल बांधकाम कामगार आवास योजनेचा (ग्रामीण) लाभ घेऊन घराचे बांधकाम पूर्ण करुन घर बांधणीच्या पूर्णत्वाचा दाखला देऊन अर्ज केलेला आहे अशा लाभार्थ्यास जमीन खरेदी व घरबांधणीच्या अनुषंगीक बाबीसाठी केलेल्या खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडून रु.५०,०००/- पर्यंतचे अर्थसहाय्य मंजूर करण्यात येत आहे. हे मंजूर अर्थसहाय्य थेट लाभार्थ्यांच्या बँक बचत खात्यात जमा करण्यात येईल.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५
अंतर्गत देण्यात आलेली प्रमाणीत प्रत

सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक २०१९०२०७१०२७०३८२१० असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

Digitally signed by Shashank M. Sathe
Date: 2019.02.07 10:29:07 +05'30'

(श.मा.साठे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव.
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव.
३) मा.विरोधी पक्ष नेता (विधानपरिषद /विधानसभा)
४) सर्व सन्माननीय विधानसभा/विधानपरिषद सदस्य
५) मा. मंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव.
६) मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव.
७) मा. राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव.
८) मा. अध्यक्ष, इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई
९) महालेखापाल-१ महाराष्ट्र (लेखापरिक्षा व लेखा अनुज्ञेयता), मुंबई.
१०) महालेखापाल-२ महाराष्ट्र (लेखापरिक्षा व लेखा अनुज्ञेयता), नागपूर
११) मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक.
१२) सर्व अ.मु.स /प्र.स./सचिव मंत्रालयीन विभाग.
१३) प्रधान सचिव (कामगार) यांचे स्वीय सहाय्यक.
१४) प्रधान सचिव (ग्राम विकास) यांचे स्वीय सहाय्यक.
१५) सर्व सह सचिव / उप सचिव / अवर सचिव / कक्ष अधिकारी कामगार विभाग
१६) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद
१७) सर्व अपर कामगार आयुक्त /उपायुक्त कामगार आयुक्त / सहाय्यक कामगार आयुक्त.
१८) उप कामगार आयुक्त, मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, औरंगाबाद.
१९) सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई
२०) निवडनस्ती (कामगार-७).

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत देण्यात आलेली प्रत

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत नोंदित सक्रिय (जिवित) बांधकाम कामगार यांचेकरीता "तपासणी ते उपचार आरोग्य योजना" राबविणेबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
शासन निर्णय क्रमांक: इबांका-२०२३/प्र.क्र.७७/कामगार-७
मंत्रालय मुंबई - ४०० ०३२
दिनांक: ०७ ऑगस्ट, २०२३

संदर्भ : (१) शासन समक्रमांक दिनांक ३१.०५.२०२३ रोजीचे पत्र
(२) सार्व.आरोग्य विभाग, शा. नि. क्रमांक: मफुयो-२०२३/प्र.क्र.१६०/आरोग्य-६, दि.२८.०७.२०२३

प्रस्तावना :-

इमारत व इतर बांधकाम व्यवसायामधील कामगारांच्या हिताचे रक्षण करण्याच्या दृष्टीने, केंद्र शासनाने इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ लागू केला आहे. सदर अधिनियमामधील तरतुदींची अंमलबजावणी करण्याकरीता महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) नियम, २००७ अस्तित्वात आले असून अधिनियमातील कलम १८ अन्वये महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची स्थापना करण्यात आलेली आहे. अधिनियमामधील तरतूदीनुसार बांधकाम कामगारांची नोंदणी व नुतनीकरण करण्यात येते. बांधकाम कामगारांचे काम हे अंगमेहनतीचे व कष्टपूर्ण असल्याने त्यांना आरोग्याच्या समस्या प्रकर्षाने उद्भवण्याची दाट शक्यता असते. वेळोवेळी त्यांच्या आरोग्याच्या तपासण्या झाल्यास भविष्यात उद्भवणाऱ्या आरोग्याच्या समस्यांवर प्राथमिक स्तरावर उपचार करणे शक्य होईल. याद्दष्टीने, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत नोंदित सक्रिय (जिवित) बांधकाम कामगार यांचेकरीता "तपासणी ते उपचार आरोग्य योजना" राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत नोंदित सक्रिय (जिवित) बांधकाम कामगार यांचेकरीता "तपासणी ते उपचार आरोग्य योजना" राबविण्यास सदर शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. योजनेचे लाभार्थी :-

(अ) सदर योजनेअंतर्गत सर्व नोंदित सक्रिय (जिवित) बांधकाम कामगार तसेच, त्यांच्या कुटुंबामधील पती अथवा पत्नी व १० वर्षावरील प्रथम दोन अपत्ये ही लाभार्थी म्हणून गणण्यात येतील.

(ब) सदर योजनेअंतर्गत बांधकाम कामगारांच्या सक्रिय (जिवित) नोंदणी कालावधीमध्ये वर्षातून एकदा सदर योजनेच्या लाभासाठी लाभार्थी पात्र राहील.

(क) सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक २८.०७.२०२३ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार नोंदीत सक्रिय (जिवित) बांधकाम कामगार अथवा त्याच्या कुटुंबातील पात्र व्यक्तींनी आरोग्य योजनेचा लाभ घेतला असल्यास त्यांना शासकीय योजनेची द्विरुक्ती टाळण्यासाठी या योजनेचा लाभ मिळणार नाही. मात्र, त्या बांधकाम कामगाराचा अथवा कुटुंबातील पात्र लाभार्थ्याच्या उपचारावरील खर्च रुपये ५.०० लक्षपेक्षा अधिक होणार असल्यास या योजनेच्या खर्चाच्या मर्यादेत नियुक्त संस्थेने महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या सहमतीने सूचीबद्ध केलेल्या रुग्णालयांमार्फत उपचाराकरीता सदर लाभार्थी पात्र राहील.

(ड) सदरची योजना मंडळाकडे नोंदित सक्रिय (जिवित) बांधकाम कामगारांकरीता ऐच्छिक स्वरूपाची राहील.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५
अंतर्गत देण्यात आलेली प्रमाणीत प्रत

३. अंमलबजावणी यंत्रणा व आर्थिक तरतूद :-

(अ) सदरची योजना महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांचेकडून जिल्हा कामगार सुविधा केंद्र या घटकामार्फत राबविण्यात येईल.

(ब) मंडळाकडे जमा होणाऱ्या उपकरामधून सदर योजनेवरील खर्च भागविण्यात येईल.

(क) सदर योजनेच्या संनियंत्रणाकरीता मंडळाच्या स्तरावर प्रकल्प अंमलबजावणी समिती (PMC) गठीत करण्यात यावी.

(ड) योजनेवर होणाऱ्या खर्चाच्या २% खर्च प्रशासकीय खर्च म्हणून मंडळास अनुज्ञेय राहील.

४. योजनेचे टप्पे :-

सदरची योजना खालील तीन टप्प्यामध्ये राबविण्यात येईल.

(अ) प्राथमिक आरोग्य तपासणी चाचणी

अ.१ - तपासणी पूर्व आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन (Pre-Health Camp) -

नियुक्त संस्था, जिल्हा कामगार सुविधा केंद्राचे प्रमुख कामगार उपायुक्त/सहायक कामगार आयुक्त/सरकारी कामगार अधिकारी यांच्या मान्यतेने शिबीराची ठिकाणे, दिनांक व वेळ निश्चित करतील.

अ.२- आरोग्य तपासणी शिबीरामधील उपक्रम -

अ.२.१ नियुक्त संस्था, शिबीराकरीता निश्चित केलेल्या लाभार्थ्यांना एकत्रित करतील व त्यांची नोंदणी करण्यात येईल.

अ.२.२ नियुक्त संस्था, शिबीरामध्ये आवश्यकतेनुसार डॉक्टर व वैद्यकीय सहाय्यक उपलब्ध करून देतील.

अ.२.३ शिबीरामध्ये लाभार्थ्यांची शारीरीक तपासणी करण्यात येईल व त्यांच्या पूर्व आजार तथा वैद्यकीय इतिहासाबाबत माहिती नोंदविण्यात येईल.

अ.२.४ शिबीरामध्ये नियुक्त संस्थेमार्फत लाभार्थ्यांच्या तपासणीसाठीचे नमुने (Samples) गोळा करण्यात येतील.

अ.२.५ बांधकाम कामगारांच्या करावयाच्या प्राथमिक आरोग्य तपासणी चाचण्या ह्या वरील नमूद शिबीरामध्ये अथवा बांधकाम कामगारांच्या घरोघरी जाऊन नियुक्त संस्थेकडून करण्यात येतील.

अ.३- प्रयोगशाळेमधील तपासणी -

अ.३.१ शिबीरामध्ये अथवा बांधकाम कामगारांच्या घरोघरी जाऊन लाभार्थ्यांच्या प्राथमिक आरोग्य तपासण्यांच्या नमुन्यांच्या (Samples) अनुषंगाने करावयाच्या चाचण्या शासनाच्या मान्यतेने निश्चित करण्यात येतील.

अ.३.२ चाचण्यांचे दर हे CGHS (Central Government Health Scheme) च्या दराच्या मर्यादेत राहतील.

अ.४ - तपासणी नंतर सल्लामसलत (Consultation) शिबीराचे आयोजन (Post-Health Camp) -

अ.४.१ लाभार्थ्यांच्या आरोग्य तपासणीचे अहवाल प्राप्त झाल्यानंतर नियुक्त संस्थेमार्फत तपासणीनंतर सल्लामसलत (Consultation) शिबीराचे (Post-Health Camp) आयोजन करण्यात येईल.

अ.४.२ सदर शिबीरामध्ये तपासणी अहवालाचे वितरण लाभार्थ्यांना करण्यात येईल.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत देण्यात आलेली प्रमाणीत प्रत

अ.४.३ तपासणी अहवालाच्या अनुषंगाने लाभार्थ्यांचे डॉक्टरांसोबत सल्लामसलत (Consultation) करण्यात येईल.

अ.४.४ तपासणी अहवाल, लाभार्थ्यांना नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर पाठविण्यात येईल. तसेच, संगणक प्रणालीमध्ये उपलब्ध करून देण्यात येईल.

अ.४.५ प्राथमिक आरोग्य तपासणी चाचणीमध्ये सामान्य अहवाल (Normal Report) असलेल्या लाभार्थ्यांची पुढील कार्यवाही (Case) बंद करण्यात येईल.

अ.४.६ प्राथमिक आरोग्य तपासणी चाचणीमध्ये असामान्य अहवाल (Abnormal Report) असलेल्या लाभार्थ्यांस आवश्यकतेनुसार लाभार्थ्याच्या सहमतीने औषधोपचाराची शिफारस करण्यात येईल अथवा प्रगत पुष्ठीकरण आरोग्य तपासणी चाचणी (Advanced Confirmatory Test) करीता सूचविण्यात येईल.

(ब) प्रगत पुष्ठीकरण आरोग्य तपासणी चाचणी (Advanced Confirmatory Test)

ब.१. प्राथमिक आरोग्य तपासणी चाचणीमधील ज्या चाचणीचा अहवाल असामान्य (Abnormal Report) असेल अशा चाचणीची दुबार चाचणी करण्याची मागणी लाभार्थ्यांने केल्यास, नियुक्त संस्था विनाशुल्क एकवेळेस अशी चाचणी करेल.

ब.२ प्राथमिक आरोग्य तपासणी चाचणीमध्ये असामान्य अहवाल (Abnormal Report) असलेल्या लाभार्थ्यांची सहमती असल्यास त्यास प्रगत पुष्ठीकरण आरोग्य तपासणी चाचणी (Advanced Confirmatory Test) करीता शिफारस करण्यात येईल.

ब.३ नियुक्त संस्थेने सूचीबद्ध (Empanelled) केलेल्या रूग्णालयामध्ये/तपासणी प्रयोगशाळांमध्ये/सूचीबद्ध (Empanelled) प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये प्रगत पुष्ठीकरण आरोग्य तपासणी चाचणी (Advanced Confirmatory Test) करण्यात येईल.

ब.४ प्रगत पुष्ठीकरण आरोग्य तपासणी चाचण्या (Advanced Confirmatory Test) ह्या केवळ जिवीतास धोका निर्माण करणाऱ्या आजाराच्या (Life Threatening Diseases) बाबतीत करावयाच्या चाचण्या शासन मान्यतेने निश्चित करण्यात येतील.

ब.५ चाचण्यांचे दर हे CGHS (Central Government Health Scheme) च्या दराच्या मर्यादेत राहतील.

ब.६ प्रगत पुष्ठीकरण आरोग्य तपासणी चाचणीमध्ये (Advanced Confirmatory Test) सामान्य अहवाल (Normal Report) असलेल्या लाभार्थ्यांची पुढील कार्यवाही (Case) बंद करण्यात येईल.

ब.७ प्रगत पुष्ठीकरण आरोग्य तपासणी चाचणीमध्ये (Advanced Confirmatory Test) असामान्य अहवाल (Abnormal Report) असलेल्या लाभार्थ्यांस, आवश्यकतेनुसार लाभार्थ्याच्या सहमतीने औषधोपचाराची शिफारस करण्यात येईल अथवा उपचाराकरीता सूचिबद्ध रूग्णालयामध्ये भरती करण्यात येईल.

(क) वैद्यकीय उपचार

(क-१) **औषधोपचार**

क-१.१ प्राथमिक आरोग्य तपासणी चाचणीमध्ये तसेच, प्रगत पुष्ठीकरण आरोग्य तपासणी चाचणीमध्ये (Advanced Confirmatory Test) असामान्य अहवाल (Abnormal Report) असलेल्या लाभार्थ्यांस आवश्यकतेनुसार लाभार्थ्याच्या सहमतीने औषधोपचार करण्यात येईल.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत देण्यात आलेली प्रमाणीत प्रत

क-१.२ सदर योजनेअंतर्गत केंद्र शासनाच्या जन औषधी/अम्रित (AMRIT) योजनेअंतर्गत निश्चित केलेल्या दराच्या मर्यादेत औषधांचा पुरवठा लाभार्थ्यांना करेल.

क-१.३ सदर योजनेअंतर्गत प्रति लाभार्थी (जिवित सक्रिय नोंदणी कालावधी) प्रति वर्ष रक्कम रू. ५,०००/- च्या मर्यादेत नियुक्त संस्था औषधांचा पुरवठा करेल.

(क-२) **रूग्णालय भरती**

क-२.१ प्रगत पुष्ठीकरण आरोग्य तपासणी चाचणीमध्ये (Advanced Confirmatory Test) असामान्य अहवाल (Abnormal Report) असलेल्या लाभार्थ्यांस, त्याच्या सहमतीने उपचाराकरीता संस्थेने सूचीबद्ध (Empanelled) केलेल्या रूग्णालयामध्ये भरती करण्यात येईल.

क-२.२ लाभार्थीवर उपचार करण्यात येणारी रूग्णालये ही नियुक्त संस्थेकडे सूचीबद्ध असणे आवश्यक राहील.

क-२.३ रूग्णालयामध्ये लाभार्थ्यास भरती केल्यानंतर त्याची नोंदणी करण्यात (Admission) यावी तसेच, उपचाराअंती Discharge Paper व झालेला एकूण खर्च याच्या नोंदी नियुक्त संस्थेमार्फत संगणक प्रणालीवर ठेवण्यात येतील.

क-२.४ उपचारावर झालेल्या खर्चाच्या रक्कम रू.२.०० लक्ष च्या मर्यादेमध्ये रूग्णालयास नियुक्त संस्थेकडून अदायगी करण्यात येईल व सदर रकमेची प्रतिपुर्ती मंडळाकडून नियुक्त संस्थेस करण्यात येईल.

क-२.५ विशिष्ठ आजाराच्या प्रकरणी उपचाराचा खर्च रक्कम रू.२.०० लक्ष पेक्षा जास्त मात्र रु.७.०० लक्ष च्या मर्यादेत होणार असल्यास, संबधित रूग्णालयाच्या वैद्यकीय प्रमुख यांची शिफारस तसेच, जिल्हा कामगार सुविधा केंद्राचे प्रमुख कामगार उप आयुक्त / सहायक कामगार आयुक्त / सरकारी कामगार अधिकारी यांच्या मान्यतेने व संबधित जिल्ह्याच्या शासकीय रूग्णालयाचे अधिष्ठाता यांच्या शिफारशीने अशी प्रकरणे "बांधकाम कामगार आरोग्य समिती" कडे सादर करण्यात यावीत.

५. बांधकाम कामगार आरोग्य समिती :-

(अ) मंडळाकडील नोंदित सक्रिय (जिवित) बांधकाम कामगारांच्या उपचाराकरीता रक्कम रू.२.०० लक्षपेक्षा जास्त होणाऱ्या मात्र रक्कम रू. ७.०० लक्षच्या मर्यादेत मान्यता देण्याकरीता खालीलप्रमाणे बांधकाम कामगार आरोग्य समितीचे गठण करण्यात येत आहे:-

१. अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई ----- अध्यक्ष
२. प्रधान सचिव (कामगार), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई ---- सदस्य
३. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य ---- सदस्य
४. अधिष्ठाता, सर जे.जे. रूग्णालय ,मुंबई अथवा त्यांनी नामनिर्देशित केलेले वरीष्ठ वैद्यकीय अधिकारी ---- सदस्य
५. सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई ---- सदस्य सचिव

(ब) सदर समितीसमोर प्राप्त होणाऱ्या प्रस्तावावर निर्णय घेवून उपचार खर्च अनुज्ञेय करण्यात येईल.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत देण्यात आलेली प्रमाणित प्रत

६. अपघातप्रकरणी वैद्यकीय सहाय्य

६.१ बांधकामाच्या ठिकाणी नोंदित सक्रिय (जिवित) बांधकाम कामगारास अपघात झाल्यास ती व्यक्ती सदर योजनेअंतर्गत उपचारास पात्र राहील.

६.२. बांधकाम कामगारास आवश्यकतेनुसार व सोईनुसार ज्या रूग्णालयामध्ये उपचाराकरीता भरती केले असेल, असे रूग्णालय खाजगी असल्यास तात्पुरत्या स्वरूपात सूचीबद्ध (Empanelled) करून पुढील उपचार नियुक्त संस्थेने करावेत.

६.३ अपघातानंतर उपचाराकरीता असलेल्या रूग्णालयाची माहिती लाभार्थी/कामाची आस्थापना/नातेवाईक/इतर व्यक्तींनी नियुक्त संस्थेस टोल फ्री क्रमांकावर अथवा जिल्हा/तालुका कामगार सुविधा केंद्रास देणे आवश्यक राहील.

६.४ अपघातावरील उपचाराचा खर्च परिच्छेद ४ (क-२.४) व ४ (क-२.५) अन्वये अनुज्ञेय राहील.

७. सूचीबद्ध (Empanelled) रूग्णालये

७.१ स्थिर आरोग्य तपासणी केंद्रे-

नियुक्त संस्थेने, प्रत्येक तालुक्यात किमान एक याप्रमाणे निश्चित ठिकाणी कायमस्वरूपी आरोग्य तपासणी केंद्रे निर्माण करावीत किंवा सूचीबद्ध (Empanelled) करण्यात यावे. अशा ठिकाणी लाभार्थी भेट देवून प्राथमिक आरोग्य तपासणी करू शकेल व तपासणी अहवाल (प्राथमिक व प्रगत पुष्ठीकरण) मिळवू शकेल.

७.२ पुष्ठीकरण आरोग्य तपासणी चाचणी (Advanced Confirmatory Test) तसेच, वैद्यकीय उपचाराकरीता नियुक्त संस्था रूग्णालये सूचीबद्ध (Empanelled) करतील.

७.३ प्रत्येक जिल्हा कामगार सुविधा केंद्राच्या क्षेत्रामध्ये किमान तीन रूग्णालये मंडळाच्या मान्यतेने सूचीबद्ध (Empanelled) करण्यात यावीत. तथापि, आवश्यकतेनुसार यामध्ये वाढ करण्यात यावी.

८. फिरते वैद्यकीय कक्ष (Mobile Medical Unit - MMU)

८.१ नियुक्त संस्थेमार्फत प्रत्येक जिल्हा कामगार सुविधा केंद्राच्या क्षेत्रामध्ये २४ x ७ कार्यरत राहील, असे किमान एक फिरते वैद्यकीय कक्ष (Mobile Medical Unit) वाहन स्वरूपामध्ये उपलब्ध करून देणे आवश्यक राहील. तथापि, आवश्यकतेनुसार यामध्ये वाढ करण्यात यावी. या कक्षावरील होणारा खर्च नियुक्त संस्थेमार्फत भागविण्यात येईल. या योजनेबाबत नियुक्त संस्थेसोबतचा करार संपुष्टात आल्यानंतर ती वाहने मंडळाकडे हस्तांतर करणे आवश्यक राहील.

८.२ नियुक्त संस्थेमार्फत फिरते वैद्यकीय कक्ष (Mobile Medical Unit) वाहन हे विनाशुल्क उपलब्ध करून देणे आवश्यक राहील.

८.३ सदरच्या फिरते वैद्यकीय कक्ष (Mobile Medical Unit) वाहनामध्ये डॉक्टर, परिचारक व मदतनीस उपलब्ध राहतील.

८.४ सदरचे फिरते वैद्यकीय कक्ष (Mobile Medical Unit) वाहन हे अत्याधुनिक जीवन समर्थन प्रणालीयुक्त (Advanced Life Support System) असावे.

८.५ सदरच्या फिरते वैद्यकीय कक्ष (Mobile Medical Unit) वाहनामध्ये लाभार्थ्यांना द्यावयाची औषधे, आपत्कालीन परिस्थितीमध्ये लागणारी अत्यावश्यक औषधे, प्रथमोपचार इ. सुविधा असणे आवश्यक आहे.

८.६ सदरचे फिरते वैद्यकीय कक्ष (Mobile Medical Unit) वाहन हे या योजनेकरीता तयार केलेल्या समर्पित बांधकाम कामगार आरोग्य क्रमांकाशी संलग्न राहील.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५
अंतर्गत देण्यात आलेली प्रमाणीत प्रत

९. समर्पित बांधकाम कामगार आरोग्य प्रणाली (Dedicated Software Management System)

९.१ नियुक्त संस्था लाभार्थ्यांच्या प्राथमिक आरोग्य तपासणीपासून उपचारापर्यंत देण्यात येणाऱ्या सुविधांचे देखरेख व संनियंत्रण करण्याकरीता समर्पित बांधकाम कामगार आरोग्य प्रणाली (Dedicated Software Management System) मंडळाच्या नियंत्रणाखाली विनाशुल्क निर्माण करेल. या प्रणालीवरील होणारा खर्च नियुक्त संस्थेमार्फत भागविण्यात येईल. या योजनेबाबत नियुक्त संस्थेसोबतचा करार संपुष्टात आल्यानंतर सदर प्रणाली मंडळाकडे हस्तांतर करणे आवश्यक राहील.

९.२ सदर प्रणालीमध्ये सर्व प्रकारच्या नोंदी कायमस्वरूपी नोंदविण्यात येतील.

९.३ सदर प्रणालीद्वारे लाभार्थी स्वत:च्या नोंदीची माहिती उपलब्ध करून घेवू शकेल.

९.४ सदर प्रणालीद्वारे या योजनेतील सर्व प्रकारच्या देयकाचे संनियंत्रण करण्यात येईल.

१०. समर्पित बांधकाम कामगार आरोग्य टोल फ्री क्रमांक (Dedicated Toll Free Number)

१०.१ नियुक्त संस्था संपूर्ण राज्याकरीता एकच समर्पित बांधकाम कामगार आरोग्य टोल-फ्री क्रमांक (Dedicated Toll Free Number) म्हणून मंडळाच्या नियंत्रणाखाली विनाशुल्क निर्माण करेल. या टोल-फ्री क्रमांकावरील होणारा खर्च नियुक्त संस्थेमार्फत भागविण्यात येईल. या योजनेबाबत नियुक्त संस्थेसोबतचा करार संपुष्टात आल्यानंतर सदर टोल-फ्री क्रमांक मंडळाकडे हस्तांतर करणे आवश्यक राहील.

१०.२ नियुक्त संस्था कॉल सेंटर निर्माण करून संपूर्ण राज्यामधून येणाऱ्या कॉलचे संनियंत्रण करेल. तसेच त्यासाठी होणारा खर्च नियुक्त संस्थेमार्फत भागविण्यात येईल.

११. संस्था नियुक्ती

११.१ उपरोक्त परिच्छेद (१) ते (१०) अन्वये, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत नोंदित सक्रिय (जिवित) बांधकाम कामगार यांचेकरीता "तपासणी ते उपचार आरोग्य योजना" राबविण्याकरीता एच.एल.एल. लाईफकेअर लि. (भारत सरकार उद्योग) यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

११.२ एच.एल.एल. लाईफकेअर लि. (भारत सरकार उद्योग) यांचेमार्फत सदर योजना राबविण्याचा कालावधी हा सदर योजनेचा शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून ५ वर्षाचा राहील.

११.३ शासनाने यापूर्वी दिलेल्या मान्यता व सदर शासन निर्णयानुसार देण्यात येत असलेल्या मान्यता विचारात घेवून, मंडळाने एच.एल.एल. लाईफकेअर लि. (भारत सरकार उद्योग) यांच्याशी करारनामा करावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२३०८०७१४५३४३९८१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(दा.सो.खताळ)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१. मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, यांचे सचिव राजभवन,मुंबई.
२. मा.सभापती, महाराषट्र विधानपरिषद, विधानमंडळ, मुंबई.
३. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, विधानमंडळ, मुंबई.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत देण्यात आलेली प्रमाणीत प्रत

४. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. उप मुख्यमंत्री (गृह), मंत्रालय, मुंबई
६. मा. उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन), मंत्रालय, मुंबई
७. मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
८. सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
९. सर्व विधीमंडळ सदस्य
१०. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, यांचे सचिव राजभवन,मुंबई
११. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. प्रधान सचिव, विधानमंडळ, मुंबई.
१३. विकास आयुक्त, असंघटीत कामगार, मुंबई.
१४. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१५. सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई.
१६. निवड नस्ती (कामगार-७)

माहितीचा अधिकार अधिनियम २००५
अंतर्गत देण्यात आलेली प्रमाणीत प्रत

माहितीचा अधिकार अधिनियम २००५
अंतर्गत देण्यात आलेली प्रमाणीत प्रत

राज्यातील इमारत व इतर बांधकाम क्षेत्रातील बांधकाम कामगारांसाठीच्या प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत महाराष्ट्र बांधकाम कामगार आवास योजना (शहरी) व अटल बांधकाम कामगार आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत बांधकाम कामगारांच्या पात्रतेच्या अटींबाबत...

महाराष्ट्र शासन
उद्योग, उर्जा व कामगार विभाग
शासन निर्णय क्र.:-इबांका २०२१/प्र.क्र.९/काम ७
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ०८ एप्रिल, २०२१

संदर्भ:
१. गृहनिर्माण विभाग,शासन निर्णय,क्र.प्रआयो/२०१७/प्र.क्र.१०८/गृनिधो-२, दिनांक ०३.०२.२०१८
२. उद्योग,उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय,क्र : इबांका २०१७/ प्र.क्र.३६०/काम ७, दिनांक २९.१०.२०१८
३. उद्योग,उर्जा व कामगार विभाग,शासन निर्णय क्र. इबांका २०१८/ प्र.क्र. २०८/काम ७, दिनांक १४ जानेवारी,२०१९.
४. उद्योग,उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय, क्रमांक: इबांका २०१८/ प्र.क्र. २०८/ काम ७, दिनांक ०४.०७.२०१९
५. उद्योग,उर्जा व कामगार विभाग,शासन निर्णय क्र. इबांका २०१८/ प्र.क्र. २०८/काम ७, दिनांक ०७.१२.२०२०.
६. सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांचे पत्र क्र. मइवइबांकाकमं/ शहरी-ग्रामीण आवास योजना/०६/२०२१ दिनांक १३.०१.२०२१.
७. सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांचे पत्र क्र. मइवइबांकाकमं / शहरी-ग्रामीण आवास योजना/३३/२०२१, दिनांक ३०.०३.२०२१.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या शहरी व ग्रामीण भागातील नोंदीत (सक्रिय) बांधकाम कामगारांना आवास योजनेस अनुक्रमे संदर्भ क्र. १ व ३ येथील शासन निर्णयान्वये मंजूरी दिलेली आहे. या दोन्ही शासन निर्णयांमध्ये बांधकाम कामगारांच्या पात्रतेच्या अटी नमूद करण्यात आलेल्या आहेत. त्यानंतर शासन निर्णय दिनांक ०४.०७.२०१९ व दिनांक ०७.१२.२०२० अन्वये अटल बांधकाम कामगार आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे अर्ज दाखल करण्याच्या

माहितीचा अधिकार अधिनियम २००५
अंतर्गत देण्यात आलेली प्रमाणीत प्रत

कालमर्यादेबाबत निर्देश दिलेले आहेत. सदर दोन्ही योजनेचा लाभ घेण्यासाठी निश्चित केलेल्या अटी शर्तींपैकी बांधकाम कामगारांच्या पात्रतेच्या कालावधीबाबतच्या अटींमुळे योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीमध्ये अडचणी येत आहेत. सदर अटीमध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

अटल बांधकाम कामगार आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे अर्ज करण्याच्या कालमर्यादेबाबतचे संदर्भ क्र. ४ व ५ येथील अनुक्रमे दिनांक ०४.०७.२०१९ व दिनांक ०७.१२.२०२० चे शासन निर्णय अधिक्रमित करण्यात येत आहे.

प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत महाराष्ट्र बांधकाम कामगार आवास योजना (शहरी) व अटल बांधकाम आवास योजना (ग्रामीण), या दोन्ही योजनांबाबतच्या अनुक्रमे दिनांक २९.१०.२०१८ व दिनांक १४.०१.२०१९ रोजीच्या शासन निर्णयात बांधकाम कामगारांच्या पात्रतेबाबत, **"योजनेचा लाभ घेण्यासाठी बांधकाम कामगार हा नोंदणीकृत (सक्रिय) असावा. तथापि, अर्ज करतांना तो महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे सलग एक वर्षापेक्षा अधिक, बांधकाम कामगार म्हणून नोंदीत असावा,"** अशी अट नमूद केलेली आहे. या दोन्ही शासन निर्णयातील सदर अट खालीलप्रमाणे सुधारित करण्यात येत आहे.

> **"प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत महाराष्ट्र बांधकाम कामगार आवास योजना (शहरी) व अटल बांधकाम आवास योजना (ग्रामीण) या दोन्ही योजनांचा लाभ घेण्यासाठी सर्व नोंदित सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगार पात्र राहतील."**

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून, त्याचा संगणक संकेतांक २०२१०४०८१६३७५२५०१० असा आहे. तसेच सदरचा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

DR. SHRIKANT LAXAMANRAO PULKUNDWAR

Digitally signed by DR. SHRIKANT LAXAMANRAO PULKUNDWAR
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=INDUSTRIES, ENERGY AND LABOUR DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=feb24b5f5d1512bb47f7bae5ad1db4953358cd43c999bdf0814c6bb78364e50a, cn=DR. SHRIKANT LAXAMANRAO PULKUNDWAR
Date: 2021.04.08 16:42:08 +05'30'

(डॉ. श्रीकांत पुलकुंडवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव.
३. मा.विरोधी पक्ष नेता (विधानपरिषद /विधानसभा)
४. सर्व सन्माननीय विधानसभा/विधानपरिषद सदस्य

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत देण्यात आलेली प्रमाणित प्रत

५. मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव.
६. मा. राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव.
७. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई
८. मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक.
९. सर्व अ.मु.स /प्र.स./सचिव मंत्रालयीन विभाग.
१०. प्रधान सचिव (कामगार) यांचे स्वीय सहाय्यक.
११. प्रधान सचिव (ग्राम विकास) यांचे स्वीय सहाय्यक.
१२. समितीचे इतर सर्व सदस्य (व्दारा कामगार आयुक्त)
१३. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद
१४. कामगार आयुक्त, मुंबई / अतिरिक्त कामगार आयुक्त, मुंबई/पुणे/नागपूर.
१५. उप कामगार आयुक्त, मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, औरंगाबाद.
१६. सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार --कल्याणकारी मंडळ, मुंबई
१७. सर्व सह/उपसचिव, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई
१८. महालेखापाल-१/२,महाराष्ट्र (लेखापरिक्षा व लेखा अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर.
१९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
२०. निवडनस्ती (कामगार-७).

माहितीचा अधिकार अधिनियम २००५
अंतर्गत देण्यात आलेली प्रमाणीत प्रत

माहितीचा अधिकार अधिनियम २००५
अंतर्गत देण्यात आलेली प्रमाणीत प्रत

कलम ४ (१) (ख) दोन नमुना ६५ ४२५।५ (3)

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांतर्गत विभाग प्रमुख, प्रादेशिक कार्यालय प्रमुख व कार्यालय प्रमुख यांना वित्तीय अधिकार प्रदान करण्याबाबत..

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
शासन निर्णय क्र. इबांका २०१८/प्र.क्र.९८/कामगार-७
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ११ जानेवारी, २०२१.

संदर्भ :- शासन निर्णय क्र.इबांका २०१८/प्र.क्र.९८/कामगार-७, दि.८ जानेवारी,२०२१

प्रस्तावना :-

केंद्र शासनाने इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ पारीत केला असून त्यास अनुलक्षून शासनाने महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) नियम, २००७ पारीत केला आहे.

२. इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ च्या कलम १८ अन्वये शासनाने दिनांक ४ ऑगस्ट,२००७ च्या अधिसूचनेन्वये महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ स्थापन केले आहे. केंद्र शासनाच्या इमारत व इतर बांधकाम कामगार (उपकर) अधिनियम, १९९६ मधील कलम ३ ला अनुलक्षून केंद्र शासनाने दिनांक २६ सप्टेंबर, १९९६ च्या अधिसूचनेन्वये बांधकामाच्या (जमिनीचे मूल्य वगळून) १% उपकर कर निर्धारण अधिकारी यांनी मंडळाकडे जमा करण्याची तरतूद केली आहे. सदर तरतूदीच्या अनुषंगाने मंडळाकडे जमा झालेला उपकर इमारत व इतर बांधकाम कामगार (उपकर) अधिनियम, १९९६ च्या कलम २२ प्रमाणे मंडळांतर्गत नोंदित बांधकाम कामगारांना मंजूर विविध कल्याणकारी योजनांवर खर्च करण्यात येतो.

सदर अनुदान खर्च करण्याकरिता इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ मध्ये तरतूद नसल्याने विभाग प्रमुख,प्रादेशिक कार्यालय प्रमुख व कार्यालय प्रमुख यांच्या वित्तीय अधिकार प्रदान करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत देण्यात आलेली प्रमाणीत प्रत

शासन निर्णय :-

संदर्भाधीन शासन निर्णय क्र.इबांका २०१८/प्र.क्र. ९८/कामगार-७, दिनांक ८ जानेवारी, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये घोषित करण्यात आलेल्या विभाग प्रमुख,

प्रादेशिक कार्यालय प्रमुख व कार्यालय प्रमुख यांना या शासन निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्ट "अ" मध्ये नमूद करण्यात आलेले वित्तीय अधिकार प्रदान करण्यात येत आहेत.

२. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२१०१११११६०९०३६६१० असा आहे आणि शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SHASHANK MADHAV SATHE

(श. मा. साठे)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

सोबत :- परिशिष्ट "अ"

प्रत:-

१. मा. राज्यपाल यांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,
३. मा.मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव
४. सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव,
५. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई
६. मा.राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव
७. मा.विरोधी पक्ष नेता (विधानपरिषद/विधानसभा) यांचे खाजगी सचिव,
८. सर्व सन्माननीय विधानसभा/विधानपरिषद सदस्य
९. सर्व अ.मु.स/प्र.स./ सचिव मंत्रालयीन विभाग
१०. प्रधान सचिव (कामगार) यांचे स्वीय सहाय्यक,
११. कामगार आयुक्त, मुंबई/अतिरिक्त कामगार आयुक्त, मुंबई/पुणे /नागपूर/
१२. महालेखापाल-१/२, महाराष्ट्र (लेखापरिक्षा व लेखा अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर
१३. सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम ---कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई
१४. उप कामगार आयुक्त, मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, औरंगाबाद
१५. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, सर्व सदस्य
१६. निवड नस्ती (कामगार-७).

माहितीचा अधिकार अधिनियम २००५
अंतर्गत देण्यात आलेली प्रमाणीत प्रत

शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र. इबांका २०१८/प्र.क्र.९८/काम.७, दिनांक ११ जानेवारी, २०२१

परिशिष्ट-अ

इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ अंतर्गत गठित करण्यात आलेल्या महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांना प्रदान करण्यात आलेले वित्तीय अधिकार

अ. क्र.	नियम क्र.	वित्तीय शक्तीचे वर्णन	अधिकाराचा वापर करण्यास सक्षम असलेले प्राधिकारी	प्रदान केलेल्या वित्तीय अधिकारांची मर्यादा	अटी
१	२	३	४	५	६
१	१	एका वर्षापेक्षा अधिक परंतु सहा वर्षापेक्षा अधिक नाही अशा कालावधीपर्यंत प्रशासकीय कारणास्तव प्रलंबित राहिलेल्या कर्मचाऱ्यांच्या स्वत:च्या सुध्दा वेतन व भत्त्यांच्या अथवा वेतनवाढीच्या थकबाकीच्या दाव्यांच्या रकमांचे प्रदान करण्यास मंजूरी देणे.	सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी उप मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा कार्यकारी अधिकारी /उप जिल्हा कार्यकारी अधिकारी	पूर्ण अधिकार	अशा दाव्यांना मंजुरी देण्यापूर्वी कार्यालयात उपलब्ध असलेल्या परिपोषक अभिलेख्यांच्या आधारे दाव्यांची तपासणी व पडताळणी करुन असे दावे पूर्वी कधीही आलेले नव्हते असे प्रमाणित करुन रक्कम आदा करण्यात यावी.
२	२	सहा वर्षापेक्षा जास्त काळ प्रशासकीय कारणास्तव प्रलंबित राहिलेल्या /थकित ठेवलेल्या परंतु मुदतीबाबतच्या कायद्यानुसार कालबाहय न झालेले :- १. मंडळाच्या कर्मचाऱ्यांना वेतन व भत्ते किंवा वेतनवाढी संबधीचे दावे. २. मंडळात सेवेत नसलेल्या व्यक्तींचे दावे मंजूर करणे.	सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी	पूर्ण अधिकार	अशा दाव्यांची योग्य ती तपासणी व पडताळणी करुन सदर दाव्यांना मंजूरी प्रदान करण्यासाठी सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे पाठवावेत. कार्यालयात उपलब्ध असलेल्या परिपोषक अभिलेख्यांच्या आधारे दाव्यांची तपासणी व पडताळणी करण्यात आली आहे आणि हे दावे पूर्वी कधीही काढण्यात आले नव्हते असे संबंधित प्रादेशिक कार्यालय प्रमुख / कार्यालय प्रमुखाने प्रमाणित करुन सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मान्यता घ्यावी.

माहितीचा अधिकार अधिनियम २००
अंतर्गत देण्यात आलेली प्रमाणीत प्रत

४३७।५

३	३	मंडळ कार्यालयासाठी जागा भाडयाने घेण्यास व भाडे प्रदान करण्यास मंजूरी देणे.	सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी	पूर्ण अधिकार	१. शासनाची व मंडळाची मान्यता असावी. २.अधिकारी व कर्मचारीवर्ग यांच्या संख्येनुसार अनुज्ञेय असलेले जागेचे क्षेत्रफळ असावे. ३.कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडून शासकीय जागा उपलब्ध नसल्याचे व भाडयांचा दर वाजवी असल्याबाबतचे प्रमाणपत्र असले पाहिजे. ४.शासनाच्या अटी व शर्तीप्रमाणे जागेच्या भाडेदरास मान्यता देण्यात येईल.
४	४	मोटारगाडी/जीप/स्टेशन वेगन/मोटार सायकल/स्कुटर/मोपेड/यांत्रिकी (स्वयंचलित) २ किंवा ३ चाकी वाहन विकत घेण्यासाठी मंडळाच्या कर्मचाऱ्यांना वाहन अग्रिम मंजूर करणे.	सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी	पूर्ण अधिकार	१.मंडळाच्या अर्थसंकल्पात तरतूद केली असली पाहिजे. २.आवश्यक त्या प्रकरणी योग्य ती प्रतिभूती / सांपार्श्विक प्रतिभूती घेतली पाहिजे. ३.अग्रिम देण्याविषयीच्या सर्व अटीची उचित वेळी पूर्तता होते यावर लक्ष ठेवणे व खात्री करणे याबाबतची जबाबदारी अग्रिम मंजूर करण्यास सक्षम असणाऱ्या प्राधिकाऱ्याची राहील. ४. ज्या कर्मचाऱ्याला अग्रिम मंजूर करावयाचा आहे, त्या कर्मचाऱ्यांने धारण केलेल्या पदावर त्या पदाच्या सेवा भरती नियमानुसार नेमणूक झाली असली पाहिजे. ५. यांत्रिकी (स्वयंचलित) ३ चाकी वाहन (सायकल) खरेदी करण्यासाठी ज्यांची मंडळाच्या सेवेत नियमितपणे नेमणूक करण्यात आली आहे, अशा मंडळाच्या फक्त दिव्यांग कर्मचाऱ्यांनाच अग्रिम मंजूर करण्यात यावा.
५	५	मंडळाच्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना संगणक खरेदी करण्यासाठी अग्रिम मंजूर करणे.	सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी	पूर्ण अधिकार	शासनाने विहित केलेल्या अटी व शर्तीप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी. शासनाने सद्य:स्थितीत दर विहित केलेले आहेत.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५
अंतर्गत देण्यात आलेली प्रमाणित प्रत

६	६	बदली झालेल्या मंडळाच्या कर्मचाऱ्यास वेतन अग्रिम, प्रवास भत्ता अग्रिम इत्यादी मंजूर करणे.	सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी उप मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा कार्यकारी अधिकारी / उपजिल्हा कार्यकारी अधिकारी	पूर्ण अधिकार	शासनाने विहित केलेल्या अटी व शर्तीप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.
७	७	मंडळाच्या कर्मचाऱ्यांना सण अग्रिम मंजूर करणे.	सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी उप मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा कार्यकारी अधिकारी / उपजिल्हा कार्यकारी अधिकारी	पूर्ण अधिकार	शासनाने विहित केलेल्या अटी व शर्तीप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.
८	८	जडवस्तू संग्रहातील निरूपयोगी वस्तू निर्लेखित करणे.	सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी	पूर्ण अधिकार	१. निर्लेखन करण्यापूर्वी मंडळाची मान्यता घेण्यात यावी. २.सर्वसाधारण शासकीय अटींचे व कार्यपध्दतीचे अनुपालन करण्यात यावे.
९		भांडार सामानाच्या व जडवस्तूच्या वसूल न होणाऱ्या किंमती निर्लेखित करणे.	सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी	पूर्ण अधिकार	१. निर्लेखन करण्यापूर्वी मंडळाची मान्यता घेण्यात यावी. २.ज्यामुळे शिस्तभंगाची कार्यवाही करावी लागण्याची शक्यता निर्माण होईल इतक्या गंभीर स्वरुपाचा निष्काळजीपणा कोणत्याही अधिकाऱ्याकडून झालेला नसावा. ३.झालेली हानी ही चोरी, अपहार किंवा लबाडी या कारणाने झालेली नसावी. ४.हानीचे निर्लेखन मंडळाच्या अधिकार कक्षेतील असले पाहिजे.

१०	१०	अवजारे किरकोळ साधनसामग्री आणि उपकरण संच घेण्यास मंजूरी देणे	सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी	पूर्ण अधिकार	१.मंडळाच्या अर्थसंकल्पात तरतूद असावी. २.खरेदीसाठी आखून दिलेल्या नियमानुसार (GeM Portal), कार्यपध्दतीचे व सर्वसाधारण निर्देशांचे पालन करण्यात यावे.
			उप मुख्य कार्यकारी अधिकारी	वार्षिक रु.५०,००० /- पर्यंत	
			जिल्हा कार्यकारी अधिकारी/ उप जिल्हा कार्यकारी अधिकारी	वार्षिक रु. २५,०००/- पर्यंत	
११	११	यंत्राच्या (विभागाच्या वाहतुकीची वाहने वगळता) कार्यसज्जतेसाठी लागणारे सुटे भाग, उपसाधने व इतर वस्तु, साधनसामग्री विकत घेण्यासाठी मंजुरी देणे.	सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी	पूर्ण अधिकार	१. मंडळाच्या अर्थसंकल्पात तरतूद असावी. २.खरेदीसाठी आखून दिलेल्या नियमानुसार (GeM Portal), कार्यपध्दतीचे व सर्वसाधारण निर्देशांचे पालन करण्यात यावे.
			उप मुख्य कार्यकारी अधिकारी	प्रत्येक बाबींवरील खर्च रू. ५०,०००/- पेक्षा अधिक नसेल तर वार्षिक रू. २५,०००/- च्या मर्यादे पर्यंत	
			जिल्हा कार्यकारी अधिकारी / उपजिल्हा कार्यकारी अधिकारी		
१२	१२	संयंत्रे, यंत्रसामग्री आणि साधन सामग्री इत्यादींच्या दुरुस्तीस मंजुरी देणे.	सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी	पूर्ण अधिकार	१.मंडळाच्या अर्थसंकल्पात तरतूद असावी. २.दुरुस्तीचा वार्षिक खर्च यंत्रसामग्रीच्या पुस्तकी किंमतीच्या २५ टक्क्यांहून अधिक होता कामा नये. ३.शासनाने विहीत केलेल्या कार्यपध्दती आणि सर्वसाधारण निर्देशाचे पालन केले पाहिजे.
			उप मुख्य कार्यकारी अधिकारी	वार्षिक रु.१०,०००/- पर्यंत	
			जिल्हा कार्यकारी अधिकारी/उपजिल्हा कार्यकारी अधिकारी	वार्षिक रु.५,०००/- पर्यंत	
१३	१३	मंडळाने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय / विभागीय/ क्षेत्रीय बैठकींना उपस्थित राहणाऱ्या अभ्यांगतावरील खर्च मंजूर करणे.	सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी	पूर्ण अधिकार	मंडळाच्या अर्थसंकल्पात तरतूद असावी.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५
अंतर्गत देण्यात आलेली प्रमाणित प्रत

१४	१४	परिषद, समिती, आयोग, निकाय यांच्या सभासदांना तसेच कार्यालयीन औपचारिक बैठकीतील सदस्यांना दिलेल्या अल्पोपहाराच्या खर्चास मंजूरी देणे.	सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी	पूर्ण अधिकार	१.मंडळाच्या अर्थसंकल्पात तरतूद असावी. २.शासनाने विहित केलेल्या अटी व शर्तीप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.
१५	१५	कार्यालयाकरिता दूरध्वनी मंजूर करणे	सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी उप मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा कार्यकारी अधिकारी / उपजिल्हा कार्यकारी अधिकारी	पूर्ण अधिकार	मंडळाच्या अर्थसंकल्पात तरतूद असावी.
१६	१६	स्थायी अग्रिमाची रक्कम निश्चित करणे.	सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी	मुख्यालय स्तरावरील किरकोळ बाबींवरील खर्चाकरिता रु. १.०० लक्ष	१. मंडळाची मान्यता असावी. २.प्रचलित नियमांचे अनुपालन व्हावे.
१७	१७	किरकोळ बांधकाम, अधिकाऱ्यांसाठी किंवा कार्यालयाच्या गरजेसाठी लाकडी दालने बनविण्याच्या आणि दुरुस्तीच्या खर्चास मंजूरी देणे व त्या प्रयोजनासाठी रक्कम नियत वाटप करणे.	सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी	पूर्ण अधिकार	मंडळाच्या अर्थसंकल्पात तरतूद असावी.
१८	१८	वातानुकुलित यंत्रे खरेदी करणे व त्या खर्चाला मंजुरी देणे.	सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी	पूर्ण अधिकार	१.मंडळाची मान्यता असावी. २.अर्थसंकल्पीय तरतूद असावी.
१९	१९	मंडळाच्या वाहनांच्या देखभालीवरील ती सुस्थितीत ठेवण्यासाठी आणि त्यांच्या दुरुस्तीसाठीच्या खर्चास मंजूरी देणे (पेट्रोल, डिझेल, इंजिन ऑईल यांवरील खर्चाचा (या	सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी उप मुख्य कार्यकारी अधिकारी	पूर्ण अधिकार प्रति कार्यालय वार्षिक रु. ५०,०००/- पर्यंत	१.अर्थसंकल्पात तरतूद असावी. २.जर वाहन शासकीय कार्यशाळेत दुरुस्त करण्यात आले नसेल तर प्रादेशिक परिवहन अधिकारी, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, तंत्रनिकेतन

		शक्तीच्या वर्णनात) अंतर्भाव राहणार नाही.)	जिल्हा कार्यकारी अधिकारी/उपजिल्हा कार्यकारी अधिकारी	वार्षिक रु. ५०,०००/- पर्यंत	संस्था, जलसंपदा, सार्वजनिक बांधकाम विभागाचे यांत्रिक विभागातील कार्यकारी अभियंता आणि कृषी व पदुम विभागातील प्रादेशिक दुग्धशाळा अभियंता, कृषी अभियंता, अधीक्षक, शासकीय परिवहन सेवा यांनी (या विषयीचा) खर्च वाजवी असल्याबद्दल प्रमाणित केलेले असले पाहिजे. सदर अधिकाऱ्यांनी त्यांच्या स्वत:च्या कार्यालयाप्रमाणे अन्य शासकीय कार्यालयाच्या गरजेप्रमाणे तपासणीअंती तातडीने असे प्रमाणपत्र द्यावे. ३.कार्यपध्दतीविषयक नियमांचे आणि इतर सर्वसाधारण निर्देशांचे अनुपालन करण्यात यावे. ४.खर्चात काटकसर करण्यासंबधी वेळोवेळी काढलेल्या आदेशांचे अनुपालन करण्यात यावे. ५.टायर, टयुब, बॅटरी इ. बदली करण्यासाठी येणाऱ्या खर्चाचा या शक्तींच्या वर्णनामध्ये अंर्तभाव राहील.
	२०	मंडळाच्या वाहनांसाठी पेट्रोल,डिझेल, वंगण तेल/इंजिन ऑईल/सी.एन.जी. खरेदी करण्यासाठी खर्च मंजूर करणे.	सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी	पूर्ण अधिकार	१.अर्थसंकल्पात तरतूद असावी. २.प्रचलित नियमांचे अनुपालन व्हावे.
२	२१	नवीन निर्माण केलेल्या कार्यालयाकरिता लेखनसामग्रीची खरेदी करणे.	सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी	पूर्ण अधिकार	१.अर्थसंकल्पात तरतूद असावी. २.खरेदीसाठी आखून दिलेल्या नियमानुसार (GeM Portal), कार्यपध्दतींचे व सर्वसाधारण निर्देशांचे पालन करण्यात यावे.
			उपमुख्य कार्यकारी अधिकारी	वार्षिक रु. ५०,०००/-	
			जिल्हा कार्यकारी अधिकारी /उपजिल्हा कार्यकारी अधिकारी	वार्षिक रु.३०,०००/-	

माहितीचा अधिकार अधिनियम २००५
अंतर्गत देण्यात आलेली प्रमाणीत प्रत

२२	२२	नवीन विदयुत फोटो कॉपी यंत्र खरेदी करण्यास मंजूरी देणे	सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी	पूर्ण अधिकार	१.मंडळाची मान्यता असावी. २.अर्थसंकल्पात तरतूद असावी. ३.खरेदीसाठी आखून दिलेल्या नियमानुसार (GeM Portal), कार्यपध्दतींचे व सर्वसाधारण निर्देशांचे पालन करण्यात यावे. ४.फोटो कॉपिअर चालकांची पदे नव्याने निर्माण करण्यात येऊ नयेत. ५.प्रत्येक यंत्र सुस्थितीत रहावे यासाठी योग्य ते देखभालविषयक करार करण्यात यावा. ६.सध्या अस्तित्वात असलेली यंत्रे त्यांच्या खरेदीच्या दिनांकापासून ५ वर्षापर्यत बदलण्यात येऊ नयेत. ७.जुन्या यंत्राची दुरूस्ती करणे खर्चाच्या दृष्टीने व्यवहार्य नसल्यास त्यांच्या बदली नवीन यंत्रे खरेदी करणे याचा समावेश असेल. ८.जर सध्याच्या यंत्राबदल नवीन बदली यंत्र घेण्यात आले तर जुन्या यंत्राची विल्हेवाट उपरोक्त नियम क्र. ८ प्रमाणे करण्यात यावी.
२३	२३	नवीन संगणक खरेदी करणे किंवा सध्या अस्तित्वात संगणक यंत्रणेत वाढ/श्रेणी वाढ करणे.	सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी	पूर्ण अधिकार	१.मंडळाची मान्यता असावी. २.अर्थसंकल्पात तरतूद असावी. ३.खरेदीसाठी आखून दिलेल्या नियमानुसार (GeM Portal), कार्यपध्दतींचे व सर्वसाधारण निर्देशांचे पालन करण्यात यावे.
२४	२४	संगणकासाठी लागणाऱ्या तबकडया (प्लॉपी डिस्क), कॉम्पेक्ट डिस्क, डिजिटल व्हिडिओ डिस्क (कोऱ्या) , यु.एस.बी. पेन ड्राईव्ह (२ जी बी पर्यत) की बोर्ड, प्रिंटगसाठी रिबन्स , इंक, कार्टीज खरेदी करणे व त्यांचे रिफिलींग करणे इ. विकत घेण्यासाठी खर्चास मंजूरी देणे.	सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी	पूर्ण अधिकार	१.अर्थसंकल्पात तरतूद असावी. २.खरेदीसाठी आखून दिलेल्या नियमानुसार (GeM Portal), कार्यपध्दतींचे व सर्वसाधारण निर्देशांचे पालन करण्यात यावे. ३.खर्च काटकसरीने करण्याबाबत संबधित प्राधिकाऱ्यांनी आवश्यक ती काळजी घ्यावी.
			उप मुख्य कार्यकारी अधिकारी	वार्षिक रु.५०,०००/-पर्यत	
			जिल्हा कार्यकारी अधिकारी /सहजिल्हा कार्यकारी अधिकारी	वार्षिक रु.३०,०००/- पर्यत	

२५	२५	मंडळ मुख्यालय आणि दुय्यम कार्यालयातील फर्निचरच्या दुरुस्तीला मंजूरी देणे.	सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी	पूर्ण अधिकार	१.अर्थसंकल्पात तरतूद असावी. २.प्रचलित कार्यपध्दतीविषयक नियमांचे आणि इतर सर्वसाधारण निर्देशांचे अनुपालन करण्यात यावे.
			उप मुख्य कार्यकारी अधिकारी	प्रतिवर्षी रु.३०,०००/-पर्यंत	
			जिल्हा कार्यकारी अधिकारी /उपजिल्हा कार्यकारी अधिकारी	प्रतिवर्षी रु.३०,०००/- पर्यंत	
२६	२६	तातडीच्या व निकडीच्या प्रकरणी (इंग्रजी / मराठी) मुद्रणाचे काम स्थानिक खाजगी मुद्रणालयामार्फत करुन घेणे.	सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी	पूर्ण अधिकार	१.मंडळाची मान्यता असावी. २.अर्थसंकल्पात तरतूद असावी.
२७	२७	मंडळामध्ये नेमलेल्या चतुर्थ श्रेणीतील शासकीय कर्मचाऱ्यांना गणवेश पुरवठा करण्याबाबत मंजूरी देणे.	सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी	पूर्ण अधिकार	१.विहित केलेल्या प्रमाणानुसार मंजूरीचे नियमन करण्यात यावे. २. अर्थसंकल्पात तरतूद असावी. ३.चतुर्थ श्रेणीतील कर्मचाऱ्यांची नेमणूक सबंधित पदाच्या सेवाभरती नियमानुसार झालेली असावी.
			उप मुख्य कार्यकारी अधिकारी	अधिनस्त कार्यालयातील कर्मचारी यांचेबाबतीत संपूर्ण अधिकार	
			जिल्हा कार्यकारी अधिकारी /उपजिल्हा कार्यकारी अधिकारी	अधिनस्त कार्यालयातील कर्मचारी यांचे बाबतीत संपूर्ण अधिकार.	
२८	२८	कार्यालयीन उपयोगासाठी वृत्तपत्रे विकत घेण्यास मंजूरी देणे.	सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी	पूर्ण अधिकार	१.खर्च मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. २.वेळोवेळी निर्गमित केलेल्या खर्चात काटकसर करण्यासबंधीच्या आदेशांचे अनुपालन करण्यात यावे. ३.विभाग प्रमुखांच्या निवासस्थानी केवळ एक मराठी व एक इंग्रजी वृत्तपत्राचा पुरवठा करता येईल. ४.प्रादेशिक कार्यालय प्रमुख / कार्यालय प्रमुख यांच्या कार्यालयासाठी केवळ एक मराठी व एक इंग्रजी वृत्तपत्राचा पुरवठा करता येईल. अतिरिक्त पदभाराच्या वेळी या खर्चाची दुरुक्ती टाळावी.
			उप मुख्य कार्यकारी अधिकारी	वार्षिक रु.१५,०००/-पर्यंत	
			जिल्हा कार्यकारी अधिकारी /उपजिल्हा कार्यकारी अधिकारी	वार्षिक रु.१०,०००/-पर्यंत	

					५. विभाग प्रमुखांच्या निवासस्थानी पुरविण्यात आलेल्या वृत्तपत्राची रद्दी विकणे व अशा विक्रीतुन येणारी रक्कम मंडळाकडे जमा करणे आवश्यक आहे. ६.ज्या कार्यालयात ग्रंथालयाची व्यवस्था केलेली आहे त्या ग्रंथालयासाठी विभाग प्रमुख कार्यालयाच्या कामकाजाच्या संदर्भात आवश्यक ती वृत्तपत्रे खरेदी करण्यास मंजूरी देऊ शकतील.
२९	२९	भांडार वस्तुंच्या मुल्यांतील तुटीसाठी (सबंधित भांडार वस्तुंचे वसूल न होण्याजोगे (एवढे) मुल्य निर्लेखित करणे. (पुस्तके आणि प्रकाशने यांचा यात अंतर्भाव नाही.)	सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी	पूर्ण अधिकार	१.मंडळाची मान्यता असावी. २.कार्यप्रणालीतील जो दोष सुधारण्यासाठी मंडळाच्या आदेशाची आवश्यकता असते असा कार्यप्रणालीतील दोष दृष्टीत्पत्तीस आलेला नसेल तरच या अधिकाराचा वापर करता येईल. ३.ज्यामुळे एखाद्या कर्मचाऱ्यावर/ अधिकाऱ्यावर व्यक्तिगत शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची आवश्यकता भासेल इतक्या गंभीर स्वरुपाचा कुठलाही निष्काळजीपणा त्यांच्याकडून झालेला नसावा. ४. भांडाराचे वार्षिक पुनर्विलोकन करण्यात यावे. ६.पुस्तके आणि प्रकाशने यांचा यांत अंतर्भाव नाही.
३०	३०	मा. सर्वोच्च न्यायालय, मा. उच्च न्यायालयातील व जिल्हा न्यायालय येथील मूळ प्रकरणांमध्ये व अपिल प्रकरणांमध्ये शासनाची/ मंडळाची बाजू मांडण्यासाठी नियुक्त वकीलांची फी ठरविणे व फीच्या खर्चाला मजूरी देणे.	सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी	शासन निर्णय, विधी व न्याय विभाग क्रमांक: जीपीएच/ ४३९८/(१७३)/चौदा, दि. ३०.०१.१९९९ सोबतच्या मूळ व अपील प्रकरणासाठी विवरणपत्र सी (१) मध्ये उच्च न्यायालय (मूळ बाजू) मुंबई येथील प्रकरणे हाताळण्या-साठी विहित केलेल्या आणि त्यामध्ये वेळोवेळी होणारा	१. अर्थसंकल्पात तरतूद असावी. २.या संदर्भातील सर्वसाधारण आदेशांचे पालन करावे.

				सुधारणांच्या मर्यादांच्या अधिन राहून पूर्ण अधिकार.	
३१	३१	आकस्मिक खर्चास (वरखर्च) मंजूरी देणे.	सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी	प्रतिवर्षी रू. २,००,०००/-	१.अर्थसंकल्पात तरतूद असावी. २.आखून दिलेली कार्यपध्दती व कार्यपध्दती विषयक नियमांचे आणि इतर सर्वसाधारण आदेशांचे अनुपालन व्हावे. ३."आकस्मिक खर्च (वरखर्च)" यामध्ये एक कार्यालय म्हणून कार्यालयाच्या व्यवस्थापनाच्या दृष्टीने आनुषंगिक असलेल्या उदा.सर्वसाधारणपणे पुस्तके व नियतकालिके यांची खरेदी, लेखनसामग्रीची खरेदी, इत्यादी किरकोळ दैनंदिन खर्चाचा समावेश होतो.
३२	३२	वातानुकुलित यंत्र, वायरकुलर, संगणक मुद्रण यंत्र, बायोमॅट्रीक, प्रिंटर्स, स्कॅनर, झेरॉक्स इ. कार्यालयीन यंत्रसामुग्रीचा वार्षिक देखभाल करार.	सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी	पूर्ण अधिकार	१. अर्थसंकल्पात तरतूद असावी. २.आखून दिलेली कार्यपध्दती व कार्यपध्दती विषयक नियमांचे आणि इतर सर्वसाधारण आदेशांचे अनुपालन व्हावे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५
अंतर्गत देण्यात आलेली प्रमाणित प्रत

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत नोंदित सक्रिय (जिवित) बांधकाम कामगार व कुटुंबिय यांचेकरीता BOMT (Build Operate Manage Transfer) या तत्वावर रूग्णालय उभारणीद्वारे "तपासणी ते उपचार आरोग्य योजना" राबविणेबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग
शासन निर्णय क्रमांक: इबाका-०५२३/प्र.क्र.७७ (भाग-१)/कामगार- ७
मंत्रालय मुंबई - ४०० ०३२
दिनांक: १२ जुलै, २०२४.

वाचा :-

१. उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचा शासन निर्णय क्रमांक इबांका-२०२३/प्र.क्र.७७/कामगार-७, दिनांक ०७ ऑगस्ट, २०२३.
२. उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचा शासन निर्णय क्रमांक इबांका-२०२३/प्र.क्र.७७/कामगार-७, दिनांक ०९ जानेवारी, २०२४.
३. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दिनांक ०२ जुलै, २०२४ रोजीच्या बैठकीमधील ठराव क्र. (६०) (३५).
४. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे पत्र क्र. आरोग्य-२०२४/प्र.क्र.३५/योजना-०६/६१८/२०२४, दिनांक १० जुलै,२०२४.
५. उद्योग,ऊर्जा व कामगार विभागाचे पत्र क्र.इबांका-०५२३/प्र.क्र.७७ (भाग-१)/कामगार-७, दिनांक १० जुलै, २०२४.

प्रस्तावना :-

इमारत व इतर बांधकाम व्यवसायामधील कामगारांच्या हिताचे रक्षण करण्याच्या दृष्टीने, केंद्र शासनाने इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियम (रोजगार नियमन व सेवाशर्थी), १९९६ लागू केला आहे. सदर अधिनियमामधील कलम (१८) नुसार महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्थी) नियम, २००७ अस्तित्वात आले असून, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची स्थापना करण्यात आलेली आहे. अधिनियमामधील तरतूदीनुसार बांधकाम कामगारांची नोंदणी व नुतणीकरण करण्यात येते.बांधकाम

माहितीचा अधिकार अधिनियम २००५
अंतर्गत देण्यात आलेली प्रमाणीत प्रत

कामगारांचे काम हे कष्टपुर्ण असल्याने त्यांना आरोग्याच्या समस्या प्रकर्षाने उद्भवण्याची दाट शक्यता असते. वेळोवेळी त्यांच्या आरोग्याच्या तपासण्या झाल्यास भविष्यात उद्भवणा-या आरोग्याच्या समस्यांवर प्राथमिक स्तरावर उपचार करणे शक्य होईल यादृष्टीने, संदर्भाधीन क्र.(१) व (२) अन्वये एच.एल.एल. लाईफकेअर लि. (भारत सरकार उद्योग) यांचे मार्फत "तपासणी ते उपचार आरोग्य योजना" राबविण्यास मान्यता देण्यात आली होती. संदर्भाधीन क्र. (३) नुसार BOMT (Build Operate Manage Transfer) या तत्वावर मे. एचएससीसी (इंडिया) लि. यांचे मार्फत आरोग्य तपासणी केंद्र व हॉस्पिटल उभारणी करण्याचा ठराव पारीत करण्यात आला आहे. त्याअनुषंगाने, BOMT (Build Operate Manage Transfer) या तत्वावर रूग्णालय उभारणीद्वारे "तपासणी ते उपचार" योजना राबविण्याचा प्रस्ताव संदर्भाधीन क्र. (४) अन्वये शासनास सादर केला होता, त्यास संदर्भाधीन क्र. (५) अन्वये तत्वत: मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सबब, सदर योजना राबविण्यास व त्याबाबतच्या सर्वसमावेशक सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत नोंदित सक्रिय (जिवित) बांधकाम कामगार व कुटुंबिय यांचेकरीता BOMT (Build Operate Manage Transfer) या तत्वावर रूग्णालय उभारणीद्वारे "तपासणी ते उपचार आरोग्य योजना" राबविण्यास सदर शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. **योजनेचे लाभार्थी :-**

(अ) सदर योजनेअंतर्गत सर्व नोंदित सक्रिय (जिवित) बांधकाम कामगार तसेच, त्यांच्या कुटुंबामधील पती अथवा पत्नी व १० वर्षावरील प्रथम दोन अपत्ये ही लाभार्थी म्हणून गणण्यात येतील.

(ब) सदर योजनेअंतर्गत सक्रिय (जिवित) नोंदणी कालावधीमध्ये वर्षातून एकदा सदर योजनेच्या लाभासाठी लाभार्थी पात्र राहील.

(क) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ,मुंबई अंतर्गत नोंदित सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगाराने सार्वजनिक आरोग्य विभागाची "महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना"अथवा कामगार विभागाची "तपासणी ते उपचार" आरोग्य योजना या दोन योजनांपैकी एक योजना निवडण्याचा विकल्प द्यावा.बांधकाम कामगारास दोन्ही योजनांचा लाभ घेता येणार नाही.एकदा बांधकाम कामगाराने पर्याय निवडल्यास, त्याच योजनेअंतर्गत लाभ घेणे बंधनकारक ठरेल.

